आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ नोव्हेंबर २०११ | वर्ष २८ | अंक १५

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०

## निर्धार साखर नियंत्रणमुक्त करण्याचा!!




## उसासाठी 'करो या मरो' - मा. शरद जोशी

करमाळा ऊस परिषद दि. २३ ऑक्टोबर २०११

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १५ । ६ नोव्हेंबर २०११

मूल्य : ₹ १०

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


जागरण
**परिशिष्ट ९ हेच भ्रष्टाचाराच्या राजवटीचे उगमस्थान**
सुभाष खंडागळे ........ ३

आजकाल
**पोशिंद्यांच्या घरावर तुळशीपत्र**
ज्ञानेश्वर शेलार ........ ६

विचार
**व्यक्तीकेंद्रीत समाज आणि राष्ट्रीयत्व**
संजय कोले ........ ८

कॉमन नॉन सेन्स
**अण्णा आंदोलनाची छोटी जीत मोठी हार**
सुधाकर जाधव ........ ११

स्वातंत्र्य
**स्वच्छ समृद्ध जीवन- उत्तरार्ध**
विनय हर्डीकर ........ १३

वाङ्मय शेती
**सणांचे अनर्थशास्त्र**
गंगाधर मुटे ........ २१

मिरचीचे खळे
**लागले मिठू मिठू बोलायला**
बाबू सोंगाड्या ........ २४

अभिजात वाङ्मय
**गोदान**
मूळ लेखक : मुन्शी प्रेमचंद, अनु. अनंत उमरीकर ........ २६

**शेतकरी संघटना वृत्त** ........ ३०

# साखर कडू, डोळा रडू

पश्चिम महाराष्ट्रात सहकाराच्या माध्यमातून साखरेचं साम्राज्य उभारल्या गेलं. या साम्राज्याच्या आधारावर राजकीय नेत्यांनी आपले पक्ष वाढवले. वर्षानुवर्षे त्या माध्यमातून सत्ता उपभोगली. कायम असा देखावा उभा केला गेला की, सहकार म्हणजेच समृद्धी! गेल्या तीस-चाळीस वर्षांत जे चित्र समोर आलं आहे त्यातून हे आता निर्विवादपणे सत्य दिसत आहे- सहकार म्हणजे समृद्धी; पण ती फक्त नेत्यांची! शेतकऱ्यांची आणि एकूणच अर्थव्यवस्थेची या व्यवस्थेने मातीच केली आहे. बागायती क्षेत्राला दिलेलं पाणी सगळ्यांत जास्त उसानं पिऊन टाकलं आणि बदल्यात डोक्यावर कर्जाचे डोंगर घेऊन दबून गेलेले सहकारी कारखाने शिल्लक ठेवले. कितीही थकहमीचे सलाईने लावले तरी हे कारखाने पुन्हा जीव धरणार नाहीत, हे स्पष्ट झालं आहे. एखाद्या वयोवृद्ध बिलकुल जगण्याची आशा नसलेल्या माणसाला स्वतःच्या व्यवहारिक स्वार्थासाठी मोठमोठ्या हॉस्पीटल्समधून व्हेंटिलेटरवर ठेवलं जातं. सगळ्यांना माहीत असतं आज किंवा उद्या 'कडबा, बांबू, मडकं, पांढरं कापड' याची तयारी करावी लागणारच आहे; पण तरी सगळे मिळून म्हाताऱ्याला वाचवतो आहोत, असा देखावा उभा करतात. त्यात जसा डॉक्टरांचा स्वार्थ असतो, तसाच पोराबाळांवरही दबाव असतो. त्यांनाही समाजात सांगता येतं की, बापासाठी आम्ही शेवटपर्यंत खूप काही केलं. आजच्या राज्यकर्त्यांची सहकारी साखर कारखान्याबाबतची भूमिका अगदी ही अशीच आहे. सहकारी साखर कारखानदारी मरून गेली आहे. हे आता वेगळं सांगायची गरज नाही. शेतामध्ये इतका प्रचंड ऊस उभा आहे आणि शरद पवार असोत, की विरोधी पक्षातले गोपीनाथ मुंडे असोत दोघेही हातात हात घालून ऊसतोड कामगारांसाठी लवाद म्हणून बसत आहेत. त्यांनाही हे स्पष्ट माहीत आहे. मजुरी तर सोडाच- ऊस तोडायला माणसंच उपलब्ध नाहीत. यंत्राशिवाय पर्याय नाही; पण घोषणा मात्र ऊसतोडणी मजुरांच्या लवादाची. लगेच तिकडून अमूक अमूक मजुरी भेटल्याशिवाय कारखाना चालू देणार नाही, असल्या गर्जना अर्धवट डोक्याचे शेतकरी नेते करत आहेत. म्हणजे आधीच वेगवेगळ्या कारणांनी शासन डबघाईला आलंच आहे, त्यात परत साखरेचं ओझं शासनावर टाकलं की झालं! जसं बुडत्याला काडीचा आधार म्हणतो, याच्या नेमकं उलट बुडत्या शासनाला साखरेची ही काडी जरी पडली तरी त्याला बुडायला आयतंच निमित्त सापडेल.



शेतकरी संघटनेने ३० वर्षांपूर्वीपासून शेतमालाच्या निर्यातबंदीबाबत अतिशय स्पष्ट, व्यवहारिक, सर्व समाजाचे हित पाहणारी भूमिका घेतली होती. साखर उद्योग नियंत्रणमुक्त करा ही भूमिका सगळ्या काळात आणि सगळ्या समाजाच्या हितासाठी तेव्हाही योग्य होती आणि आताही योग्य आहे. आज देशात आणि देशाच्या बाहेरही साखरेचे भाव पडलेले आहेत. अजून पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत कारखान्यांना उसापासून साखर काढण्यापेक्षा इथेनॉल, मद्यार्क, वीज असा कुठलाही मार्ग उपलब्ध असायला हवा. किंबहुना त्यासाठी प्रोत्साहन मिळायला हवे. उसापासून इतर गोष्टी व्हाव्यात म्हणून सहकाराचं जे भूत आमच्या मानगुटीवर बसलं आहे, ते पहिल्यांदा उतरायला हवं. ज्या ज्या क्षेत्रांतून सरकार हद्दपार झालं त्या त्या क्षेत्रांचं भलं झालं हे आपण बघतच आलो आहोत. कापसाचा एकाधिकार होता तोपर्यंत शेतकऱ्याचं फार मोठ्या प्रमाणात शोषण झालं. कापूस एकाधिकार संपला तेव्हा कुठे कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी मोकळा श्वास घेतला आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या. उसाच्या बाबतीत जर सहकार गेला नाही, तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हायला सुरुवात होईल. जे सहकारी साखर कारखाने सध्या कार्यरत आहेत. त्यांची गाळप क्षमता अतिशय कमी आहे आणि त्याच्या उलट जे कारखाने खाजगी क्षेत्रातून उभारल्या गेले आहेत. त्यांची गाळप क्षमता आणि कार्यक्षमता प्रचंड प्रमाणात जास्त आहे. इतकंच नाही, या कारखान्यांनी विजेची निर्मितीही करण्याची महत्त्वाकांक्षी धोरणे आखली आहेत- इतकंच नाही, रांजणी (जि. उस्मानाबाद) असो किंवा गंगाखेड (जि. परभणी) असो येथील कारखान्यांनी हे सिद्धही केले आहे. मुद्दा आहे राजकीय इच्छाशक्तीचा... हे जर होऊ द्यायचं नसेल तर हा सहकाराचा भस्मासूर राज्यकर्त्यांवर उलटल्याशिवाय राहणार नाही. पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष आहे. त्याला कसं तोंड द्यायचं हे शासनाला अजूनही कळत नाही. शासनाला कळत नाही हे एक वेळ समजता येतं; पण उसाला दरवाढ मागणाऱ्या कित्येक शेतकरी नेत्यांनाही याची काडीचीही अक्कल नसावी ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. एकीकडे जागतिकीकरण म्हणायचं आणि दुसरीकडे शेतीमध्ये मात्र अजूनही चूड दाखवून शासनाच्या हस्तक्षेपाचा चोर घरामध्ये बोलावून घ्यायचा हे मोठं अजब आहे. कापूस एकाधिकार संपलेला या नेत्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी बघितला आहे. मग उसाच्या बाबतीतही सहकार पूर्णपणे हद्दपार करून शासनाला हटवण्याची भाषा शेतकरी नेते का करत नाहीत? की त्यांना हे कळत नाही? की कळून घ्यायचं नाही?

साखरेच्या आणि एकूणच शेतीमालाच्या बाबतीत निर्यातबंदी पूर्णपणे उठविण्याची स्वच्छ आणि स्पष्ट मागणी सगळ्या आंदोलनकर्त्यांनी केली पाहिजे. फक्त शरद जोशींनी २३ ऑक्टोबरच्या करमाळ्यातील ऊस परिषदेमध्ये हे धोरण काय असावं याबाबत स्पष्ट विवेचन केलेलं आहे. इतर शेतकरी नेत्यांना आजही हा प्रश्न कळालेला नाही आणि म्हणूनच मांडताही आलेला नाही. ट्रॅक्टरचे टायर पंक्चर कर, रस्ता अडव, कारखाना बंद पाड, असल्याच जुन्या-पुराण्या आणि गंजलेल्या शस्त्रांनी ते लढत आहेत. शासन आधीच घायकुतीला आलेलं आहे. त्याच्यावरती शेवटचा घाव घालण्याची हीच संधी आहे. खरे तर, परिस्थिती अशी आहे, प्रत्यक्ष घाव घालण्यापेक्षा घाव घालण्याचा आव आणला तरी पुरेसा आहे. तितकंच निमित्त करून यातून बाहेर पडू पाहणारे शासन लगेच बाहेर पडण्याची दाट शक्यता आहे. इतर शेतकरी नेत्यांना ही अक्कल येत नाही याला काय म्हणावे? कदाचित त्यांचे बोलविते धनी वेगळेच असावेत.

# परिशिष्ट ९ हेच भ्रष्टाचाराच्या राजवटीचे उगमस्थान

**आज रोजी केंद्र व राज्य शासनांनी आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे २८४ कायदे या परिशिष्ट-९ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. हे परिशिष्ट-९ आणि आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे कायदे पं. नेहरू आणि त्यांची कन्या इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात करण्यात आले. त्यामुळे या परिशिष्ट-९ मुळे आंबेडकरी संविधानाचे रूपांतर नेहरू-इदिरा गांधी प्रणित संविधानात करण्यात आले. मूळ आंबेडकरी संविधानाची मोडतोड करण्यात आली. ४४ व्या घटनादुरुस्तीद्वारे संविधानाच्या प्रस्तावनेत 'समाजवाद' हा शब्द घुसडण्यात आला. मूळ आंबेडकरी संविधानाची मोडतोड करण्यात आली. परिशिष्ट-९ व त्यातील आर्थिक गुलामगिरीच्या कायद्यामुळे संविधानाचा मूळ ढाचाच बदलून टाकला.**

भ्रष्टाचार आंदोलनामुळे 'जनलोकपाल विधेयक' हा भ्रष्टाचाराच्या निर्मुलनासाठी उपाय म्हणून पूढे आणलेली मागणी आहे. कदाचित हे विधेयक मंजुरसुध्दा होईल; पण या विधेयकामुळे भ्रष्टाचारी राजवट काही संपणार नाही. ही एक वरवरची मलमपट्टी आहे.

भ्रष्टाचार हा सरकारी नोकरशाही आणि राजकीय सत्तेतील दलाल यांच्याशी एकवटला आहे. भ्रष्टाचार हा अर्थकारणाशी जोडला आहे. संविधानात विभाग-३ मध्ये नागरिकांना वेगवेगळे मूलभूत हक्क दिले आहेत. यामध्ये आर्थिक स्वातंत्र्याचासुद्धा समावेश केला होता. (कलम ३१,१९ (फ)).

### आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे काय?

हे समजण्यासाठी खालील घटकांचा समावेश होतो.

१. जेव्हा उत्पादित वस्तुंची देशांतर्गत बिना अडथळयाची वाहतुक असते.
२. वस्तुंची साठवण करण्यास अडथळा राहत नाही.
३. वस्तुंवर वेगवेगळ्या प्रक्रिया करून वेगवेगळ्या वस्तू बनविण्यासाठी अडथळा असत नाही.
४. संशोधन व त्याआधारे तंत्रज्ञान विकसित करण्यास अडथळा असत नाही.
५. असे तंत्रज्ञान उपयोगात आणण्यासाठी अडथळा असत नाही.
६. मालमत्ता मिळविणे, बाळगणे आणि वितरित करणे यावर बंधने बसत नाही.

तेव्हा नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य आहे असे मानले जाते. नागरिकांच्या स्वातंत्र्यांचा मार्ग हा आर्थिक स्वातंत्र्याच्या मार्गातूनच जातो.

### देशाची भौगोलिक फाळणी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र होताना भौगोलिक क्षेत्राची दोन विभागांत फाळणी करून भारत (इंडिया) आणि पाकिस्तान हे दोन देश निर्माण करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी देशाला संविधान लागू झाले. या संविधानाच्या विभाग-३ मध्ये नागरिकांचे वेगवेगळे मूलभूत हक्क दिले आहेत. हे मूलभूत हक्क लोकशाहीचा पाया असून तो संविधानाचा मूळ ढाचा (Basic Structure) आहे. नागरिकांचे मूलभूत हक्क यामध्ये आर्थिक स्वातंत्र्याचा हक्कसुद्धा अंतर्भूत आहे. स्वातंत्र्याचे हक्क काढून घेणारे कायदे संसद तथा विधानसभा या कायदेमंडळांत करता येणार नाही अशी तरतूद मूळ संविधानात होती. ज्याला आपण आंबेडकरी संविधान म्हणतो. या आंबेडकरी संविधानाला एकूण ८ परिशिष्टे जोडली होती. नागरिकांच्या मूलभूत हक्काची संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च तथा उच्च न्यायालयाची आहे अशीसुद्धा तरतुद संविधानात आहे.



**ॲड. सुभाष खंडागळे**

### देशाची आर्थिक फाळणी

१८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती केली. या घटना दुरुस्तीद्वारे संविधानाला ९ वे नवीन परिशिष्ट जोडले. जे कायदे आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे असतील असे कायदे परिशिष्ट-९ मध्ये टाकले तर ते कायदे सर्वोच्च तथा उच्च न्यायालयाला रद्द करता येणार नाही अशी या पहिल्या घटना दुरुस्तीद्वारे संविधानात तरतूद करण्यात आली. शेती समाजाचे

आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे कायदे बनविले. ते कायदे परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आले. शेतीक्षेत्राला देशांतर्गत वसाहत क्षेत्र बनविले. शेतकी समाजाचे आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतल्यामुळे तो आर्थिक गुलाम बनविला. शेती ही तोट्यातच राहावी, शेतकी समाजाकडे बचत राहू नये आणि ग्रामीण औद्योगिकरण होऊ नये अशा प्रकारचे कायदे बनविले ते कायदे परिशिष्ट-९ मध्ये टाकण्यात आले. शेती क्षेत्र हे वसाहत क्षेत्र म्हणजे भारत आणि शेतकी समाज हा भारतातील आर्थिक गुलाम बिगर शेतीक्षेत्र म्हणजे इंडियानंतर पुढे ४थी आणि ४४वी घटनादुरुस्ती करून शेतकी समाजाचे पूर्ण आर्थिक काढून घेण्यात आले. अशारीतीने स्वातंत्र्यानंतर आर्थिक क्षेत्रात एकाच देशात इंडिया आणि भारत अशी फाळणी करण्यात आली. आज रोजी केंद्र व राज्य शासनांनी आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे २८४ कायदे या परिशिष्ट-९ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. हे परिशिष्ट-९ आणि आर्थिक स्वातंत्र्य काढून घेणारे कायदे पं. नेहरू आणि त्यांची कन्या इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात करण्यात आले. त्यामुळे या परिशिष्ट-९ मुळे आंबेडकरी संविधानाचे रूपांतर नेहरू-इदिरा गांधी प्रणित संविधानात करण्यात आले. मूळ आंबेडकरी संविधानाची मोडतोड करण्यात आली. ४४ व्या घटनादुरुस्तीद्वारे संविधानाच्या प्रस्तावनेत 'समाजवाद' हा शब्द घुसडण्यात आला. मूळ आंबेडकरी संविधानाची मोडतोड करण्यात आली. परिशिष्ट-९ व त्यातील आर्थिक गुलामगिरीच्या कायद्यामुळे संविधानाचा मूळ ढाचाच बदलून टाकला. गुलामगिरीच्या (आर्थिक) कायद्यामुळे सरकारी नोकरशाही व राजकीय पुढारी यांना संविधानात सर्वोच्च स्थान देण्यात आले. उत्तम नोकरी, दुय्यम व्यापार-उद्योग आणि कनिष्ठ-शेती अशी स्थिती आर्थिक गुलामगिरीच्या कायद्यामुळे बनविण्यात आली. या कायद्यामुळे नोकरशाही व सत्तेतील पुढारी यांना आर्थिक क्षेत्रात ढवळाढवळ करण्याचे विशेषाधिकार प्राप्त झाले.

## इंडिया आणि भारत आर्थिक भेदभाव

१. शेतीमालाच्या देशांतर्गत वाहतूकीवर बंधने मात्र औद्योगिक उत्पादनाच्या वाहतुकीवर अशी बंधने नाही.

२. शेतमालाच्या व्यापारामधील साठवणुकीवर बंधने मात्र औद्योगिक उत्पादनाच्या साठवणुकीवर अशी बंधने नाहीत.

३. शेतमालाच्या खुल्या व्यापारावर बंधने शेतमालाच्या वायदेबाजारावर बंधने; पण औद्योगिक उत्पादनांवर अशी बंधने नाहीत.

४. शेती मालावर प्रक्रिया करण्यावर नियंत्रणे आणि ग्रामीण औद्योगिकीरणाला अप्रत्यक्षपणे बंदी मात्र औद्योगीक क्षेत्रासाठी असे काही नाही.

५. शेतीला लागणाऱ्या निविष्टा उदा. खते, बी-बियाणे, कीटक नाशके यांच्या बाजारपेठेवर नियंत्रणे मात्र औद्योगिक क्षेत्रासाठी लागणाऱ्या वस्तूंवर मात्र अशी बंधने नाहीत.

६. ग्रामीण जमीन मालमत्तेवर सिलिंग मात्र शहरी मालमत्तेवर नाही.

७. शेतमालाचे थोडे जरी भाव वाढले तर बोंबाबोंब मात्र औद्योगिक उत्पादनाचे भाव किती वाढले त्याकडे दुर्लक्ष.

८. शेतीमालाचे भाव 'कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग' ठरवितो शेतकरी नाही. मात्र औद्योगिक उत्पादनाचा भाव ठरविण्यासाठी कोणताच आयोग नाही. कारखानदारच मागणी पुरवठा यानुसार औद्योगिक उत्पादन वस्तूंचे भाव ठरवितात. म्हणजेच खुल्या बाजारपेठेत भाव ठरवितात.

९. शेतमालाच्या बाजार पेठेवर कृषी उत्पन्न बाजार समित्यांची नाफेड या सर्वोच्च संस्थेचे नियंत्रण मात्र औद्योगिक उत्पादनाच्या बाजारपेठेवर नाफेडसारख्या अन्य कोणत्याही संस्थेचे नियंत्रण नाही. औद्योगिक उत्पादनासाठी खुली बाजारपेठ मात्र शेतीमालाच्या बाजरपेठेवर नाफेडचा एकाधिकार.

१०. शेतमालाच्या अन्नधान्यासाठी 'भारतीय अन्न महामंडळ' आणि या महामंडळाच्या देशभरात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत चार लाख 'स्वस्थ धान्य दुकाने' मात्र औद्योगिक उत्पादनासाठी नाही. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत स्वस्त. औद्योगिक उत्पादनांची दुकाने नाहीत.

११. शेतीक्षेत्रासाठी सहकार क्षेत्र आणि सहकार महर्षींचा धुमाकूळ औद्योगिक क्षेत्रासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त संचार. ग्रामीण औद्योगिकीकरण होऊ नये म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतीक्षेत्रात मज्जाव आणि सहकार महर्षींना शेतीक्षेत्रात खेळण्याचे खुले पटांगण. ज्या भारतीय कंपन्या भांडवल व मनुष्यबळ स्वतःचे आणि तंत्रज्ञान परदेशी घेतात त्यांना बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणतात. भारतातील टाटा, रिलायन्स इत्यादी कंपन्या भांडवल स्वतःचे वापरून शेतमालावर त्या त्या गावात प्रक्रिया करवून घेऊन पक्का माल सरळ मॉलसारख्या दुकानात विक्रीला ठेवण्यास तयार आहेत; पण अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेतीक्षेत्रात बंदी घातली आहे. जर आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतले नसते तर शेतीक्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांना अशी बंदी घालता आली नसती. अशी बंदी मूलभूत हक्काला छेद देणारी ठरली असती.

आर्थिक गुलामगिरीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी उभ्या केलेल्या सरकारी संरचना

### १. कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग

शेतकऱ्यांचे आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतल्यामुळे आणि शेतमालाच्या बाजारपेठेवर संपूर्णपणे सरकारच्या नाफेड या संस्थेचे नियंत्रण आहे. कोणताही व्यापारी, कारखानदार अथवा कंपन्याना सरळ शेतकऱ्यांकडून विकत घेण्यास बंदी आहे. त्यासाठी त्यांना नाफेडचे लायसन्स घ्यावे लागते. त्यामुळे शेतकरी आपला मालाचा भाव स्वतः ठरवू शकत नाही. कोंबडी पालनामध्ये असे कोंबडीला किती कॅलरी लागतात, किती प्रोटीन लागते असे ठरवून त्याप्रमाणे कोंबड्यांना खाद्य दिले जाते. त्याचप्रमाणे हा आयोग शेतमालाचा भाव ठरवितो. ही ठरविण्याची पद्धतच विचित्र आहे. या आयोगातील अधिकारी शेतकरी हा जनावर समजून शेतमालाचे भाव ठरवितो. शेती मालासाठी वायदाबाजार तथा खुली बाजारपेठ असती तर शेतकऱ्यांना स्वतः परवडेल असा भाव ठरविता आला असता. आर्थिक स्वातंत्र्य जर काढून घेतले नसते तर अशा आयोगाची निर्मितीच झाली नसती शेतकरी सोडून हा वेगळा आयोग शेतमालाचा भाव ठरवितो. हे शेतकऱ्यांच्या आर्थिक गुलामगिरीचे लक्षण आहे.

### २) भारतीय खाद्यान्न महामंडळ

देशभर या महामंडळाचे जाळे आहेत. यामध्ये ४.५ लाख सरकारी नोकरांची फौज काम करते. या महामंडळामार्फत देशभर चार लाख स्वस्त धान्य दुकानांची साखळी आहे. दरवर्षी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार

होत असतो. सरकारी गोदामांतून १०० पोते धान्य बाहेर पडले तर प्रत्यक्ष १० पोते धान्य लाभार्थ्यांना मिळते. या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर सरकारी नोकरशाही, राजकीय पुढारी आणि काही स्वयंसेवी संस्था, मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे हितसबंध गुंतले आहेत. भ्रष्टाचारासाठी ही एक चांगली धावपट्टी आहे. भ्रष्टाचार संस्कृती रुजविण्यास ही संस्था फार मोलाची कामगिरी बजावते. दुसरे या महामंडळाचे काम अन्नधान्याची कृत्रिम टंचाई झाल्याचा आभास निर्माण करते. त्यामुळे शेतीमालाचे भाव पाडण्यास अनुकूलता प्राप्त होते.

### ३) महसूल खाते

आर्थिक स्वातंत्र्यातील शेतकऱ्यांचा मालमत्तेचा मूलभूत अधिकारच काढून घेतला. त्यामुळे 'भूअर्जन कायदा' हा इंग्रजांच्या काळात बनवला. हा कायदा रस्ते, सैनिकी तळ, छावण्या, कालवे, तलाव बांधण्यासाठी जमीन लागते म्हणून तयार झाला. या कायद्याची अंमलबजावणी ही महसूल खात्याकडून केली जाते. जर शेतकऱ्यांचा मालमत्तेचा हक्क काढून घेतला नसता तर हा कायदा रद्द झाला असता. या कायद्यात कितीही दुरुस्त्या केल्या तरी शेतकऱ्यांचा मालमत्तेचा हक्क काही मिळत नाही. ज्या कायद्याच्या अंमलबजावणीदरम्यान कसा भ्रष्टाचार होतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मालमत्तेचा हक्क जर काढून घेतला नसता तर भूखंड घोटाळ्याची मालकी तयार झाली नसती. त्याचप्रमाणे सिलींगच्या कायद्यामध्ये मालमत्तेचे हक्क नाकारणाऱ्या काही तरतुदी आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान भयंकर भ्रष्टाचार झाला. हजारो राजकीय नेत्यांनी व सरकारी नोकरांनी आयुष्याचे चांगले उखळ पांढरे करून घेतले. त्याचप्रमाणे कुळकायदा यामध्ये मालमत्तेचा हक्क काढून घेणाऱ्या काही तरतुदी आहेत. त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणीदरम्यान करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला. खरा शेतकरी बाहेर फेकला गेला. अशी लाखो उदाहरणे देशात सापडतील. तसेच महसूल कायद्यामध्येसुद्धा मालकी हक्क नाकाणाऱ्यांना तरतुदी आहेत. त्यांचा फायदा महसूल अधिकाऱ्यांनी उचलला. या महसूल कायद्यातील अनेक तरतुदींची अमलबजावणी ग्रा.पं. (ग्रामसभा) सहज करू शकते. मालमत्तेचा हक्कच नसल्यामुळे देशभरातील शेतकरी हा महसूल खात्याने वेढून टाकला व त्याला पुरते गुलाम केले. शेतकऱ्याला मालमत्तेचा हक्क असता तर महसूल अधिकारी शेतकऱ्यांशी नम्रतेने वागला असता; पण तो हक्क नसल्यामुळे महसूल कर्मचारी शेतकऱ्याला नोकरासारखा खेळवतो.

### ४) नियोजन आयोग

प्रत्येक माणूस त्या त्या क्षेत्रात आपल्या कुवतीप्रमाणे आपले मन, विचारशक्ती, प्रज्ञा, प्रतिभा वापरून आपल्या कुवतीप्रमाणे स्वतःच्या जीवनाचा आराखडा बनवित असतो. तसे त्याचे नियोजन असते. त्यासाठी त्याला इतर स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वातंत्र्याची गरज असते; पण आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतले तर मात्र त्याला आर्थिक क्षेत्रात आपल्या कुवतीप्रमाणे व मनासारखा आर्थिक आराखडा व आपल्या व्यवसायाचे नियोजन करता येत नाही. ते नियोजन करण्याचा अधिकार जो आर्थिक स्वातंत्र्य काढूण घेतो त्याचेकडे असते. ज्या समाजाचे आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतले जाते त्या समाजात आर्थिक गरिबी तयार होते. ती गरिबी निर्माण व्हावी आणि टिकावी म्हणून या आयोगाची निर्मिती केल्या गेली. जर आर्थिक स्वातंत्र्य काढून घेतले नसते तर या आयोगाची निर्मितीच झाली नसती.

'गरिबी हटाव' ते 'आम आदमी' सारख्या कल्याणकारी योजना तयार करणे हे या आयोगाचे काम मताचे राजकारण खेळण्यासाठी, लोकानुरंजनवादी लाचार बनविणाऱ्या योजना तयार करणे असे या आयोगाचे काम... हा आयोग सरकारी नोकरशाही आणि सत्तेतील पुढारी यांच्यासाठी वरदान ठरला आहे. गेल्या ६० वर्षांत कितीतरी अब्ज कोटी रुपये कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात आले; पण गरिबी काही कमी झाली नाही. कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मिळालेला पैसा नोकरशाहीच्या हातात जातो. १०० रु. जर योजनेसाठी ठेवले तर लाभार्थीला केवळ २ रु. मिळतात. बाकी ९८ रु. नोकरशाही आणि राजकीय दलाल खाऊन टाकतात. या योजना महसूल खाते, जि.प., पं.स. राज्य व केंद्र सरकार, त्यासाठी वेगवेगळी बनविलेली महामंडळे इत्यादींमार्फत राबविल्या जातात. कल्याणकारी योजनांमुळे नोकरशाही आणि राजकीय पुढारी यांना चांगले चरण्याचे कुरण मिळाले आहे. अशा योजनांमध्ये सर्वच राजकीय पक्षांचा हितसंबंध गुंतला आहे. कल्याणकारी योजनांमध्ये भ्रष्टाचार कसा माजला आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. शेतकऱ्यांसाठी कृषी खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना यात काय होते हे दररोज अनुभवल्या जाते. 'लोकपाल विधेयक' हे काही आर्थिक गुलामगिरीचे कायदे नष्ट करू शकत नाही आणि भ्रष्टाचाराची संस्कृती वर काहीच परिणाम होणार नाही.

***आर्थिक स्वातंत्र्य असलेल्या आंबेडकरी संविधानाची पुनर्स्थापना करण्यासाठी तशी घटनादुरुस्ती करणे हाच एक उत्तम उपाय आहे.***

## सर्वोच्च न्यायालयाची थरथरती भूमिका

परिशिष्ट-९ आणि त्यामधील आर्थिक गुलामगिरीच्या कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने २१ फेब्रुवारी १९६७ रोजी ११ न्यायाधिशांच्या खंडपीठासमोरील गोलखनाथ खटला निकालात काढताना परिशिष्ट-९ च्या अस्तित्त्वावर व उद्दिष्टांवरच आक्षेप घेतला आणि संसदेला नागरिकांच्या हक्कांमध्ये बदल करता येत नाही. तो अधिकार संसदेला नसून घटना समितीला आहे. असा हा महत्त्वपूर्ण ६ विरुध्द ५ न्यायाधिशांनी दिलेला निकाल आहे. (AIR1967 SC 1943) परंतु हा निकाल सन १९७१ साली घटनादुरुस्ती करून रद्द केला; परंतू तरीही ही घटनादुरुस्ती रद्द होऊ लागली. शेवटी इंदिरा गांधींच्या शिफारशीवरून ही घटनादुरुस्ती फेर तपासणीसाठी १३ न्यायाधिशांच्या खंडपीठासमोरील केशवानंद भारती खटला निकालात काढताना २४ एप्रिल १९७३ रोजी ७ विरुद्ध ६ न्यायाधिशांनी परिशिष्ट - ९ ला थरथरती मान्यता देताना 'संविधानाचा मूळ ढाचा' (Basic Structure) हे सूत्र मांडले (AIR1973 SC 1461) या दोन्ही खटल्यांमध्ये शेतकऱ्यांच्या वतीने कुणीही बाजू मांडली नाही.

घटनादुरुस्तीमुळे एकाच देशातील नागरिकांमध्ये भेदभावपूर्ण आर्थिक फाळणी केल्यामुळे 'संविधानाचा मूळ ढाचा' बदलला नाही का? हा प्रश्न शेतकरी आत्महत्या करून न्यायदेवतेला विचारत आहे.

**ॲड. सुभाष खंडागळे**
पुसद - ४४५ २१५ जि. यवतमाळ
मो.नं. ९८५००१४०३९
adv.khandagale@gmail.com

■■

# पोशिंद्यांच्या घरावर तुळशीपत्र

**[ कांद्याचे भाव सरकार कोसळवतात, असे लक्षात आल्यावर भाजपनेही दिल्लीमध्ये जेव्हा जेव्हा कांद्याचे भाव वाढतील तेव्हा तेव्हा सरकारी कांदा वाटप सुरू करण्याची योजना राबविली आहे. शीला दीक्षितांनी तर याचा फारच धसका घेतलेला आहे. दिल्लीत कांद्याचे भाव वाढले असे पेपरमध्ये आल्याबरोबर त्या दुसऱ्या दिवशी स्वस्तात कांदा वितरण करणारी केंद्रे सरकार सुरू करणार असल्याची घोषणा लगेच करतात. कांदा वाटप वाजवी भावात करण्याची केंद्रेही लगेच दुसऱ्या दिवशीही सुरू होतात. त्यांनी कांद्याची साठेबाजी करण्याची केंद्रे गुपचूपपणे दिल्लीमध्ये चालविली आहेत की काय, अशी शंका शेतकऱ्यांना येईल, इतक्या झटपट हे आता घडायला लागले आहे. ]**

निवडणुका जवळ आल्या की, मतदारांना भूलविण्यासाठी राजकीय पक्ष विविध योजनांच्या घोषणा करतात, सत्तेत असलेल्यांना सूटसबसिडीच्या योजना सरकारच्या खजिन्यातून देण्याच्या घोषणा करता येतात. निवडून आल्यानंतर त्यांची अंमलबजावणी कशी होते याचे उत्तरदायित्व त्यांच्यावर फारसे नसते. निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळलीच पाहिजेत असे नाही. असे महाराष्ट्राच्या एका जबाबदार मुख्यमंत्र्यांनी म्हणून ठेवले आहे. सरकारच्या हातातील वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य यांची कितीही वासलात लागली तरी त्याबद्दल खंत व्यक्त न करता आम्ही निवडून आल्यानंतर हे सर्व सुरळीत करू, गेली पाच वर्षे आम्ही यासाठी काही करू शकलो नाहीत, याचे कारण विरोधी पक्ष, नैसर्गिक आपत्ती यांच्यावर खापर फोडून निवडून आल्यानंतरच्या पुढच्या पाच वर्षांत मात्र आम्ही या सर्व गोष्टी निश्चित करणार आहोत. काही पक्ष तर, हे आमचे केवळ आश्वासन नव्हे, तर वचन आहे! अशा शपथाही स्टेजवरून घेतात. मागच्या गेलेल्या पाच वर्षांत आणि पुढील पाच वर्षांत एकाच पक्षाचे सरकार राहिले किंवा बदलले, तरीही कारभारातील बदल मात्र, काडीमात्रही झालेला नसतो, हे लोकांनी वर्षानुवर्षे अनुभवलेले असते. मागचं विसरून लोकही सत्ताधारी पक्षाला किंवा कधी विरोधी पक्षाला पुन्हा मतदान करतात. निवडून आलेल्या पक्षाच्या विरोधात पाच वर्षे उपोषणे, धरणे, आंदोलने, विरोधी पक्षांच्या साहाय्याने करतात. ही लपवाछपवी वर्षानुवर्षे चालूच आहे. याची आठवण येण्याचे कारण म्हणजे मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. मुंबईतील पावसाळ्यात पाणी साठणे, घाणीचे साम्राज्य आणि खड्डे हे सध्या लोकांच्या जीवनामरणाच्या प्रश्नाइतके गंभीर झाले आहे. सत्ताधारी पक्षाने निवडून आल्यानंतर एकही खड्डा दिसणार नाही, असे आश्वासन दिले आहे. पण सर्वांनीच खड्ड्यांबद्दलच बोलून कसे चालेल? केवळ मुंबईतच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात नवनिर्माणाची हाक देणाऱ्या पक्षाला मुंबईत निवडून येण्याची फार मोठी संधी चालून आल्यासारखे वाटत आहे. खड्डे तर बुजवणारच; पण तेवढ्याने मतदारांवर प्रभाव कसा पडेल. नेहमी गरिबांची सेवा, गरिबांचा कैवार आणि त्यासाठी दिली जाणारी आश्वासने, असा काहीतरी मालमसाला, घोषणांमध्ये असला पाहिजे, यासाठी राज ठाकरे यांनी, निवडणुकीच्या तोंडावर शहरामध्ये १५-१६ धान्य व भाजीपाला स्वस्तात विक्री करणाऱ्या मोबाईल व्हॅन सुरू केल्या आहेत. लवकरच ही संख्या '६५' पर्यंत नेण्याची त्यांची योजना आहे. स्वस्तात धान्य, भाजीपाला देणार! याचा नक्कीच मतदारांवर प्रभाव पडतो. राजकीय पक्ष काय काय खातात? हे मतदारांना माहीत असते. आपण निदान निवडणुकीच्या वेळी, त्यांनी वाटलेले पैसे, गाड्या, गाड्यांतून फिरणे, हॉटेलचे जेवण एवढेतरी पदरात पाडून घ्यावे, अशी इच्छा असलेली मतदारांची मोठी संख्या असते. धान्य व भाजीपाला कुणी स्वस्तात देत असेल, तर तेही नसे थोडके, अशी स्वतःची समजूत घालून मतदार नक्कीच मतदान करतील. वीज, पाणी, रस्ते, आरोग्य, यांचा त्यांना विसर पडू शकतो.



ज्ञानेश्वर शेलार

ही योजना सुरू करणे म्हणजे आपल्याला काही देणे घेणे नाही, शेतकऱ्यांचा माल,

स्वस्तात घ्यायचा आणि तो शहरी ग्राहकांना स्वस्तात विकायचा, अशी साधी योजना आहे. शेवटी शेतकऱ्यांच्या मालाच्या किमती पडतील, हे निश्चित, बाजारभाव वेगवेगळ्या मार्गानं सरकार पाडण्याचे प्रयत्न करतच असते. एखाद्या पक्षाने निवडून येण्याअगोदरच शेतीमालाचे भाव पाडण्याचे हे कदाचित पहिले उदाहरण असेल. सरकारच्या विरोधात धरणे, मोर्चे, रास्ता रोको करता येईल, अशा पक्षांच्या विरोधात शेतकऱ्यांनी काय करावे?

या अगोदरही शिवसेनेची सत्ता राज्यात येण्याअगोदर पाच वस्तुंचे भाव आम्ही वाढू देणार नाहीत, असे या पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात आणि जाहीर सभांमध्ये सांगितले. या पाच वस्तू कोणत्या होत्या, तर गहू, तांदूळ, साखर, तेल आणि दाळी. म्हणजेच शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाला आम्ही निवडून आल्यावर भाव मिळू देणार नाहीत. असे चक्क जाहीरनाम्यात लिहून देण्याचे आणि शेतकऱ्यांच्याच जाहीर सभांमध्ये हे आश्वासन नव्हे तर वचन देण्याचे घडून गेले आहे. शेतकऱ्यांचा माल आणि सरकार वाटणार, सरकारचा आणि पक्षाचा यात काहीच तोटा नाही, तोटा असेल तर तो फक्त शेतकऱ्यांचा!

शेतकऱ्यांनाही वाटत असेल की, कमी भावात शेतीमाल उपलब्ध करून देणार, याचा अर्थ आपल्याकडून तो हमी भावात घेऊन, ग्राहकांना तो कमी भावात दिला जाईल, आपले त्यात काय नुकसान. ही बाब एवढी साधी सरळ नाही. आपण एखादी वस्तू विकत असलो आणि शेजारचा दुकानदारही, तीच वस्तू कमी भावाने विकत असेल, तर त्याचा आपल्या विक्रीवरही परिणाम होतो. मोठ्या प्रमाणावर सरकारी पैशाने खरेदी करून जर हा माल बाजारात उतरविण्यात आला तर, त्याचा परिणाम नक्कीच शेतीमालाच्या भावावर होतो. सरकार खरेदी करीत असलेल्या शिधा वाटप योजनेमुळेही शेतीमालाचे भाव कमी राहतात, याची जाणीव शेतकऱ्यांना झाली पाहिजे. बऱ्याचदा शेतकरीच उत्पादन आल्यामुळे हंगामात कमी भावात माल विकतात आणि पुन्हा रेशनच्या दुकानासमोरही जेव्हा त्यांच्याकडे माल नसेल, तेव्हा गहू, तांदूळ, तेल, साखर यासाठी रांगा लावतात. अशा प्रकारच्या योजनांमुळे शेतीमालाला भाव मिळणार नाहीत आणि त्याची तोट्याच्या दुष्टचक्रातून सुटकाही होणार नाही.

शिवसेनेच्या काळातच फार मोठा गाजावाजा करून झुणका-भाकर योजना राबविण्यात आली. गरिबांना एक रुपयात जेवण मिळावे अशी ही योजना होती. यासाठी तालुकापातळीपर्यंतच्या शहरांमध्ये मोक्याच्या जागी जागांचे वाटप करण्यात आले. अर्थात त्यामध्ये सगळे मावळेच असतील, याचीही काळजी घेण्यात आली. त्या काळी लोक ज्वारीचा भाव कमी असल्यामुळे आणि एक रुपयात जेवण मिळत असल्यामुळे 'जेवायला एक रुपया' आणि 'हागायला दोन रुपये' असे विनोदाने म्हणत असत. सार्वजनिक ठिकाणी - बसस्थानक, रेल्वेस्थानक येथे त्यावेळी दोन रुपये द्यावे लागत असत. शेतीमालाच्या भावाची एवढी कवडीमोल किंमत आणि माती झालेली कदाचित पाठीमागेही कुणी बघितली नसेल आणि भविष्यातही कुणी बघणार नाही. नंतर ही योजना बासनात गुंडाळली गेली. जागा मात्र त्या त्या कार्यकर्त्यांच्या ताब्यात राहिल्या. अजूनही त्यांची हॉटेल्स त्या ठिकाणी बऱ्यापैकी चालू आहेत.

मुंबईसारख्या शहरात ५०-६० वर्षांपूर्वी जे लोक नशिब काढण्यासाठी आले आणि पुढे आपापल्या क्षेत्रात मोठे नाव कमावले त्या सर्वांच्या आत्मचरित्रात किंवा आत्मकथनात आम्ही स्ट्रगलच्या काळात फुटपाथवर झोपलो आणि वडा पाव खाऊन दिवस काढले, असे सांगितले जाते. वडा पाव हा मुंबईतील गरिबांच्या पोटाचा मोठा आधार आहे. या वडापाववर काही परप्रांतीयांचा अधिकार असल्यामुळे मध्यंतरी शिवसेनेने शिववडा सुरू केला. परप्रांतीयांना हुसकावणे हा त्याचा मूळ हेतू असला तरी, हाही माल शेतीमाल होता, हे विसरून चालणार नाही. शिवसेनेला शह देण्यासाठी नारायण राणेंच्या निलेशने छत्रपती वडा सुरू केला. अगदी आमनेसामने वड्याच्या गाड्या लागल्याने काही काळ तंग वातावरण झाले. शिववड्यामध्ये भावना दुखावण्यासारखे कुणालाच काही वाटले नाही; पण छत्रपतींच्या नावाने वडा विकणे हे माझ्यासारख्या तमाम छत्रपतींच्या अवमानास कारणीभूत ठरून आमचे रक्त सळसळले. तीनशे वर्षांपूर्वी, ज्या त्वेषाने आम्ही मोगलांविरुद्ध लढलो त्याच त्वेषाने आम्ही आमचे छत्र कायम ठेवण्यासाठी छत्रपती वड्याला विरोध करून निलेशचा वडा बंद पाडला. कुणालाही गरिबांसाठी काही करायचे असेल, तर ते सर्व शेतीमालावर अवलंबून असलेले आणि शेतीमालाचे बाजारभाव पडतील अशाच योजना कशा काय सूचतात. याचे उत्तर शेतकऱ्यांना अद्यापही सुचलेले नाही.

कांद्याचे भाव सरकार कोसळवतात, असे लक्षात आल्यावर भाजपनेही दिल्लीमध्ये जेव्हा जेव्हा कांद्याचे भाव वाढतील तेव्हा तेव्हा सरकारी कांदा वाटप सुरू करण्याची योजना राबविली आहे. शीला दीक्षितांनी तर याचा फारच धसका घेतलेला आहे. दिल्लीत कांद्याचे भाव वाढले असे पेपरमध्ये आल्याबरोबर त्या दुसऱ्या दिवशी स्वस्तात कांदा वितरण करणारी केंद्रे सरकार सुरू करणार असल्याची घोषणा लगेच करतात. कांदा वाटप वाजवी भावात करण्याची केंद्रेही लगेच दुसऱ्या दिवशीही सुरू होतात. त्यांनी कांद्याची साठेबाजी करण्याची केंद्रे गुपचूपपणे दिल्लीमध्ये चालविली आहेत की काय, अशी शंका शेतकऱ्यांना येईल, इतक्या झटपट हे आता घडायला लागले आहे. कांद्याचे भाव वाढल्यानंतर सर्वप्रथम शीला दीक्षित यांचीच साठेबाजांच्या यादीत नाव येईल की काय? असे आता शेतकऱ्यांना वाटत आहे. कांदा शेतीतच पिकतो. त्यामुळे इथेही निवडणुकीत जिंकण्यासाठी नसेल तर किमान राज्य टिकवण्यासाठी कमी भावात शेतीमाल हेच तंत्र वापरले जाते.

काँग्रेसने मोठा गाजावाजा करत देशामध्ये 'अन्नसुरक्षा विधेयक' आणून ८५% लोकांना कमी दराने अन्न पुरवठा करण्याची योजना आखली आहे. खरेतर देशात २०% गरिबांची संख्या आहे आणि ते दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत. एक वेळच्या जेवणासाठीही ही लोकसंख्या मोदात आहे. त्यांच्या हातातोंडाची गाठ ही दिवसातून केव्हातरीच पडते आणि त्यातही पोट भरत नाही. ही कुपोषित जनता २०% आहे. काँग्रेसने मात्र हा आकडा ८० टक्क्यांपर्यंत वाढवून त्याप्रमाणे योजना तयार केली आहे. या योजनेअंतर्गत, ८०% लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत (रेशन) स्वस्त धान्य पुरवण्याचा, घाट घालण्यात आला आहे. सध्याच या योजनेतील २५% ही धान्य गरिबांपर्यंत पोहोचत नाही. देशातील परिस्थिती अशी आहे की, दक्षिण भारतातील या वितरण व्यवस्थेमार्फत पोहोचणारे धान्य १०% आहे.

**पान क्र. १० पाहा**

# व्यक्तीकेंद्रीत समाज आणि राष्ट्रीयत्व

## कमालीचा व्यक्तीकेंद्रीत होणारा समाज राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने कितपत धोकादायक आहे?

**[ जगाच्या पाठीवर अशा विचारसरण्या आल्या की त्यानंतर मोठ्या उलथापालथी होऊन काही काळाने त्या फोल असल्याच्या समजून आल्या. जसे रशिया, पूर्वजर्मनी, बोल्शेविक राष्ट्रांतील झालेले राजकीय, आर्थिक धोरणात्मक बदल; परंतु या विचारसरणीच्या काळात अनेक नेतृत्वे गगनाला भिडली. पुढे त्यांच्या पश्चात ती फोल ठरल्याने लोकांनी, त्यांच्या पुतळ्यावरदेखील राग व्यक्त केला. 'व्यक्तीकेंद्रीत होणारा समाज' व त्याच्या जडणघडणीवर आपल्या देशातील धर्म, जाती, प्रांत इतिहास, राजकारण, अर्थकारण दारिद्र्य, भौगोलिक परिस्थिती, रुढी, परंपरावाद, विकास अशा अनेक बाबींच्या प्रभाव आहे हे वेळोवेळी दिसले आहे. त्यामुळे 'कमालीचा व्यक्तीकेंद्रीत होणारा समाज राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिने कसा आहे याचा विचार व्हायला हवा. ]**

देशात सध्या कोणता विषय प्रकर्षाने पुढे आला आहे? कोणता विषय जनतेच्या मेंदूत घर करून बसला आहे? कोणत्याविषयाबद्दल आपुलकी अथवा चीड तयार झाली आहे? आणि अशा विषयाबद्दल लोक कसा विचार करतात? हे समजून घेऊन त्यावर व्यक्तींनी, संघटनांनी, पक्षांनी, संस्थांनी आवाज उठवला तर लोक तिकडे खेचले जातात. हे अनेकवेळा दिसून आले आहे. बऱ्याचवेळा जुनाट पण लोकांना आवडणारा विषय हातात घेऊन, जनजागृती करत गेल्याने काही विषय ऐरणीवर येऊन आंदोलन, चर्चा, उद्रेक घडल्याचीही उदाहरणे आहेत. अशा आंदोलनांतून, चळवळीतून नेतृत्वाला झळाळी मिळत राहते. खरे तर ती झळाळी त्या त्या विषयाशी, काळाशी संबंधित असते. असे नेतृत्व जर क्रियाशील राहिले, वेगवेगळे लोकहीत दाखवणारे प्रश्न हातात घेऊन जनतेपुढे जात राहिले तर तितका काळ नेतृत्व करणारी व्यक्ती लोकांना आपल्याकडे खेचण्यात यशस्वी झाल्याची शेकडो उदाहरणे आपल्याला दिसतील.

ऐतिहासिक काळापासून हे घडत आले आहे. रूढ चौकटीच्या पलीकडे जाऊन, वेगवेगळ्या वाटेने जाणारे, वेगळ्या वाटेने जाणारे, वेगळ्या वाटेने विचार मांडणारे, त्याला कृतीची जोड देणारे व ही कृती करत असताना त्यात हजारो, लाखो लोकांना सामील करून घेणारी नेतृत्वे जगाच्या पाठीवर तयार झाली. मोठी झाली. त्यातील अनेकांना हयातीत अवहेलना सोसावी लागली. अशा वेळी कधी या प्रश्नांचे तत्कालिक महत्त्व लोकांना वाटले. तर कधी दीर्घकालीन महत्त्व वाटले.



संजय कोले

कधी असा प्रश्न धर्माचा, जातीचा होता, कधी प्रांताचा होता, आर्थिक, सामाजिक, राष्ट्रीय, भावनिक, भ्रष्टाचार, राजकीय इत्यादींचाही होता.

ताजे उदाहरण 'लोकपाल, जनलोकपाल' विधेयकाबाबत, भ्रष्टाचार निर्मूलनाबाबतचे अण्णा हजारे यांचे आंदोलन, लाखो लोक रस्त्याव उतरले. अत्यंत शांतपणे, कुठेही हिंसा न घडवता काही दिवस हे आंदोलन देशभर नव्हे बाहेरही झाले. देशाला पोखरणारा भ्रष्टाचार की ज्यामुळे गल्लीपासून दिल्लीपर्यंत जनता भरडून निघाली आहे. ज्यांना निवडून दिले त्या मंत्र्यांचे हजारो, लाखो कोटींचे घोटाळे उघडकीला आल्याने देश खडबडून जागा झाला. अशा वेळी अरविंद केजरीवाल, किरण बेदी, शांतीभूषण पितापूत्र (टीम अण्णा) इत्यादींनी आंदोलन उभे केले. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा पद्धतशीरपणे उपयोग करून घेतला. 'अण्णांचे' नेतृत्व उभे केले. मला प्रश्न पडतो, अण्णा स्वच्छ चारित्र्याचे, अनेक वर्षांपासून समाजकारण करत असलेले आहेत. त्यांचे व्यक्तीमत्व पाहता व या देशाची जी मानसिकता घडली आहे त्यात अण्णा केंद्रस्थानी राहिले म्हणून हा उठाव झाला. तिथे अण्णांऐवजी किरण बेदी, अरविंद केजरीवाल, शांतीभूषण किंवा अन्य कोणी उपोषणाला बसले असते तर? तेही उच्चशिक्षीत, स्वच्छ चारित्र्याचे, समाजकारण करणारे, इतकेच नव्हे तर अभ्यासू होते. मग लोकांनी त्यांच्याबाबत इतकी उत्स्फूर्तता दाखवली असती का?

लोक आजही कशा प्रकारचे नेतृत्व स्वीकारतात? महात्मा गांधींच्या व्यक्तीमत्त्वाचा

प्रभाव आजही समाजावर आहे हे दिसून येते. एकीकडे महात्मा गांधींची काँग्रेस ही आमचीच असे सगळे काँग्रेसवाले म्हणतात. त्यांना उठता बसता गांधी लागतात. तीच केंद्रात सत्ता भोगते. तिच्या सरकारात प्रचंड भ्रष्टाचार आहे. लोक पिडले गेले आहेत. काँग्रेसच्या प्रत्येक पोस्टरवर, प्रत्येक भाषणात, जडणघडणीत महात्माजींना (गांधींना) खेचले आहे. त्याच गांधींच्या पोस्टरसमोर अण्णा उपोषण करतात व जनता तिकडे खेचली जाते. हे काय सूत्र आहे याचा अभ्यास व्हायला हवा.

या आंदोलनावेळी अण्णांच्याबद्दल एखादी जरी काळी बाजू पुढे आली असती तरी लोकांनी ती खोटी मानली असती, कारण उठाव, सरकार, राजकारणी, नोकरशाही, व्यवस्थेविरुद्धचा होता. गेल्या कित्येक वर्षांत समाजमन त्या दिशेने घडत गेले. तशातच मोठ्या रकमांचे भ्रष्टाचार उघडकीला आले. ती वेळ बरोबर पकडल्याने आंदोलन मोठ्या प्रमाणात घडले.

आणीबाणी काळात घडलेले समाजमन, बोफोर्सचा घोटाळा उघड झाल्यावरचे समाजमन, राममंदीराचे समाजमन व इंदिरा गांधी, राजीव गांधी हत्येनंतरचे समाजमन, गोध्राहत्याकांडानंतरचे समाजमन, आताचे जनलोकपाल विधेयकाबाबतच्या अण्णांच्या उपोषणावेळचे समाजमन एकसारखे आहे. फरक आहे तो पूर्वीच्या घटनांत 'मतदानाद्वारे' उद्रेक घडला, काही वेळा दंगली घडलय असा उद्रेक घडवण्यात त्यावेळचे विरोधी पक्ष अग्रेसर होते. अण्णांच्या बाबत राजकीय काही दिसत नसल्याने रस्त्यावरचा उद्रेक ठळक दिसला.

आणीबाणीत जयप्रकाश नारायणांचे नेतृत्व ठळक झाले. बोफोर्समध्ये व्ही.पी.सिंग, राममंदीर प्रश्नी वाजपेयी, अडवाणी ठळक झाले. या व्यक्तीकेंद्रीत समाजाला पुढे काय मिळाले? जे नेतृत्व केंद्रस्थानी राहिले त्याच्यामुळे देशाची काय प्रगती घडली, किती प्रश्न मार्गी लागले. आणीबाणीनंतर बरीच नेतृत्वे ठळक बनली.

चंद्रशेखर (मा. पंतप्रधान) भाषणात नेहमी म्हणायचे की, जिस देशका बचपना भूखा हो, उस देश की जवानी क्या होगी? एका कार्यकर्त्याने त्यांना विचारले, 'चंद्रशेखरजी खरेच या देशाची जवानी कशी असेल?' ते म्हणाले, 'मलाही माहीत नाही.' प्रश्न तयार करणाऱ्यांना, प्रश्नाचे उत्तर माहीत नव्हते; पण ते चळवळीच्या केंद्रस्थानी होते. समाज कोट्यवधींच्या समुहाने त्यांच्यामागे आंधळेपणाने जात होता.

राममंदीर प्रश्नाद्वारे हिंदूमनांना खेचण्यात हिंदुत्ववादी पक्ष यशस्वी झाले. पुढे ते सत्तेत आले. बांधले राममंदीर? जर सत्ता आल्यानंतरही बांधणे शक्य नव्हते तर त्यापूर्वी जे घडले व त्यासाठी कोट्यवधी लोक नेतृत्वाकडे खेचले गेले त्या लोकांना त्याचे सकारात्मक उत्तर मिळाले का? तेच बोफोर्स प्रकरणाचे. त्यात सामील लोकांना झाली शिक्षा? पण सत्तांतर घडवले.

व्यक्ती केंद्रीत समाज होत राहतो. लोकांची जडणघडण, मानसिकता ज्यांनी ओळखली ती नेतृत्वे इथल्या समाजाने मोठी केली. उलट खरे समाजहीत ज्यात आहे ते प्रश्न घेऊन नेतृत्व करायला गेलेल्या अनेकांना लोकांनी 'धूळ चारली आहे' असे र.धो. कर्वे, साने गुरुजी, बाबासाहेब आंबेडकर, शरद जोशी इत्यादी. आपल्या देशातील लोकांची मानसिकता इथल्या स्वार्थी लोकांनी आपल्या सोईने घडवण्याचीही उदाहरणे आहेत व सध्या समाजाला आपल्या सोईने कसे वळवता येईल याची यंत्रणा असलेले पक्ष या देशात कार्यरत आहेत. खरे तर मुंबईवरील (ताज हॉटेल, छ. शिवाजी टर्मिनस, कामा हॉस्पिटल इत्यादी ठिकाणच्या) अतिरेकी हल्ल्यानंतर केंद्र, राज्य सरकारच्या गलथानपणाच्या ज्या गोष्टी समोर आल्या त्या पाहता राज्यात राष्ट्रीय, राष्ट्रवादी काँग्रेसला बहुमत मिळणे दुरापास्त आहे असे वाटत होते; पण झाले उलटे. हे उलटे करायचे या पक्षांना चांगले माहीत आहे. झालेल्या घटनेतून आपणाकडे समाजमन वळवण्याचे हे या मंडळींना जमते. समूहाच्या मागून जाण्याची देशातील लोकांची परंपरा अनेकवेळा दिसून आली. केवळ समाज हिताच्याच नव्हे तर समाजविरोधी दंगलीवेळीही 'व्यक्तीकेंद्रीत' मानसिकतेतून अनेक घटना घडल्या आहेत.

या देशातील लोक असे व्यक्तीकेंद्रीत होऊन मोठ्या प्रमाणात काहीतरी करीत राहिल्याची अनेक उदाहरणे आहेत. केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तींनी समाजाच्या ज्या अपेक्षा वाढवल्या त्याची कणभरही पूर्ती न करता समाजाला तोंडघशी पाडल्याची उदाहरणे आपण पाहिली. त्यातून ज्या हेतूने समाज एकत्र आला. तो हेतू धरून कोणी प्रामाणिकपणे नेतृत्व करू लागला तर अगोदर दुधाने तोंड पोळल्याने नंतर ताक फुंकून पिण्यासारखाच पाठींबा अशांना मिळून ती नेतृत्वे समाजाने संपवली. यासाठी जनतेच्या दृष्टीने जे हिताचे आहे व अशा हतासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यक्तीचा 'शोध' झाल्यानंतरच व्यक्तीकेंद्रीत समाज व्हायला हवा. जनतेला नेतृत्व लागते, हे खरे आहे; परंतु ते अल्पमतीने, आंधळेपणाने स्वीकारलेले नसावे.

जगाच्या पाठीवर अशा विचारसरण्या आल्या की त्यानंतर मोठ्या उलथापालथी होऊन काही काळाने त्या फोल असल्याच्या समजून आल्या. जसे रशिया, पूर्वजर्मनी, बोल्शेविक राष्ट्रांतील झालेले राजकीय, आर्थिक धोरणात्मक बदल; परंतु या विचारसरणीच्या काळात अनेक नेतृत्वे गगनाला भिडली. पुढे त्यांच्या पश्चात ती फोल ठरल्याने लोकांनी, त्यांच्या पुतळ्यावरदेखील राग व्यक्त केला. 'व्यक्तीकेंद्रीत होणारा समाज' व त्याच्या जडणघडणीवर आपल्या देशातील धर्म, जाती, प्रांत इतिहास, राजकारण, अर्थकारण दारिद्र्य, भौगोलिक परिस्थिती, रुढी, परंपरावाद, विकास अशा अनेक बाबींच्या प्रभाव आहे हे वेळोवेळी दिसले आहे. त्यामुळे 'कमालीचा व्यक्तीकेंद्रीत होणारा समाज राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिने कसा आहे याचा विचार व्हायला हवा. नेतृत्व पारखून घ्यायला शिकले पाहिजे समुहा बरोबर वाहत जाण्याची पद्धती सर्वांत जास्त धोकादायक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीतील आंदोलक नेते यांच्याबद्दलल संपूर्ण माहिती समाजाला नसे. कारण आजच्या सारखी छापील प्रसिद्धी माध्यमे, दूरचित्रवाहिन्या, रेडिओ इ. लोकांना उपलब्ध नव्हते त्यामुळे त्यावेळची काँग्रेस देवदुतांची काँग्रेस वाटायची. त्यामुळे जनता काँग्रेसमय झाली होती. त्या काळातील सर्वच नेतृत्वे खरेच देवदुतासारखी होती का? यातील स्वातंत्र्यानंतर सत्तेत गेलेले बरेच जण बरबटलेले आढळले ज्या प्रकारचा देश घडेल असे सांगण्यात आले तसा घडवला का?

अशा वेळी व्यक्तीकेंद्रीत होणाऱ्या समाजाला वाट्याला निराशाच आली. प्रगत राष्ट्रात नेतृत्वे आहेत. त्यांच्या मागून तेथील समाज कोणत्या विचाराने जातो हे पाहायला हवे तिथेही निराशा वाट्याला येत असेलच; परंतु झालेल्या प्रगतीकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

समाजाला नेतृत्व लागतेच ज्या नेतृत्वामागे लोकसमूह आहे, तो समूह व्यक्तिकेंद्रीत आहे. आपल्या देशात अशांपैकी अनेकांनी खरेच उत्तम कार्य आहे; परंतु दुसरीकडे 'समाज फसवल्याची' भरपूर उदाहरणे आजही घडताहेत.

महाराज, बुवा, बाबा यांच्या नादी लागलेला, अंधश्रद्धेत अडकलेला हा समाज आहे. पुढे ही सर्व मंडळी सत्य उघडे पडले तरी भोळी भक्ती करतच राहतात. काहीजण दुसरा बाबा, महाराज, बुवा पकडतात. असे बाबा त्यात सत्यसाई, नित्यानंद, शंकराचार्य वगैरे आहेत त्यामुळे व्यक्तिकेंद्रीत समाज हा जणू संमोहीत झालेला असतो. ते संमोहन काही जणांना आयुष्यभर साथसंगत करते. भारतात असे प्रकार फार झालेत. अजूनही होताहेत. हे दुर्दैवी आहे. वस्तु, बियाणे पारखून घ्यावे तसे नेतृत्व, गुरू, पक्ष, पंथ, धर्म पारखून, अभ्यासून घ्यायला हवेत ही सवय या देशातील नागरिकांना लागो.

अण्णा हजारेंच्या आंदोलनात आणखी एक बाब ठळक झाली, प्रसिध्दी प्रसारमाध्यमांनी आंदोलन वाऱ्यासारखे पसरले, या माध्यमांनी व्यक्तीमहत्त्व वाढताना दक्षता घ्यायला हवी नाहीतर 'गणपती दूध पितो' या घटनेसारखी परिस्थिती तयार होते हे दिसून आले आहे. मानवी मेदू आपल्याकडे खेचण्यात ही माध्यमे यशस्वी ठरली आहेत. देशात अध्यक्षीय लोकशाही पद्धती असावी का नसावी यावर अनेकदा चर्चा होते मग अध्यक्षपदासाठी सचिन तेंडूलकर, सलमान खान, अमिताभ बच्चन उभे राहीले तर हेच जिंकतील असे सांगितले जाते, हेही खरे आहे. क्रिकेट, सिनेमा या क्षेत्रांत असलेली व्यक्ती राजकारणात यशस्वी होईलच असे नाही; परंतु असा विचार कोणी करत नाहीत. वैचारिक गल्लत होत आल्याने यापूर्वी भल्याभल्यांना या नटनट्यांनी निवडणुकीत हरवले आहे. त्यामुळे कमालीच्या व्यक्तीकेंद्रीत होणाऱ्या समाजाने त्या व्यक्तीचे चारित्र्य, विचार, कर्तृत्व, विश्वासार्हता, अनुभव, राष्ट्रप्रेम, विज्ञानवादी विचार, दशाला प्रगतीपथावर न्यायचा वकूब, व्यक्तीची, सहाकाऱ्यांची विश्वासार्हता अशा अनेक बाबींची खात्री करूनच अनुनय करावा नाहीतर राष्ट्रीयत्वाला कमालीचा धोका आहे


**संजय सुरेंद्र कोले**

मु.पो. तुंग ता. मिरज जि. सांगली

मो. ९८९०२०२५१२

sanjaykole@rediffmail.com


■■

**पान क्र. ७ वरून**

पश्चिम बंगालसारख्या राज्यात तर संपूर्ण धान्य काळ्या बाजारात विकले जाते, असे सरकारचेच म्हणणे आहे. अशा पद्धतीने ८५% लोकांना जर सरकार कमी किमतीत धान्य पुरवू लागले तर शेतकऱ्यांनी गाळलेल्या घामाचे दाम त्यांना केव्हा मिळेल. या योजनेतून सरकारी धान्य खरेदी त्यांची गोदामापर्यंत वाहतूक, साठवणूक आणि पुन्हा रेशन दुकानापर्यंत वाहतूक यांतून मोठे पैशांचे व्यवहार होतात. पुढारी आणि कार्यकर्त्यांना या सर्वांमध्ये मोठी संधी मिळते. एवढेच नव्हे तर, छोट्या-मोठ्या गावातील दुकानदारसुद्धा कुठल्यातरी पक्षाचे कार्यकर्ते असतात. त्याशिवाय त्यांना दुकान मिळत नाही आणि त्यांनी केलेल्या काळ्या बाजारावरही पडदा पडत राहतो. निवडणुकीच्या काळात ही सर्व मंडळी आपापल्या परीने मतांची, पैशांची आणि मनुष्यबळाची मदत करतात. निवडणुका नसतील तेव्हा विविध कार्यक्रमांसाठी आणि पक्षाच्या वाढीसाठी त्यांचा मोठा हातभार लागतो. माल मात्र शेतकऱ्यांचा कमी किमतीत घेतलेला असतो.

स्वातंत्र्यानंतरची बरीच वर्षे शेतकऱ्यांनी ज्वारी, गहू यांची लेव्ही घालण्यात घातली. शेतकऱ्याकडे माल पिकला नसेल, तर त्याने बाजारातून बाजारभावाने विकत घेऊन सरकारला कमी भावाने लेव्ही म्हणून द्यावा, असे कित्येक वर्षे चालले. एखाद्या गावाला दिलेले लेव्हीचे उद्दिष्ट पूर्ण झाले तर गावातून मिरवणुका काढणे इथपर्यंत शेतकऱ्यांनी आपलाच माल कमी भावात विकण्याची कमाल केलेली आहे. साखरेवर ३५% लेव्ही होती. शेतकरी संघटनेने सातत्याने लेव्हीच्या विरोधात आवाज उठविल्याने ती आता कमी झालेली असली तरी अजूनही १०% लेव्ही द्यावी लागते. हीच साखर कमी भावात पुन्हा शेतकऱ्यांपर्यंत येते. देशाचे ढोबळ चित्र असे आहे की, ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत आणि ७०% लोक गरीब आहेत. ३०% लोकांना अशा लेव्हीच्या साखर आणि धान्याची अजिबात गोडी नाही, मग आपण हे कमी भावात घेतलेले धान्य सरकारी गोदामात नेऊन पुन्हा त्यांच्यापर्यंत रेशन दुकानामार्फत पोहोचविण्याचा द्राविडी प्राणायाम केवळ शेतीमालाचे भाव पाडण्यासाठीच करतो का? मात्र काँग्रेसने ही योजना आता ८०% लोकांपर्यंत नेण्याचा घाट घातला आहे. नियोजन आयोगाने आणि तमात अर्थतज्ज्ञांनी याला विरोध केला आहे. गरिबांचे भले करायचे तर त्यांचाच माल घेऊन पुन्हा त्यांनाच विकायचा ही जादू किती दिवस चालणार?

महाराष्ट्रामध्ये जवळजवळ सर्व साखर कारखाने राष्ट्रवादीच्या ताब्यात आहेत. शेतकऱ्यांना उसाचा भाव परवडत नाही, म्हणून उग्र आंदोलने होत आहेत. भाव न परवडण्याचे लेव्ही साखर हे एक मोठे कारण आहे. कोणत्याही साखर कारखान्याच्या कार्यकारी मंडळाने १०% लेव्हीची साखर ही घेणे आता बंद करा, आम्ही आमचा साखरधंदा आमच्या स्वबळावर करू. ३५-४० वर्षे सहकारी बँक आणि नाबार्डच्या मार्फत सरकारने सहकारी साखर कारखान्यांना केली तेवढी मदत आता बस झाली. आम्ही आमच्या पायावर उभे राहू. साखर कारखानदारी सहकारी जोखडातून मुक्त करा, असे म्हटलेले नाही. तो राजकारणाचा पाया आहेच आणि तोटा झाला तर तो संचालक मंडळाचा कधीच होत नाही. तो होतो फक्त शेतकऱ्यांचा! शेवटी काय, सगळेच पक्ष निवडणुकीच्या काळात किंवा निवडून आल्यानंतर आश्वासने देतात ती, स्वस्त शेतीमालाची खैरात करण्याची! असे करता करता पोशिंद्याला आता आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याची वेळ आली आहे. माल शेतकऱ्यांचा आणि कमी भावात वाटणार मात्र पक्ष आणि पुढारी! पोशिंद्याच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा हा प्रकार आता थांबला पाहिजे!


**ज्ञानेश्वर शेलार**

मो. ९२२६७९७०१८


■■

# अण्णा आंदोलनाची छोटी जीत मोठी हार

**हिसार निवडणुकीने काँग्रेसची घसरण, भाजपचा न वाढलेला प्रभाव आणि अण्णा आंदोलनाच्या भूमिकेने भ्रष्टाचारी व जातीयवादी उमेदवारांना मिळालेल्या बळाने अण्णा आंदोलनाची वैचारिक दिवाळखोरीही वेशीवर टांगली गेली आहे. हिसारमध्ये आपल्यामुळे काँग्रेसची घसरण झाल्याची टिमकी अण्णा टीमला नक्कीच वाजविता येईल; पण आपणच आपल्या ध्येयाचा पराभव केल्याचे पडघमही अण्णा टीमला ऐकावे लागतील.**

हरियाणा राज्यातील हिसार मतदार संघातील लोकसभा पोटनिवडणुकीचा निकाल सर्वांना अपेक्षा होती तसाच लागला. तरीही या पोटनिवडणुकीचा निकाल चर्चेचा आणि वादाचा विषय बनला आहे. ही निवडणूक गाजली आणि गाजत आहे ती या निवडणुकीत अण्णा टीमने घेतलेल्या काँग्रेसविरोधी भूमिकेने. इतरांचे सोडा; पण ही भूमिका अण्णांच्या टीममध्येच मोठ्या चर्चेची व वादाची बनली आहे. जनलोकपाल बिल तयार करण्यात आणि कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री येडीयुरप्पा यांना जेलमध्ये जावे लागण्यात ज्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली होती ते अण्णाटीमचे ज्येष्ठ सदस्य न्यायमूर्ती संतोष हेगडे यांनी हिसारमध्ये अण्णा टीमने घेतलेल्या काँग्रेसविरोधी भूमिकेवर जोरदार टीका करून आपला विरोध जाहीरपणे प्रकट केला होता. प्रतिष्ठेचे मॅगसेसे पारितोषिक विजेते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेंद्र सिंह यांनी तर श्री. राजगोपाल या अन्य ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह टीमअण्णाला राम राम ठोकला. हिसारच्या काँग्रेसला विरोध करण्याच्या निर्णयाने काँग्रेसला जसा फटका बसला तसाच त्याचा टीमअण्णालाही फटका बसू लागला आहे. येता काही काळ श्री. अण्णा हजारे यांच्या निर्णयाचा प्रभाव भारतीय जनमानसावर आणि देशातील राजकीय प्रक्रियेवर पडणे अपरिहार्य असल्याने अण्णा आंदोलनाचे निर्णय व निर्णय घेण्याची त्यांची प्रक्रिया याची चिकित्सा होणे गरजेचे ठरते.

### अ-राजकीय सापळ्यात अडकलेले नेतृत्व

आंदोलनाचे दूरगामी परिणाम व्हायचे असतील तर त्या आंदोलनाची राजकीय भूमिका त्यासाठी महत्त्वाची ठरते. राजकीय भूमिका म्हणजे सत्तेत जाण्यासाठी निवडणूक लढविणे किंवा एखाद्या पक्षाला पाठींबा देणे किंवा त्याचा विरोध करणे एवढेच नसते. राजकीय भूमिकेत याचा समावेश असू शकतो; पण राजकीय भूमिकेसाठी या बाबी अपरिहार्य व अनिवार्य नाहीत. समाजासमोरील किंवा देशासमोरील प्रश्नांची व्यापक समज व त्याची उकल करण्याची दिशा याचे आकलन म्हणजे त्या-त्या पक्षाची, संघटनेची किंवा आंदोलनाची राजकीय भूमिकेचा हा खरा अर्थ होतो. या अर्थाने कोणतेच आंदोलन अराजकीय असत नाही. त्यामुळे अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाची काही राजकीय भूमिका असेल तर त्या बाबत कोणाचे मतभेद असू शकतात; पण राजकीय भूमिका घेतलीच कशी असा प्रश्न उपस्थित करणे गैर ठरते; पण हा जो प्रश्न उपस्थित झाला आहे तो आंदोलनाच्या नेत्याच्या आपण अ-राजकीय आहोत हे दाखविण्याच्या अट्टहासापायी. कारण या आंदोलनाच्या नेत्यांना राजकीय भूमिका म्हणजे प्रश्नांचे आकलन व्यक्त करणे असे न वाटता राजकीय भूमिका असणे म्हणजे चिखलात लोळण्यासारखे वाटते. या चिखलाने आपले कपडे खराब होऊ नये याची त्यांना काळजी लागून असल्याने राजकीय क्षेत्रात उतरूनही राजकीय भूमिका घेण्याचे टाळण्याचा या आंदोलनाने सतत प्रयत्न केला आहे. राजकारणात उतरलेले सगळेच चोर आणि भ्रष्ट आहेत आणि राजकारणाबाहेर असणारे सगळे साव असतात व आहेत या गंडाने अण्णा आंदोलनग्रस्त असल्याने व ही भूमिका लोकांच्या गळी उतरविण्यात आंदोलनाला यश आल्याने खरे तर आजचा वाद उभा राहिला आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार ज्या पद्धतीने कार्यरत (?) आहे ते बघता या पक्षाला विरोध करणे हा वादाचा मुद्दा होऊच शकत नव्हता; पण अण्णा आंदोलन ज्या पद्धतीने पुढे रेटण्यात येत आहे त्यातून अण्णा आंदोलनवादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. खरा वाद आंदोलनाने राजकीय भूमिका घेण्याचा नसून राजकीय भूमिकेचा संपूर्ण अभाव असल्याने एकाएकी निवडणुकीत काँग्रेस विरोधाचे पिल्लू आंदोलनाच्या पोतडीतून बाहेर पडल्याने सगळा गोंधळ उडाला आहे आणि घेतलेल्या भूमिकेने उडालेला गोंधळ बघून नेतृत्व जास्तच गोंधळून गेले आहे! आपल्याच अ-राजकीय सापळ्यात नेतृत्व आणि आंदोलन अडकले आहे. लोकांपर्यंत आणखी चुकीचे संदेश जाऊ नयेत म्हणून अण्णांनी मौनात जाण्याचा घेतलेला निर्णय हाच काय तो योग्य



सुधाकर जाधव

निर्णय म्हटला पाहिजे!

## हिसारमधील तर्कशून्य आणि तर्कदुष्ट भूमिका

काँग्रेस पक्षाने जनलोकपाल बिल हिवाळी अधिवेशनात मांडण्याचे व मंजूर करण्याचे लेखी आश्वासन दिले नाही असे कारण पुढे करून श्री. अण्णा हजारे यांनी हिसार लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसला मतदान न करण्याचे आवाहन केले. ज्यांना रामलीला मैदानाच्या उपोषण समाप्तीच्या वेळी जे घडले, जो समझौता झाला त्याचा विसर पडला असेल त्यांना अण्णांच्या भूमिकेत काही वावगे वाटणार नाही; पण ज्यांची स्मरणशक्ती ठीकठाक आहे त्यांना अण्णांच्या या निर्णयामागील तर्कहीनताच नव्हे तर तर्कदुष्टतादेखील लक्षात येईल. मागच्या लोकसभा अधिवेशनाच्या वेळी लगेच जनलोकपाल बिल मंजुर करण्याचा अण्णांचा आग्रह सरकारने फेटाळून लावला होता. हिवाळी अधिवेशनात जन लोकपाल बिल नव्हे तर कडक लोकपाल बिल आणण्याचे व मंजूर करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. त्यात अग्रक्रमाने ज्या तीन बाबींचा समावेश करण्याचा अण्णांचा आग्रह होता त्याबद्दल सरकारनेच नव्हे तर संसदेने सकारात्मक भूमिका घेतली होती. त्यानंतर अण्णांनी समाधानाने उपोषण सोडले होते. एवढेच नव्हे तर विजयोत्सव साजरा करण्याचे आवाहन आपल्या अनुयायांना केले होते आणि अनुयायांनीसुद्धा जल्लोष करण्यात कोणतीच कसर ठेवली नव्हती. लोकपाल मुद्दा मार्गी लागला आहे, तसाच निवडणूक सुधारणांचा प्रश्न धसास लावण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यावेळी अण्णांनी घोषित केले होते. आता त्यानंतर सरकारने झालेल्या समझौत्याचे पालन न करण्याचे कोणतेही संकेत दिले नसताना अण्णांनी पुन्हा लेखी आश्वासन मागण्याचे कारणच नव्हते. रामलीला मैदानाच्या उपोषणप्रसंगी जे काही घडले ते विचारपूर्वक आणि गांभीर्यपूर्वक घडले नसेल व निव्वळ उपोषणातून सुटका करून घेण्यासाठी दोन्ही बाजूंनी सहमतीने केलेले ते नाटक असेल तरच पुन्हा असे आश्वासन मागणे उचित ठरविता येईल. अन्यथा सरकार किंवा संसद यांवर अविश्वास दाखवायला नव्याने कोणतेही कारण आणि निमित्त दाखविता येत नाही. मुळात अण्णांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सरकार, संसद आणि राजकीय प्रक्रिया यांवरच विश्वास नसल्याने वाट बघणे म्हणजे व्यर्थ वेळ दवडण्यासारखे वाटते आणि मग कोणते तरी कारण पुढे करून आपला हेका रेटण्याचा प्रकार अण्णा आंदोलकांकडून वारंवार घडतो. हिवाळी अधिवेशनापर्यंत संयम बाळगून त्यात लोकपाल विधेयक पारित होण्याची वाट पहिली असती तर आंदोलनाच्या कार्यकर्त्यात व आंदोलन समर्थकांत आजची संभ्रमाची स्थिती निर्माण झाली नसती. काँग्रेसला अडचणीत आणण्याच्या प्रयत्नात टीमअण्णा स्वत:चं अडचणीत आली आहे. ज्या पारदर्शकतेचा आग्रह अण्णा आणि त्यांचा हनुमान म्हणवून घेणाऱ्या केजरीवाल यांनी वारंवार धरला आहे त्यांनीच आपल्या सहकाऱ्यांना अंधारात ठेवून हिसारचा निर्णय घेतला. अण्णांच्या कोरकमेटीत जी खळबळ उडाली आहे आणि मतभेद व मनभेद निर्माण झाले आहेत ते निर्णयापेक्षा निर्णय ज्या पद्धतीने झाला त्यामुळे झाले आहेत आणि ही अण्णा आंदोलनासाठी धोक्याची घंटा आहे.

टीमअण्णा हिसारमध्ये काँग्रेसविरोधी प्रचारात उतरली नसती तरी आज जो निकाल लागला त्यापेक्षा वेगळा निकाल लागला नसता असे बहुतांश राजकीय निरीक्षकांचे व विश्लेषकांचे मत आहे. काँग्रेसला २००९ साली अतिशय अनुकूल वातावरण असताना हरियाणातील ही जागा गमवावी लागली होती व तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. आताच्या प्रतिकूल वातावरणात काँग्रेसची स्थिती सुधारेल असा समज फक्त राजकीय अज्ञानीच करून घेऊ शकतात. एकमात्र खरे की २००९ पेक्षाही काँग्रेसची स्थिती वाईट झाली. यात अरविंद केजरीवाल यांच्या प्रचाराच्या पराक्रमाचा वाटा आहे की नाही हे सांगणे कठीण असले तरी एक गोष्ट ठामपणे सांगता येईल की अण्णा आंदोलनाने देशभरात जी काँग्रेसविरोधी लाट निर्माण केली आहे त्यामुळे काँग्रेस समर्थनात ८ ते १० टक्क्यांनी घट झाली आहे आणि एवढी घट सत्ता हातून जाण्यासाठी पुरेशी आहे; पण यातून दुसरा जो अर्थ निघतो तो असा आहे, की अण्णा आंदोलन ज्या ९०-९५ टक्के जनसमर्थनाचा दावा करीत आले आहे तो खरा नाही!

## संधी गमावली

चुकीच्या निर्णयाचा फटका टीमअण्णाला बसत असेल तर त्यासाठी हळहळ वाटण्याचे कारण नाही; पण दुसऱ्या महत्त्वाच्या कारणासाठी नक्कीच हळहळ वाटायला हवी. निवडणूक सुधारणांच्या दिशेने आंदोलनाला पुढे नेण्याची चालून आलेली संधी अण्णा आंदोलनाने गमावून आपली अपरिपक्वता दाखवून दिली आहे. रामलीला मैदानात उपोषण सोडताना ज्या निवडणूक सुधारणांवर काम करण्याचे सुतोवाच अण्णांनी केले होते त्यासाठी हिसारसारखे दुसरे आदर्श ठिकाण शोधूनही सापडले नसते! पैसा, जात, गुन्हेगारी आणि परिवारवाद या चार गोष्टींच्या अतिरेकाने आपली निवडणूक प्रक्रिया बाधित झाली आहे, नासली आहे. निवडणुका या भ्रष्टाचार आणि काळा पैसा निर्मितीचा आणि उपयोगाचा आखाडा बनत चालल्या आहेत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी निवडणूक सुधारणा तातडीने अंमलात आणणे गरजेचे बनत चालले आहे. लोकपाल आल्याने २-४ राजकीय नेत्यांना कदाचित तुरुंगवास घडेलही; पण भ्रष्टाचार व काळ्या पैशांच्या निर्मूलनाचा मार्ग निवडणूक सुधारणांमधून जातो यावर कोणाचे दुमत असू शकत नाही. हिसारची पोट निवडणूक अशा निवडणूक सुधारणांचा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी चालून आलेली संधी होती. पैसा, जात, गुन्हेगारी आणि परिवारवाद हे सगळे दुर्गुण हिसारमध्ये एकवटल्याचे चित्र होते. हे दुर्गुण नाकारण्यासाठी 'राईट टू रिजेक्ट' चे हत्यार पारजन्याची व लोकांच्या हाती देण्यासाठी काम करण्याची गरज होती. या निमित्ताने पैशांच्या वापराला पायबंद घालण्याचे काम आंदोलनाला करता आले असते. अण्णा आंदोलनाच्या आवाहनातून जर हिसार लोकसभा मतदार संघात मतदारांनी भ्रष्ट, अपराधी, जाती व परिवारवादाच्या जोरावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला नाकारले असते तर ती भारतीय राजकारणाला नवी दिशा देणारी क्रांतिकारी घटना ठरली असती. मुख्य म्हणजे ही बाब आंदोलनाच्या ध्येयपूर्तीच्या दिशेने पडलेले फार मोठे पाऊल ठरले असते. यातून अण्णा आंदोलनाचीही कसोटी लागली असती व लोक आंदोलनाच्या पाठीशी आहेत हे नि:संशयपणे सिद्ध करता आले असते. आज तर ज्यांना अण्णांच्या काँग्रेसविरोधी भूमिकेचा फायदा झाला तो विजयी उमेदवार आणि त्याचा पाठीराखा भारतीय जनता पक्षसुद्धा अण्णा आणि त्यांच्या टीमच्या भूमिकेने काही फरक पडल्याचे मान्य करायला तयार नाहीत. खरे तर विजयी भजनलाल पुत्राने भारतीय जनता पक्षाच्या पाठिंब्याने काहीच फरक पडला नसल्याचे सत्य सांगायला हवे

**पान क्र. २० पाहा**

# स्वच्छ समृद्ध जीवन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवीनच!

**उत्तरार्ध**

**[ आपल्या जीवनाला सर्व बाजूंनी वेढणारा भ्रष्टाचार आटोक्यात आणता येईल का आणि तो कसा आटोक्यात आणायचा हे माझ्या समोरचे प्रश्न आहेत. भ्रष्टाचारमुक्त समाजाचे स्वप्न कितीही उदात्त, आकर्षक वाटले तरी ते स्वप्नच राहणार हे ओळखण्याइतकी परिपक्वता, प्रौढता आता माझ्यामध्ये आलेली आहे. त्यामुळे काही व्यवहार्य शक्यतांचा विचार करणे एवढेच माझे उद्दिष्ट आहे. ]**

**सहा**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भ्रष्टाचार वाढला आणि गेल्या २५ वर्षात तो अनिर्बंध बोकाळला हे खरेच आहे पण त्याची रूढ कारणमीमांसा तपासून पाहणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात नीतिमत्ता जास्त दृढमूल होती, स्वातंत्र्य लढ्याचे राष्ट्रीय नेते स्वच्छ चारित्र्याचे होते, त्यांचा भ्रष्टचाऱ्यांना/दलालांना धाक होता. असे विश्लेषण केले जाते. तर गेल्या १५/१६ वर्षात आर्थिक उदारीकरण (अर्धवट का होईना) झाल्यामुळे देश परदेशी भांडवलाच्या विळख्यात सपडला व त्यातून भ्रष्टाचार पराकोटीला गेला असे दुसरे विश्लेषण मांडले जाते. या दोन्ही कारणमीमांसा कितपत खऱ्या आहेत? एक पिढी जाऊन दुसरी येण्यामध्ये जी १५/२० वर्षे जातात त्यातून एखादा नैतिक समजा अनैतिक होऊ शकतो काय? आणि परकीय भांडवल देशात येण्यापूर्वीचे अनेक घोटाळे इथल्याच कर्तृत्ववान दलालांनी केले नव्हते?

आर्थिक उत्कर्षाच्या संधींची संख्या आणि त्यांचा लाभ उठवू पाहणारांची संख्या यांचे प्रमाण कमालीचे व्यस्त झाले- एका संधीसाठी दहा, शंभर, हजार इच्छुक जमा झाले (साध्या पोलीस भरतीचे उदाहरण घेतले तरी हा मुद्दा स्पष्ट होईल) तर दलालांचे उखळ पांढरे होणार हे उघडच आहे. साधारण १२०० वर्षांपासून ते १९५० पर्यंत या देशावर आक्रमण करून इथे स्थायिक होणाऱ्यांनी राज्य केले. सुरूवातीच्या आक्रमकांनी इथली लूट बाहेर नेली. इस्लामी आक्रमकांनी त्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर केलेली लूट ताजमहाल सारख्या अवाढव्य खर्चाच्या छानछोकीवर खर्च केली, स्वतःच्या ऐषोआरामासाठी वापरली, परकी व्यापाऱ्यांकडून नजराणे घेऊन त्यांना करसवलती देऊन इथल्या उद्योजकांना गळफास लावला. त्यात प्रथम युरोपीय व नंतर मुख्यतः ब्रिटिश व्यापारी इथल्या सत्ताकारणात लक्ष घालू लागले- एका सत्ताधाऱ्याला दुसऱ्या विरुद्ध लष्करी मदत करून त्यांनी दोघांनाही षंढ करून व्यापार, संरक्षण या दोन्ही क्षेत्रात स्वतःचे वर्चस्व निर्माण केले, त्यापुढचा टप्पा प्रत्यक्ष भूमी काबीज करण्याचा- त्याची मुहूर्तमेढ प्लासीच्या लढाईमध्ये रोवली जाऊन नंतरच्या १०० वर्षातच बहुतांश भारत ईस्ट इंडिया कंपनी, तिचे अंकित राजे आणि हैदराबाद, अवध यांच्यासारखी विशाल पण दुबळी संस्थाने यांच्या ताब्यात गेला, मात्र अर्थव्यवस्थेच्या नाड्या मुख्यतः कंपनीच्या हातातच राहिल्या. उत्कर्षाच्या सर्व शक्यता नष्ट झाल्या.



विनय हर्डीकर

पुरोहितवर्ग आणि इतर उच्चवर्णीय झपाट्याने इंग्रजी शिकून या शोषण यंत्राचे भाग बनले; रक्षक वर्गाची सैन्यातली मक्तेदारी संपली कारण ब्रिटिशांनी स्वतंत्र पोलीस खाते उभे केले. हा एकेकाळीचा रक्षक वर्ग मोठ्या प्रमाात शेतीकडे वळला व त्या क्षेत्रावरचा माणसांचा बोजा वाढला. सरकारचे सतत वाढते कर, माणसांची वाढलेली संख्या, वारंवार पाचवीला पुजलेले दुष्काळ यांनी शेती भिकेली लागली, अर्थव्यवस्थेचा पायाच खिळखिळा झाला. या डळमळीत परिस्थितीतही व्यापारीवर्ग देशांतर्गत व्यापार करून नफा मिळवत होताच; त्या वर्गाकडे खाजगी सावकारी करण्याइतका नफा गोळा होणे साहजिकच होते. यातूनच मग 'शेठजी भटजी' ही नवी तिरस्करणीय जोडी बहुजनसमाजासमोर ठेवण्यात आली. शेतकऱ्यांना लुटणारे कायदे परकीय सत्ताधाऱ्यांनी बनवले आहेत, ब्राह्मण कारकून फक्त ते राबवण्याचे काम करतात, याच सरकारचे शेतीविषयक धोरणामुळे आपल्याला वारंवार सावकाराकडे जावे लागते हे सत्य स्वीकारण्यापेक्षा या (लष्करीदृष्ट्या) दुबळ्या वर्गाला आरोपीच्या पिंजऱ्यात (तत्त्वतः का होईना) उभे करणे सोपे वाटले.

ब्रिटिश अधिकाऱ्यांना लाच खाण्याची गरजच नव्हती कारण एकाच हुद्द्यावर काम करणाऱ्या भारतीय अधिकाऱ्यापेक्षा ब्रिटिश अधिकाऱ्याचा पगार कित्येक पट अधिक होता, शिवाय दरवर्षाला सहा महिन्यांची पगारी रजाही होती. इंग्लंडमधल्या मध्यमवर्गातले सुमार कर्तृत्वाचे तरूण भारतात किरकोळ नोकरी करून स्वतःच्या दिमतिस

१५/२० नोकर ठेवू शकत होते, असे ब्रिटीश लेखकांनीच नोंदवून ठेवले आहे. भारतासाठी (!) उभे केलेले सैन्य भारताबाहेर (इंग्रजांच्या सोयीसाठी) लढत होते त्याचाही खर्च भारताकडून वसूल केला जात होता आणि भारतीय कापूस अत्यल्प दरात खरेदी करून इंग्लंडमधल्या कापडगिरण्यांना पुरवला जात होता. लुटीचे हे तीन मार्ग कमी पडले म्हणून की काय ब्रिटीशांनी या देशातल्या उद्योजकतेचा गळा घोटण्याठी सरकारी परवान्यांचे राज्य आणले, आणि भारतीयांचा संपत्ती निर्माण करण्यचा मार्ग खुंटला.

स्वातंत्र्यपूर्व काळात भ्रष्टाचार नव्हता कारण संपत्ती निर्माण करण्याच्या संधीच्या मुसक्याच आवळलेल्या होत्या. ती गुलाम-दरिद्री समाजाची मजबूरी नव्हती तर काय नैतिकतेचा उत्कर्ष होता? त्याही काळात महसूल आणि पोलीस खाते भ्रष्टच होते, त्याही काहात दिवाणी/फौजदारी वकील गब्बर झालेच होते - अगदी गांधीसुद्धा बॅरिस्टर झाले, त्यामागे देशभक्तीचा कोणताही ध्यास नव्हता- वैयक्तिक उत्कर्षाची प्रेरणा होती- मोतीलाल नेहरू, महमद अली जीना यांची संपत्ती मुख्यत: श्रमिकांचे शोषण करून धनिक झालेल्या दलालांचे मालमत्ताविषयक खटले लढवूनच निर्माण झाली होती- कुणाचे कपडे पॅरिसच्या लाँड्रीत धुतले जात असतीलच तर ते स्वच्छतेच्या आवडीतून नव्हे- या लुटीच्या पैशातूनच ! पहिल्या महायुद्धात -सैन्यभरती आणि युद्ध साहित्य- मुख्यत: टाटांनी निर्माण केलेले पोलाद-इंग्रज सरकारचे धोरण भारतीय उद्योजकांच्या बाबतीत उदासीनतेचे होते. प्रत्यक्ष विरोध नव्हता पण सरकारच्या परवानगी शिवाय भांडवली गुंतवणूक शक्य नव्हती, तो परवना मिळण्यामध्ये भरपूर शिथिलता होती, काही देवाण-घेवाणही होत असणारच. दुसऱ्या महायुद्धात भारतीयांचा युद्धप्रयत्नामधला वाटा पुष्कळच मोठा असला तरी सरकारकडून कोटा मिळवूनच तो-तो उद्योग करण्याची सवयही हाडी-मासी खिळून पुन्हा निरनिराळे दलालही निर्माण झालेच होते.

## सात

उद्योजक व अर्थव्यवस्था यांचे दुर्दैव हे नेहमी दलालांचे सुदैव ठरते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात नेमके तेच घडले. आता भारतीयांच्या कर्तृत्वाला मुक्त वाव मिळणार ही राजकीय प्रचाराची भाषा असल तरी आर्थिक धोरणांमध्ये काडीचाही फरक पडला नाही. एवढेच नव्हे तर व्यापारी व उद्योगपती यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवूनच प्रगती करता येईल असा भ्रमही पसरवला गेला- या नेहरूप्रणित लोकशाही समाजवादाच्या आर्थिक चौकटीचा अनेकअर्थशास्त्रज्ञांनी प्रचंड उदो उदो करण्याची दलालीही भरपूर झाली. 'गोरा इंग्रज जाऊन काळा इंग्रज आला, त्याने गोऱ्या इंग्रजाची धोरणे अधिक कठोरपणे राबवली' हे फक्त शेतकऱ्यांच्या बाबतीत घडले नव्हते, उद्योजकांच्या वाट्यालाही तेच दुर्दैव आले होते- मात्र शेतकऱ्यांच्याप्रमाणे भिकेला लागण्याइतकी त्यांची वाईट अवस्था नव्हती. मात्र विकासाचे प्रारूप, विकासाची रणनीती आणि अमंलबजावणी या तीनही गोष्टी सरकारच्या अखत्यारीत गेल्या आणि दलालांना मोठी पर्वणी सापडली.

याची दोन कारणे सांगितली जातात. जीवनावश्यक वस्तू सर्वांना परवडायच्या हसतील तर सरकारने हस्तक्षेप केल्याशिवाय भाव पातळी स्थिर राहू शकणार नाही आणि ती स्थिर राहिल्याशिवाय कामगारांचे वेतन कमी ठेवून मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण करता येणार नाही अशा उदात्त (!) हेतूने नियोजन मंडळ काम करू लागले-नेहरू त्याचे पदसिद्ध अध्यक्ष होते- आणि सत्ताधाऱ्यांच्या आसपास वावरणारे दलाल सर्वत्र वावरू लागले. अशीही शक्यता आहे की दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला जी प्रचंड महागाई आली ती व्यापारी-उद्योगपती यांनी संगनमताने कृत्रिम टंचाई निर्माण करून प्रचंड नफा मिळवल्यामुळे निर्माण झाली होती. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने असे निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळे भारतीय उद्योगपतींची गुलामी शेतकऱ्यांच्या मानाने सुसह्य आणि प्रतिष्ठित भासणारी असली तरी गुंतवणूक करताना सरकारी परवाना-कोटा-बाजारभाव-वितरण-विक्री या सर्व बाबतीत व्यापार व उद्योग यांच्यातले काहीही न कळणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची दलालांकडून मर्जी संपादन करूनच कामे करून घ्यावी लागणार होती. सत्ताधारी-नोकरशाही-दलाल अशी भ्रष्टाचाराची त्रिमूर्ती तयार झाली ती पहिल्या दोनतीन पंचवार्षिक योजनांच्या काळातच.

हे कारस्थान झाकण्यासाठी सामाजिक समताविषयक कायदे झपाट्याने केले गेले- आर्थिक सबलता असल्याखेरीज सामाजिक समता आणता येईल ही पोकळ बडबड ठरेल, हे माहीत होते तरीही ! काही अत्यंत दुर्बल सामाजिक घटकांसाठी सरकारी नोकऱ्यांच आरक्षण व शिक्षण संस्थांतही आरक्षण आणून समाजात एक वेगळ्या प्रकारचा वैरभाव निर्माण होईल याकडे दुर्लक्ष केले गेले ! या काळात एकाही व्यापारी वा उद्योगपतीने सरकारी गळचेपीबद्दल अवाक्षर काढले नाही. उलट दलालांमार्फत अधिकाधिक कोटा पदरात पाडून घेण्यात धन्यता मानली. फोरम ऑफ फ्री एंटरप्राईझ' सारख्या संस्थांची सभागृहे ओस पडू लागली आणि त्या निष्प्रभ झाल्या. नेहरूंच्या अमदानीमध्ये व्यापारी- उद्योगपतींना निदान शाब्दिक प्रतिष्ठा होती. 'तुमच्यावर लादलेली नियंत्रणे स्वीकारून तुम्ही देशाची मोठी सेवा करताहात' अशीही मलमपट्टी स्वत: नेहरू वारंवार करत होते-त्यामुळे नेहरूंच्या शाबासकीमुळे गुलाम उद्योजकांचं दु:ख जीवघेणे ठरले नाही. मात्र इंदिरा गांधीनी या कमांड इकॉनॉमीचा ताबा घेतला. बँकांचे राष्ट्रीयकरण केले, २०० कोटींची कमाल मर्यादा घालणारा एमआरटीपी कायदा आणाला आणि दलालसंस्कृती हीच अर्थव्यवस्थेचा कणा बनून गेली.

कोणत्याही सरकारी दप्तरात जायची पाळी आली की भारतीय माणसाच्या अंगावर काटा व पोटात गोळा उभा राहतो. तग तो एखाद्या दलालाचे बोट धरतो आणि भ्रष्टाचाराची सुरूवात होते. आपला स्वभावच असा बनला आहे की कोणतेही सरकार आपले वाटतच नाही- याची कारणेही प्राचीन आहेत. स्वदेशी राजांचे प्रासाद, तिथली मांडलिकांची प्रभावळ, त्या राजांचे अष्टप्रधान, त्यांची नवरत्ने, चवऱ्या ढाळणाऱ्या सुंदर दासी, दिमाखदार पोषाखातले खिदमतगार यांची वर्णने काव्यात वाचायला ठीकच आहेत पण सर्वसामान्य गरजू माणसाला, 'इथे आपली धडगत नाही' असेच वाटले असेल. त्यातच राज्यकारभाराची, न्यायसंस्थेची भाषा कायमच बोलीभाषेहून वेगळी होती आणि बहुजनसमाजाला त्याच्या निरक्षरतेमुळे आज्ञापत्रे-न्यायनिवाडे वाचणेही शक्य नव्हते. मुसलमानी अमदानीत दरबार संस्कृती शिगेला पोचली होती. कारभाराची भाषाही अधिकच परकी झाली होती. किरकोळ भेटीसाठी महिनोन्महिने वाट पाहावी लागत होती. जहांगीरच्या घंटेचा मोठा उदो उदो केला जातो पण त्या घंटेपर्यंत पोचणे कुणाचे तरी हात ओले केल्याशिवाय शक्य असेल? इंग्रजी राजवटीत कारभाराची आणखी एक नवी भाषा आली

आणि भारतीय भाषा (संस्कृत)-उर्दू-इंग्रजी यातल्या किमान दोन भाषा जाणणाऱ्यांची एक स्वतंत्र लॉबी तयार झाली. 'धूर्त चिटणिसांचे पुढे । काय कलेक्टर बापुडे।' असे जोतीराव फुले वैतागून म्हणालेच होते. मुळात आपले सरकारही चातुर्वर्ण्यातल्य वरच्या तीन वर्गांचे आहे, आले नाही हा अनुभव असणाऱ्या भारतीयांना नंतरची परधर्मीय, परभाषिक सरकारे आपली आहेत असे कधी वाटणे शक्यच नव्हते. शक्य तो तिथे जाऊ नये. मध्यस्थ-दलालाची मनधरणी करून आपले काम साधून घ्यावे, योग्य-अयोग्य या चर्चेत पडून डोक्याला ताप करून घेऊ नये; पुढचे काम निघेपर्यंत सुखाने जगावे हाच स्वभाव बनला.

त्यामुळे भारतीय माणूस सरकारी कार्यालये, कोर्टकचेऱ्या, पोलीस ठाणे टाळतो. सरकारच आपले वाटत नसल्यामुळे कर भरण्यापेक्षा ते चुकविण्याकडेच त्याचा कल असतो. कायदेशीर व्यवहार करण्यापेक्षा त्या क्षणाची गरज भागवणेच त्याला परवडते. हे सर्व अयोग्य आहे याची त्याला जाणीव असते पण योग्य मार्गाने जाण्यातली दप्तर दिरंगाई आणि सर्व नियम पाळूनही कोणाचे तरी हात ओले केल्याखेरीज काम होणार नाही, ही खात्री असल्यामुळे तो कायद्याचा मार्ग टाळतो. सरकारी यंत्रणेलाही असा घाईवर आलेला नागरिकच आवडतो; दलालाकडून माहिती काढून त्याला व्यवस्थित लुटता येते. एक सिद्धांत असाही आहे की सरकारी कर्मचारी लाच खाणार हे गृहीत धरूनच त्यांचे पगार मुद्दाम कमी ठेवले जातात. कामे होतात-सरकारची तिजोरी कधीच पूर्ण भरत नाही-काळ्या पैशाच्या राशी तयार होतात. त्यातून सत्ताकारण करता येते वगैरे भाग तपशिलात लिहिण्याची गरज नाही इतका तो सर्वपरिचित आहे. 'सरकार नेहमी तोट्यातच चालले पाहिजे, त्याच्याकडे शिल्लक उरता कामा नये' असा अर्थशास्त्रीय सिद्धांतही सरकारवर नैतिक वचक असावा म्हणून मांडण्यात येतो.

## आठ

सरकारी खात्यात होणारे भ्रष्टाचार दोन प्रकारात विभागता येतील. पहिल्या प्रकारात सरकारकडून होणारे काम- हे बहुधा कोणता तरी कागद (दाखला, रेशनकार्ड, ७/१२ चा उतारा, पासपोर्ट इ.) मिळविण्याचे असते. या कामासाठी जाणाऱ्या माणसाने लाच दिल्याखेरीज त्याचे काम होत नाही. दुसऱ्या प्रकारात सरकारी कचेरीत जाणाऱ्या माणसाचे कामच अवैध स्वरूपाचे असते. पैसे खर्च करून- लाच देऊन ते वैध करून घेण्यात येते.

यातील पहिल्या प्रकारात भ्रष्टाचाराचे पैसे-कमी पण प्रकरणांची संख्या अमाप असते, तर दुसऱ्या प्रकारात संख्या कमी पण रक्कम बरीच जास्त असते. दोन्ही प्रकार मिळून ही वरकमाई सरकारी पगाराच्या कित्येक पट जास्त असे. तिचे वाटप खालपासून ते वरपर्यंत करण्याची यंत्रणाही विकसित झालेली असते.

कोणतेही खाते घेतले तरी त्यात भ्रष्टाचार-लाच खाणे असतेच !

शिक्षण, आरोग्य यांसारखी निरूपद्रवी वाटणाऱ्या खात्यांमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात असतो मग महसूल, पोलीस, जकात ही खाती म्हणजे कुरणेच असतात.

काही खात्यांची यादीच सहज करता येईल.

अ. आरोग्य -१)येरवडा मेंटल हॉस्पिटल- ७०० रोगी यांचे रोजचे जेवण, कपडे, अंथरूण पांघरूण प्रत्येक गोष्टीच्या खरेदीत लाच घेतली जाते.

२) प्रायमरी हेल्थ सेंटर्स- औषध खरेदी डॉक्टरांची हजेरी

आ. आरटिओ- वाहन परवाना, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी- प्रमाणीकरण दाखला,

इ. शिक्षण -शालेय साहित्य, पुस्तके, नवीन शाळांचे परवाने, शाळांची तपासणी

ई. पोलिस - एफ.आय.आर. नोंद, पंचनामे, खिसेकापू, वेश्या, फेरीवाले, जुगार अड्डे, दारू यांच्याकडून हप्ते, खून दरोडे, या खटल्यांमध्ये पैसे खाणे, चोरीचा माल दाबणे, तपासासाठी पैसे मागणे इ.

उ. महसूल - विक्रीकर-आयकर-उत्पादन शुल्क यांचे परतावे तपासणी, युटीवन, सी फॉर्म्स

ऊ. सार्वजनिक बांधकाम- रस्ते धरणे, कालवे यांची बांधकामे व दुरूस्ती. टेंडर काढणे, जादाची कामे, कामाची मोजमापे, बिल पासिंग

ए. वनखाते - जंगली प्राण्यांची शिकार, कातडी, दात व हाडे यांचे स्मगलिंग, विडीचे पान (तेंदू) अवैध वृक्षतोड (वीरप्पन-चंदन तस्कर) बांधकामाचे व जळाऊ लाकूड

ऐ. नगरविकास- घरबांधणाऱ्यांना किंवा फ्लॅट घेणाऱ्यांना जागोजागी लूटणे

१. बदल्यांसाठी द्यावे लागणारे पैसे, वरिष्ठांमार्फत राजकारण्यांपर्यंत बांधलेले हप्ते यासाठी अवैध कमाई करावीच लागते असे कनिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे असते.

२. प्रत्येक खात्यात काही जागा अशा असतात जिथे अधिकार कमी व पैसे खाण्याच्या संधी उपलब्ध नसतात. प्रामाणिक व कार्यक्षम अधिकाऱ्यांसाठी अशा जागा निवडल्या जातात. उदा. उत्पादन शुल्क खात्यात नोटिफिकेशन विभाग असतो. नियमात झालेल्या बदलांच्या अधिसूचना हा विभाग तयार करतो. इथे पैसे देण्या-घेण्याच्या संधी नसतात.

४. थोडक्यात सांगायचे तर जिथे जनसंपर्क येतो जिथे खरेदी-विक्री, कंत्राटे यांचे व्यवहार होतात, जिथे कोणत्याही प्रकारचा कागद-दाखला, परवाना, देण्याचा अधिकार असतो, जिथे तपासणीचा अधिकार असतो अशी प्रत्येक सरकारी यंत्रणा, कार्यालये व कर्मचारी बहुसंख्येने भ्रष्ट असतात.

५. या भ्रष्ट वातावरणात प्रामाणिक अधिकाऱ्याला काम करणे अशक्य होइल अशी व्यवस्था निर्माण केली जाते. असा प्रामाणिक अधिकारी सदैव आपल्यावर काही बालंट येईल या भीतीच्या छायेत असतो.

६. सरकारमधल्या भ्रष्टाचाराला जातीयवादाची एक मोठी बाजू आहे. ही मुख्यतः आरक्षणामुळे निर्माण झाली आहे. अनुसूचित जाती/जमाती इ. मधील अधिकाऱ्यांना लवकर बढती मिळते. आपला कनिष्ठ अधिकारी (अकार्यक्षम असूनही?) लवकरच वरिष्ठ-आपला साहेब-होणार ही भावना फार चांगली तर नसतेच. असे होऊ नये म्हणून दोन गटांतील लोक परस्परांचे रेकॉर्ड खराब करण्याची धडपड प्रामाणिकपणे करतात. 'आपला' आणि 'त्यांचा' हे शब्द सरकारी कार्यालयांत नेहमीच कानावर येतात. यामुळे जबाबदारी झटकण्याचे किंवा ढकलण्याचे धोरण

स्वीकारले जाते. आधीच अकार्यक्षम असलेली यंत्रणा दिरंगाईची बळी ठरते. हाही भ्रष्टाचार म्हटला पाहिजे.

सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक, लघु उद्योजक वगैरेंच्या पाचवीला पूजलेल्या भ्रष्टाचाराची ही काही प्राथमिक उदाहरणे झाली. असा भ्रष्टाचार मुख्यतः राज्यपातळीवर आणि त्या त्या राज्यांमध्ये बोकाळला आहे- जरी काही केंद्र सरकारच्या खात्यांचाही त्याच्यात सहभाग असला तरी. निर्णयप्रक्रिया राज्याकडून केंद्राकडे गेली की भ्रष्टाचाराचा भस्कासुर प्रचंड आकार धारण करतो-अलीकडच्या कुठल्याही प्रकरणातले आकडे त्याची साक्ष देतील. केंद्रातल्या सर्व खात्यांचा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी या ना त्या प्रकारे संपर्क येणे अपरिहार्यच असते- रूपयाऐवजी डॉलर, युरो, पौंड यांच्या चलनात व्यवहार सुरू झाले की या रकमा प्रचंड फुगतात आणि सर्वसामान्य माणूस नुसते आकडे पाहूनच गांगरून जातो, हतबल होतो. मोठ्या पदांवरची माणसेच जर असे वागत असतील तर किरकोळ राज्यपातळीवरच्या भ्रष्टाचाऱ्यांना शासन कोण करणार आणि छोट्या गुन्हेगारांना शिक्षा करून या भस्मासुराचा संपूर्ण देशाला असलेला धोका कमी कसा होणार या विचाराने सर्वसामान्य नागरिकाला वैफल्य आले की तो संपूर्ण व्यवस्थाच किडली आहे असा निष्कर्ष काढून एकाकी होतो. हे सर्व थांबवण्याची तरतूद सध्याच्या कायद्यांमध्येही होती, हेही तो जाणून घेत नाही; कारण एक तर कायदे पाळलेच जात नाहीत, वाकवले जातात, 'फिरवले' जातात, धाब्यावर बसवले जातात, धुडकावले जातात, त्यांची सतत पायमल्ली चालूच असते, ही त्याची बालंबाल खात्री होते.

इंदिरा गांधींच्या काळात नगरवाला नामक व्यक्तीने एकरकमी ५० लाख रूपये बँकेतून काढले आणि तिचा संशयास्पद मृत्यू झाला, हे भ्रष्टाचाराचे उदाहरण होते. दहा वर्षांनी राजीव गांधींच्या काळात बोफोर्स तोफांच्या खरेदीमध्ये दिलेली ६० कोटी रूपयांची दलाली हे भ्रष्टाचाराचे प्रकरण गाजले होते. या दोन्ही प्रकरणी देशात प्रचंड खळबळ माजली होती- सर्वोच्च पदावर असूनही मायलेकांची नाचक्कीही भरपूर झाली होती- काही राजकीय उलथापालथीच्या शक्यताही निर्माण झाल्या होत्या. मात्र नंतरच्या नव्वदीच्या दशकातली दोन्ही गाजलेली प्रकरणे काही हजार कोटींची होती- म्हणजे भ्रष्टाचार दर दहा वर्षांनी १०० पट वाढतो?- लालू प्रसाद यादवांचे चारा घोटाळा प्रकरण, हर्षद मेहतांचे शेअर बाजार लचांड आणि महाराष्ट्रातले बहुधा सर्व राजकीय पक्ष ज्यात सामील होते (शिवाय केंद्रातली काही खाती) तो एन्रॉन-गहजब आणि एन्रॉन घोटाळा या प्रकरणातले आकडे काही हजार कोटींचे होते. लालूंचे प्रकरण बिहारपुरते असल्यामुळे तिथे दुसरे काय घडणार असा सारासार (!) विचार करून जनता गप्प बसली. शेअरबाजारातला घोटाळा मोठा असला तरी त्याचा फटका कनिष्ठ मध्यमवर्ग आणि त्याच्या खालच्या वर्गांना न बसल्यामुळे त्याची चर्चा झाली पण सर्व समाज अस्वस्थ झाला नव्हता. त्या मानाने महाराष्ट्र पातळीवर तर उर्जानिर्मितीशी थेट संबंध असल्याने एन्रॉन प्रकरणी संपूर्ण जनमानस खूपच खवळले होते. एन्रॉन या दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरच्या जागतिक (!) कंपनीला कंत्राट देण्यापासून ते प्रत्येक राजकीय पक्षाने आपले कमिशन वसूल करेपर्यंत (भाजपा शिवसेनेचे सरकार असताना एन्रॉन विरोधकांच्या 'प्रबोधना'साठी २०० कोटी रूपये खर्च करण्यात आले होते.) पदोपदी भ्रष्टाचाराच झाला- त्या प्रकल्पाच्या वळचणीला योग्य वेळी योग्य स्थानी बसणाऱ्यांची आयुष्याची कमाई होऊन गेली. सहा-साडे सहा हजार कोटी या सर्व गिधाडांनी खाल्ले; महाराष्ट्रावरचे उर्जासंकटही कायम राहिल्यामुळे नव्या दिवाळखोर कंपनीला पुन्हा कंत्राट देऊन पुन्हा लूटमार करण्याची शक्यताही अबाधित राहिली ! आणि आता पुन्हा दहा वर्षांनी आपण घोटाळ्यांचे आकडे काही लाख कोटींचे ऐकतो आहोत. इतर अर्थव्यवस्था वाढो वा न वाढो, 'समांतर' अर्थव्यवस्था दर दहा वर्षाला १०० पटीने वाढते आहे. सार्वत्रिक कोडगेपणाचा अजून कोणता पुरावा हवा ?

भ्रष्टाचाराची प्रकरणे राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर गेली की त्यांचे अमूर्तीकरण व्हायला सुरवात होऊन सर्वसामान्य नागरिक-ज्याच्या जागरूकतेवर स्वच्छ प्रशासनाची संकल्पना आधारित आहे -पूर्णपणे रश्रळशपर्रीश होतो, बाजूला पडतो. कुठलेकुठले बारकेसारके देश (सेंट किटस), तिथल्या विचित्र नावांच्या बँकातले व्यवहार, दलालांची अपरिचित नावे (क्वात्रोची-खरा उच्चार काय आहे तोच जाणे !) अनिवासी भारतीयांचे संदर्भ, त्यांना पाळणारे किंवा त्यांनी पाळलेले भारतातले राजकीय प्रशासकीय अधिकारी, दलाल, त्यांनी परस्परविसंगत विधाने यांची एकच धमाल उडवून द्यायला माध्यमे सरसावतात- 'सबसे आगे, ब्रेकिंग न्यूज' ची जीवघेणी धावपळ सुरू होते. मग कायदेपंडित पुढे सरसावतात, आरोप सिद्ध करता येईल काय, करता आल्यास आरोपी भारतीय नागरिक आहे की विदेशी, विदेशी असल्यास त्याला भारतीय कोर्टात खेचता येते काय, गैरहजर असला तरी खटला चालवून शिक्षा देता येते काय (उदा. भोपाळ गॅस प्रकरणी अशी शिक्षा ठोठावली गेली आहे) शिक्षा ठोठावल्यास तिची अंमलबजावणी कोण कशी करणार यांच्या वावदूक चर्चांमध्ये या बांडगुळांचे चांगलेच फावते. मूळ प्रश्न बाजूला पडतो, तोवर भ्रष्टाचाराचेच दुसरे प्रकरण उभे राहते, कुठेतरी नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसतो. कुणी प्रसिद्ध व्यक्ती मरते, कुणाला एखादा मोठा सन्मान (हे सन्मानही या भ्रष्ट व्यवस्थेमधूनच मिळतात याची कोणाला लाज कशी वाटत नाही), देश क्रिकेटचा विश्वकरंडक जिंकतो-माध्यमे तिकडे त्याच अहमहमिकेने ('व्यवसायिक निष्ठे'ने !) धावू लागतात. एखादा महात्मा आल्याशिवाय हा भ्रष्टाचाराचा रोग जाणार नाही असा सूज्ञ विचार करून नागरिक परत भ्रष्टाचार प्रदूषित वातावरणात जगू लागतात. मग अण्णा हजारे उठतात, उपोषणाला सुरवात होते, देश हताश असूनही आशावादाच्या नशेत सापडतो-इंग्लंडमधील भारतीय क्रिकेट संघाची नामुष्कीही बाजूला पडते ! हे असेच चालायचे ?

## नऊ

काही महिन्यांपूर्वी श्री. सुब्रह्मण्यम स्वामी यांचे एक 'अभ्यासपूर्ण' भाषण ऐकले- श्री. चंद्रशेखर पंतप्रधान असताना 'सर्व काही करून भागलेले' स्वामी आता 'देव पूजेला लागले' आहेत ! त्यांनी असे सांगितले की 'टू जी स्पेक्ट्रम घोटाळा एकूण साठ हजार कोटींचा आहे. त्यातले ए. राजा या आरोपी मंत्र्याने फक्त सहा हजार कोटी घेतले. 'तामिळनाडूच्या सुलताना'ने अठरा हजार कोटी घेतले आणि 'दिल्लीच्या महाराणी'ने छत्तीस हजार कोटी घेतले.' तिचे नाव न घेण्यामागे स्वामींचा काही राजकीय हेतू सुद्धा असू शकेल. यालाच जोडून त्यांनी गेल्या काही वर्षातल्या प्रमुख १५/२० घोटाळ्यांच्या रकमा सांगितल्या. तो आकडा काही लाख कोटींचा होता-आत्महत्येच्या कडेलोटावर उभ्या असणाऱ्या भारतीय शेतीव्यवस्थेला निदान ४ वेळा संकटमुक्त (कर्जमुक्त आणि पुन्हहा नवे आर्थिक बळ देऊन -मिळून) करण्याइतका प्रचंड

होता. शिवाय भारतीयांच्या देशातल्या /देशाबाहेरच्या काळ्या पैशांचा आकडाही काही लाख कोटींच्या घरात आहे. हे सगळे अंदाज असले तरीही एकूण रक्कम घेरी आणणारी आहे. हा सर्व पैसा देशाने सध्यातरी पूर्णपणे गमावला आहे; हरामाचा पैसा असला तरी तो योग्य कामाला लावणे शक्य आहे काय?

काळ्या पैशाच्या बाबतीत काही 'उडदामाजी काळे गोरे' असा विचार करता येईल का? किरकोळ लाच, हप्ते, हात ओले करणे, काम करणाऱ्यांचा तळतळाट लागू नये म्हणून द्यायची चिरमिरी (असा एक प्रकार मी स्वत: पाहिला होता- वो किस्सा फिर कभी) यातून तयार होणारा काळा पैसा निदान देशातच राहतो- या पैशाचे धनी स्विस बँकामध्ये खाती असण्याइतके महान कर्तृत्ववान नसतात. त्यामुळे सरकारचा कर बुडला तरी देशाचे अंतिम नुकसान होत नाही, पैशाचा वापर होऊन अर्थव्यवस्थेला चालनाही मिळत राहते, चलन वाढीची कटकटीची शक्यता मान्य करूनही! प्रत्येक निवडणुकीनंतर चलनवाढ होते (जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवण्याच्या आश्वासनावरच सर्व सरकारे निवडून येऊनही !) त्याचे एक कारण मतदारांना सर्व राजकीय पक्षांकडून मिळणारी कॅश, हे आहेच. मी जे स्वामींचे भाषण ऐकले त्यातही त्यांनी 'किरकोळ लाचखोरीपेक्षा परकीय कंत्राटे, गुंतवणूक, साधन सामुग्रीची खरेदी यांतले घोटाळे देशाला जास्त मारक आहेत अशीच' अशीच भूमिका घेतली होती. शुद्ध नैतिकावाद्यांना ही भूमिका पटणार नाही कारण किरकोळ लाचखोरांना अडचणीत आणण्याचा पराक्रम करण्याचे रस्त बंद होतील; शिवाय काही अभ्यासू नैतिकतावादी प्रत्येक सरकारी नोकर/दलाल खातो ती रक्कम लहान असली तरी एकूण आकडा प्रचंडच असणार (आणि तो असूही शकेल), त्यामुळे लाचखोरी रोखण्याकडेच सर्व लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे ठासून सांगतील; अण्णा हजारे त्यांच्या पैकीच आहेत.

मध्यंतरी सरकारने परदेशी बँकांत पैसे ठेवणाऱ्या भारतीयांची यादी अंदाजे काढलेल्या रकमांसह जनतेसमोर ठेवली. त्यांच्या एकूण पैशापेक्षा कदाचित जास्त काळा पैसा राजकारणी नेत्यांकडे विशेषत: पक्षाध्यक्ष, खजिनदा, उमेदवार निवडी करणारे यांच्याकडे आहे हे जनतेला माहित असूनही! देशाचे सत्ताधारी असे बेशरम झाल्यावर देशविरोधी कारवाया करणाऱ्यांना रानमोकळे मिळणार हेही सर्वांना कळते. सगळ्यात विचित्र प्रकार असा की ज्यांची नावे जाहिर झाली त्यातल्या कुणीही फारशी आरडाओरड केली नाही. आमची संपत्ती जाहिर करता मग तुमचीही करा (अर्थात आपले राजकारणी संपत्ती लपवण्यात वाकबगार आहेत- मागच्या लोकसभा निवडणुकीत श्री. शरद पवार यांच्या नावावर फक्त ३०-३५ लाख रूपये होते व एकही वाहन त्यांच्या मालकीचे नव्हते !) असाही आग्रह कुणी धरला नाही. याचा अर्थ एवढाच की आपली संपत्ती स्विस (की आणि कुठल्या कुठल्या) बँकातून काढून देशात आणण्याची हिंमत सत्ताधाऱ्यांची नाही हे काळ्या पैशाचे मालक ओळखतात. कारण राजकीय सत्तेसाठी सर्व पातळ्यांवर (कोणत्याही निवडणुकीत एका पक्षाला स्थिर सरकार देण्यासाठी लागणारे घसघशीत बहुमत मिळणे ही आता दुर्मिळ शक्यता बनली आहेच !) एकदा घोडेबाजार सुरू झाला की याच काळ्या पैशाच्या जोरावर स्वत:ला (म्हणजे आपल्या काळ्या लॉबिला) हवे ते सरकार आणता येते, हव्या त्या मंत्र्याकडे हवे ते खाते जाईल अशीही व्यवस्था करता येते आणि नंतर त्या मंत्र्याच्या खात्याकडून कंत्राटे मिळवून खर्च केलेली रक्कम बहुधा दामदुपटीने वसूल करता येते असे हे संगनमत, रॅकेट आहे; मग कोण कुणाला जाब विचारणार ?

पण तरीही परदेशी बँकामधला पैसा देशात येत नाही? घोडेबाजारात देखील (बहुतेकांची खाती त्याच बँकात असल्यामुळे) काळा पैसा फक्त एका परदेशी खात्याकडून दुसऱ्या परदेशी खात्यात जातो आणि परत उलट फिरवला जातो? (माझे या विषयावरचे अज्ञान एव्हाना उघड झालेले आहे !) काही मित्रांना ही माहिती विचारली. त्यांनी सांगितले की सर्व 'हवाला' सदरात येणारी प्रकरणे या पैशातून होतात. त्या त्या देशातल्या दलालाला तेवढी-तेवढी रक्कम अदा करण्यात येते ! यातले काही दलाल भारतीय वंशाचे (धन्य धन्य ती वंशलता !) तर काही परदेशी असतात; पैशाची फिरवाफिरव हीच त्यांची आयडिऑलॉजी असते.

नागरिक असो, राजकीय नेता असो, दीर्घकाळ मोठ्या पदावर काम करणारा अधिकारी असो किंवा आयुष्यभर दलाली करून गब्बर झालेला दलाल असो. या सर्वांनाच काही काळापुरते अभय देऊन जास्तीत जास्त काळा पैसा देशता परत यावा, अशी मागणी रास्त होईल काय? अभय देतानाच त्यांनी हा पैसा देशात गुंतवला पाहिजे-खाजगी मालमत्ता गोळा करण्यासाठी वापरता कामा नये अशी अटही घालता येईल? नव्वदच्या दशकात एका बजेटमध्ये अशी तरतूद केली होती. तेव्हा तीन-साडेतीन हजार कोटी रूपये देशाच्या अर्थव्यवस्थेत खुलेपणाने आले होते. (त्यातही काही मंडळींनी डावपेच लढवलेच-स्पेक्युलेशन झालेच अशीही माहिती एका अनुभवी कर सल्लागाराकडेन मला मिळाली). सलग ४/५ वर्षे अशा प्रकारची सवलत देऊन (कारण आपली गडगंज (काळी) संपत्ती नेमकी कुठे कुठे आहे याचा छडा लावायला या मंडळींना काही वेळ द्यावाच लागेल.) देशत भांडवल आणता आले तर परकीय गुंतवणुकीसाठी लोटांगण घालणारी धोरणे ठरवणे, ज्यांची नावे प्रातर्विधीच्या वेळीही घेऊ नयेत किंवा फक्त त्याच वेळी घ्यावीत अशा दलालांना मैदान पुरवणे, त्यात पुन्हा घोटाळे होऊन चौकशी समित्यांची पिलावळ जन्माला घालून भल्या-बुऱ्या अहवालांची वाट पाहात बसणे, या दुष्टचक्रातून काही प्रमाणात सुटका होऊ शकेल. डझनवारी खून पाडणाऱ्या दरोडेखोरांना जर आपण हृदय परिवर्तन होऊन

**भ्रष्टाचार निर्मूलन/नियंत्रण या कामाकडे आपण काही वर्षातून एकदा अडगळीची खोली एखाद्या नेत्याकडून स्वच्छ करून घेणे म्हणून पाहणार की रोज साफ करण्याची घरातली/बाहेरची स्वच्छतागृहे म्हणून पाहणार? स्वच्छ समृद्ध जीवन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, हे सर्वांनाच पटेल; पण 'आणि मी तो मिळवीनच' हा उत्तरार्ध आपल्याला मान्य आहे का? सभ्यता आणि सुसंस्कृतता यांच्या आधारावर समृद्धी आणता येते यावर आपला अविचल-पण अभ्यासातून आलेला-विश्वास आहे ना? अशी संस्कृती निर्माण करण्यासाठी 'मी केवळ माझ्या वाट्याचे काम चोखपणाने करीन' ही भूमिका योग्य पण अपुरी आहे हेही आपल्याला पटते ना?**

पुन्हा (भ्रष्ट?) माणसांत येण्याची संधी देतो तर एरवी बुद्धिमान (काळा पैसा जमवणे/सांभाळणे ही बिनडोक्यांची कामे नव्हेत!) उत्पादक असणाऱ्यांनाही ती संधी मिळाली पाहिजे कारण उद्योजक/व्यापाऱ्यांच्या काळ्या पैशामागे आपली अत्यंत श्रीमंती-विरोधी कर प्रणालीच आहे. त्यामुळे करविषयक सुधारणा (टॅक्स रिफॉर्मस्)ही काळ्या पैश्यावरची खरी (पण जरा वेळकाढू) मात्रा असली तरी एकदा या प्रकरणाचा निचरा होऊन देशातलेच भांडवल देशात परत यावे म्हणून असे उदार धोरण काही वर्षे तरी राबवावे लागेल.

मात्र काळा पैसा अशा पद्धतीने 'पांढरा' करायला अर्थातज्ज्ञ, राजकारणी आणि नोकरशाही या तिघांचाही विरोध आहे. त्यांची कारणेही वेगवेगळी आहेत. अर्थतज्ज्ञांच्या मते काळा पैसा कुठे नुसता पडून असत नाही तो चलनात या ना त्या प्रकारे झिरपतच असतो. कॅश आणि केवळ कच्च्या पावत्या याच्या आधारावर उपजीविका करणारांची संख्या खूप मोठी आहे; आसपास नजर टाकली तरी असे असंख्य छोटे छोटे उद्योग करून लोक पोट भरत असतातच. या प्रकारे एक हजार रूपये महिना (त्याखाली आता कोणा कष्टकरणाराचे उत्पन्न असेल असे वाटत नाही) कमावणारे एक कोटी लोक देत आहेत असे धरले तरी वर्षाचे बारा हजार कोटी रूपये झाले; प्रत्यक्षात हा आकडा खूपच मोठा असेल त्याखेरीज काही उद्योगांमध्ये अचानक नवीन माणसे प्रचंड भांडवल घेऊन येतात किंवा एखादा सरपटणारा उद्योजक अचानक नवी झेप घेतो त्याही वेळेला हा काळा पैसा मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेमध्ये मुरवला जातो, हा अर्थतज्ज्ञांचा दुसरा मुद्दा. एका अभ्यासकाच्या मते गेल्या ४/५ वर्षात निदान १० ते १५ लाख कोटी रूपयांचा काळा पैसा या मार्गाने पांढरा झाला आहे. (त्याला सविस्तर यादी करण्याचे काम सांगितले आहे.) आता असे होतानाही निरनिराळे परवाने व जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार यातून काही काळा पैसा परत (अधिक ?) काळा होऊन समांतर अर्थव्यवस्थेत जातही असेल पण तो आकडा संपूर्ण गुंतवणुकीच्या मानाने किरकोळ असेल. परकीय कर्ज निवारण्यासाठी हा पैसा वापरावा, हेही अर्थतज्ज्ञांना संयुक्तिक वाटत नाही; त्यांच्या मते परकीय कर्जापेक्षा सरकारने देशांतर्गत उचललेल्या कर्जाची समस्या अधिक ज्वलंत आहे; ती निवारण्यासाठी परत काळाच पैसा वापरणे योग्य ठरणार नाही. स्वच्छेने आपले लपवलेले उत्पन्न जाहिर करावे, सरकारला नाममात्र कर देऊन अभयदान मिळवावे हे वरकरणी योग्य दिसले तरी असे अभय कामयचे असेल, हे कोणाला खरे वाटत नाही; त्यापेक्षा काळा पैसा राजकारणी-नोकरशाही यांना नियमित पुरवून मिळणारे अभय त्यांना जास्त सुरक्षित वाटते.

हा लेख लिहीत असतानाच मनी लॉंडरिंग सम्राट हासन अली खानाच्या प्रकरणातली एक बातमी वाचली-टाइम ऑफ इंडिया- २४ सप्टेंबर मध्ये. या आणि इतर प्रकरणांची तड लावण्यासाठी सरकारने स्पेशल इनव्हेस्टिगेशन टीम नेमावी अशा सुप्रीम कोर्टाच्या आदेशाला वित्त मंत्रालय, कायदा मंत्रालय आणि डायरेक्टर ऑफ एनफोर्समेंट या तिन्ही यंत्रणांचा विरोध आहे. वित्तमंत्रालयाच्या मते या विषयातले अस्तित्वात असलेले कायदे पुरेसे सक्षम आहेत मात्र त्यांची कठोर अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. नवा धारदार कायदा करावा याला कायदा मंत्रालयाची हरकत आहे; सध्याच्या कायद्यात मनी लॉंडरिंगसाठी ५ ते ७ वर्षांच्या तुरूंगवासाची शिक्षा आहे त्यातला मोघमपणा काढून सरसकट ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद करावी एवढाच बदल त्यांना हवा आहे. वरकरणी हे संयुक्तिकच वाटते. कायद्यांची अंमलबजावणी अधिक कठोरपणे होणार आणि सात वर्षांची शिक्षा नक्की होणार असल्याने मनी लॉंडरिंगचे प्रकार आटोक्यात येतील- असेच होईल की कठोर अंमलबजावणी आणि दीर्घ शिक्षा या शक्यतांमुळे तपासणी अधिकाऱ्यांचे (ज्यांच्या भ्रष्टतेमुळे सुप्रिम कोर्टाला एसआयटीचा आग्रह धरावा लागला !) अधिकच फावेल या प्रश्नाचे उत्तर द्यायला कोणा पंडिताची गरज नाही. मात्र देहदंडाची शिक्षा ठोठावण्यास तिन्ही यंत्रणांचा विरोध आहे; तो योग्यच वाटतो कारण हल्ला व्यक्तीवर न करता प्रवृत्तीवर करणे यातच सभ्यता आहे.

राजकारणी मंडळी अशा विषयावर मुरब्बीपणाने मूग गिळून असतातच. 'आम्ही सर्व जण काळ्या पैशावर राजकारण चालवतो' अशी स्पष्ट कबुली पंतप्रधानपदावर असताना देणारे चंद्रशेखर अपवादात्मकच असणार ! पक्षसंघटना, कार्यकर्ते 'सांभाळणे', निवडणूक प्रचार आणि सत्ता मिळवण्यासाठीचा घोडेबाजार या चार ठिकाणी सरासर कॅशचेच व्यवहार असतात. (पक्ष आणि उमेदवार यांची नावे न घेता या प्रकारावर स्वतंत्र 'सुरस आणि चमत्कारिक' लेख लिहिता येईल !) देशात काळा पैसा बोकाळल्यामुळे सरकार व राज्य या संस्थांचे नुकसान होते हे खरेच पण त्यामध्ये राजकारीण मंडळींना त्यांचा 'हविर्भाग' बिनबोभाट पोचता होत असतो; त्यातलेच काही 'सरकार' असतात- मग व्यवहारातः सरकारचे नुकसान होते असे कसे म्हणता येईल. राजकीय स्थैर्याशिवाय गुंतवणूक नाही, गुंतवणुकीशिवाय विकास नाही, काळा पैसा वापरल्याशिवाय स्थैर्य नाही- अशी नाइलाजाची कबुली सर्व राजकारणी खाजगीत देतात. याला उपाय म्हणून सर्व निवडणुकांचा सर्व पक्षांचा खर्च सरकारने करावा ही मागणी पुढे येते; लोकपाल-विधेयक जसे चाळीस वर्षे रखडले आहे तशीच ही मागणीही! कारण यात मेख अशी आहे की चालू व्यवस्थेत जो उमेदवार आणि जो पक्ष जिंकण्याची जास्त शक्यता असेल त्याच्याकडेच अर्थव्यवस्थेचे धुरिण जास्त पैसा पोचवतात- मात्र ते इतरांची अगदीच 'उपासमार' होणार नाही याची काळजी मानवतावादी, लोकशाही भूमिकेतून घेत असतात !

## दहा

भ्रष्ट राजकारणी, भ्रष्ट सरकारी अधिकारी आणि भ्रष्टतेमध्ये सतत नवी उंची गाठणारे दलाल यांचे हे संगनमत भेदणे खरोखरच अशक्य आहे का? त्याची नुसती झलकही भेदरवून टाकणारी असते-विश्वरूपदर्शन घडवल्यानंतरच्या अर्जूनासारखीच आपली अवस्था होते. शिवाय 'मी यांना पूर्वी मारले आहे. तुला फक्त त्यांना या युद्धात प्रत्यक्ष मारायचे आहे' अशी हमी देणारा श्रीकृष्णही या युद्धात उपलब्ध नाही. 'भ्रष्टाचार ही जागतिक समस्या आहे; तेव्हा आपल्याच देशाच्या बाबतीत अस्वस्थ होऊन टोकाला जाण्याचे कारण नाही; भ्रष्ट असले तरी स्थिर आणि कार्यक्षम सरकारच थोडाफार विकास घडवू शकते' अशी मखलाशीही करता येईल. चाळीस वर्षांपूर्वी इंदिरा गांधींनी तसे उद्‌गार काढून हे दुखणे सतरंजीखाली लोटण्याचा प्रयत्नही केला होता. तरीही ही लढाई जिंकणे आवश्यक आहे आणि जिंकणे शक्य आहे; प्रश्न संघर्षासाठी उठण्याचा आहे- हा संघर्ष समूहाने करावा लागेल. एकट्या-दुकट्या महात्म्याचे हे काम नव्हे!

प्रथम ज्यांच्याशी संघर्ष करायचा आहे त्यांचे गुण समजावून घ्यावे लागतील. ते आपलेच देशबांधव आहेत, शत्रू नव्हते हे लक्षात ठेवून

लोकशाही प्रक्रियेचा बिमोड होणार नाही, ही काळजी घेऊनच संघर्ष केला पाहिजे. प्रतिपक्ष अतिशय बुद्धिमान आहे, चतुर आहे, रणनीती आखण्यात पटाईत आहे आणि अण्णांसारखा कोणी उभा राहिला तर त्यांच्याही आंदोलनात आपली माणसे घुसवण्या इतका लवचिकही आहे! मुख्य म्हणजे, भ्रष्टाचाराच्या अंगीकृत कार्यावरची प्रतिपक्षाची निष्ठा निर्विवाद आहे. दिवसाचे चोविस तास आणि वर्षाचे तीनशे पासष्ठ दिवस या पुढची भ्रष्टाचारी संधी कोणती, तिथे नेमके कसे घुसता येईल याचा विचार ही मंडळी करत असतात. गेल्या काही वर्षात सर्व प्रमुख राजकीय नेत्यांनी मोठ्या शहरांच्या परिघातल्या जमिनी किती वेगाने विकत घेतल्या (स्वतः नामानिराळे राहून !) हे आपण पाहिलेच आहे. कारण वाढत्या शहरीकरणामुळे या जमिनींचे भाव आकाशाला भिडणार हे त्यांना माहीत होते! हेही आपण ओळखले पाहिजे की जनतेच्या गरजा ही मंडळी फार चटकन ओळखतात. बायकामुलांबरोबर सुखाने (!) राहता येईल असे छोटेसे घर, जवळपास असणारी शाळा व कॉलेज, महत्त्वाच्या गरजेच्या वस्तू विकत घेता येतील असा बाजार, बऱ्यापैकी रस्ते, वीज आणि पाणी, कायदा-सुव्यवस्था-सुरक्षितता आणि शक्य असल्यास एखादे हॉस्पिटल, एखादे उद्यान एवढीच विकासाची व्याख्या असणारी जनता हे यांचे मुख्य लक्ष्य असते. या गरजांपैकी सगळ्या पुरवल्या गेल्या आहेत अशी एकही वस्ती गेल्या २०/२५ वर्षात तयार झाली नाही. अगदी अतिश्रीमंतांच्या वस्त्यात देखील वीज-पाणी-कायदा सुरक्षा यांच्या समस्या आहेतच; मात्र विकासाच्या सर्व योजना आणि त्यांची अंमलबजावणी हातात ठेवून इन्फ्रास्ट्रक्चरच्या प्रत्येक प्रकल्पातून पैसे काढून, तीच तीच कामे पुन्हा करता येतील अशी तहहयात व्यवस्था करून यांनी आपले खिसे भरले, शहरे फुगतील अशीच व्यवस्था केली- त्यातून प्रश्न निर्माण झाले की पुन्हा जनतेला आपल्याकडेच यावे लागेल असा अभेद्य चक्रव्यूह तयार केला !

शहरात आल्याशिवाय सुख नाही आणि प्रत्येक कामासाठी लाच दिल्याशिवाय-अगदी बालवाडीत प्रवेश घेण्यापासून शहरात राहणे शक्य नाही, हे कळल्यावर गरजू नागरिक मग आपापल्या ठिकाणी वरकमाई करायला सुरवात करतो; कारण त्याच्या नियमित पगारातून त्याला हा वरकड पैसा खर्च करणे शक्य नसते. एकदा तोही या चार राज्यात किरकोळ कामगिरी बजावून जगू लागला की भ्रष्ट व्यवस्थेला जाब विचारण्याचा नैतिक अधिकार आपण गमावलेला आहे, हे कबूल करण्या इतका प्रामाणिकपणा या भ्रष्अ पण छोट्या नागरिकांना आहे म्हणूनच भ्रष्टाचाराच्या धुरिणांचे फावते. ग्रामीण भागातही परिस्थिती फारशी वेगळी नाही. पुढच्या तीन वर्षांचा पगार संस्थाचालकाला देऊन अगदी चपराशाची का होईना नोकरी मिळवायची व त्याच्या दुप्पट रक्कम लग्नामध्ये हुंडा म्हणून घ्यायची ही सार्वत्रिक पद्धत आहे. असा हुंडा देणारा मग आपल्या मुलाच्या मुलाच्या लग्नात त्याच्या सासुरवाडीला पिळून काढले-मग तोही पिळलेला माणूस तसेच आणखी कुणाला करेल- अशी सतत सर्वजनतेला भ्रष्टवण्याची रणनीती आखणारांशी आपला संघर्ष आहे, प्रचलित कायद्यांचा आधार घेऊनच ती लढायची आहे; मात्र सुसंस्कृतपणाने सुखी होण्याचा आपला जन्मसिद्ध अधिकार बजावण्यासाठी ती लढायची आहे-दोन चर व्यक्तींना शासन करण्यासाठी नव्हे ! हे काम केवळ भावनेने होणार नाही- बुद्धी पणाला लावून अफजलखानाला जवळीच्या जंगलात ओढून आणावे लागेल.

आपल्याला जर स्वच्छ, पारदर्शी प्रशासन हवे असेल तर कायदे-कानून समजावून घ्यावे लागतील, त्यांच्या किचकट भाषेला बिचकून चालणार नाही, काही करून माझे स्वतःचे काम झटपट झाले पाहिजे हा उतावळेपणाही सोडावा लागेल, काम ज्या प्रोसीजरमधून जाते ती जाणून घेऊन त्यातली अडवणुकीची ठिकाणे शोधून जागरूक राहावे लागेल, मुख्य म्हणजे प्रत्येक कामासाठी एकेकट्याने जाऊन, लाच देऊन सुटका करून घेण्यापेक्षा एकाच कामासाठी १०/१५ जणांचा गट करून जाणे योग्य ठरेल.

स्थानिक पातळीवर भ्रष्टाचार बोकाळलेल्या खात्यांची यादी या पूर्वी दिलेलीच आहे, त्या सर्व खात्यांवर लक्ष ठेवण्यासाठी जागरूक नागरिक समित्या तयार कराव्या लागतील. भ्रष्ट अधिकारी शोधून काढून योग्य त्या अधिकाऱ्याकडे (Competent authority) त्यांची माहिती कळवावी लागेल ती बहुधा त्यांच्याकडे असेलच ! प्रथम अनौपचरिक मार्ग वापरून (लाच म्हणून घेतलेले पैसे 'उसने' घेतले होते यास्तव परत करण्याची संधी देणे) पाहून नंतर कदाचित कायद्यानुसार पावले उचलावी लागतील.

सरकारी अधिकारी आणि गरजू नागरिक यांच्यामध्ये भ्रष्टाचाराची साखळी निर्माण करणारे दलाल सर्वत्र वावरतात. त्यांच्यावर विसंबून राहण्याची सवय मोडावी लागेल, संभाव्य गिऱ्हाइकांचा त्यांच्यापासून बचाव व्हावा म्हणून गरजू नागरिकांना योग्य तो सल्ला द्यावा लागेल. करून सवरून नामानिराळ्या राहणाऱ्या दलालांविरुद्ध प्रसंगी आंदोलनही करावे लागेल.

स्वच्छ अधिकाऱ्यांच्या पाठीमागे नागरिकांनी खंबीरपणे उभे राहून त्यांचा सन्मान केला पाहिजे; सुजाण नागरी मंचावरून त्यांना पुरस्कार देता येतील. भ्रष्टाचार हाच लोकाचार असताना काही मंडळी स्वच्छ अशी राहू शकली हे जनतेला सांगण्याची संधी त्यांना मिळेल; या विषयामधले एकूण उदास-नैराश्य कमी होईल.

विकास आणि संरचना (Infrastructure) करण्याच्या नावाखाली मोठमोठे अवाढव्य प्रकल्प जाहिर करून उदा. पुणे मेट्रो -भ्रष्टाचाराची नवीन कुरणे खुली केली जातात, अशा प्रकल्पांची आवश्यकता आणि त्यांची आर्थिक व्यवहार्यता यांची शहानिशा करून सत्य जनतेसमोर ठेवण्यासाठी अभ्यास करावा लागेल. स्थानिक पातळीवर गाव/शहराचा विकास कमी उधळपट्टीचा आणि आधिक सुंदर करण्याच्या पर्यायी योजना/ प्रकल्प जनतेसमोर ठेवून मतपरिवर्तन करता येईल.

सध्या सर्वत्र महोत्सवांचे पेव फुटले आहे. या महोत्सवाचे प्रायोजक कोण असतात, त्यांचे पूर्वीचा रेकॉर्ड काय हे तपासावे लागेल. ते भ्रष्ट असल्यास त्यांना हटवावे लागेल. साहित्य संमेलनाच्या आयोजक संस्थेने गुटखावाल्यांचे पैसे नाकारले ही फार दूरगामी परिणाम करणारी घटना ठरली पहिजे. तोच भाग पुरस्कारांचा. पुरस्कार स्वीकारण्यापूर्वी प्रयोजकांचा पैसा कुठून/कसा येतो याची शहानिश करूनच ते घेतले /न घेतले पाहिजेत.

दप्तर दिरंगाई (red-tapism) हा दखलपात्र/ सजापात्र गुन्हा ठरवून सरकारी कार्यालयातील मोठ मोठ्या रांगा व त्यांमुळे होणारा भ्रष्टाचार निकाली काढता येईल. प्रत्येक कार्यालयातील विशिष्ट काम किती वेळात/ दिवसात झाले पाहिजे याचे स्पष्ट नियम बनवण्यास सरकारला भाग पाडता येईल.

मंत्री, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी यांना काही बाबतीत कायद्याचे बंधन सैल करून निर्णय घेण्याचे अधिकार आहेत-discretionery powers. या सर्व अधिकारांवर कठोर बंधने आणली पाहिजेत. ज्यांचा सरासर गैरवापर होतो-उदा. चटईक्षेत्र ते ताटकाळ रद्द केले पाहिजेत.

नागरिकांचे मन वळवून त्यांनाही अशा अधिकाराचा वापर करून स्वतःची अवैध कामे वैध करण्यापासून परावृत्त केले पाहिजे.

कर बुडवून बजबजपुरीत जीवन कंठण्याऐवजी कर भरावा आणि ज्या कारणासाठी कर भरला ते काम यंत्रणेकडून कार्यक्षमतेने होते आहे, की नाही उदा. वीज पाणी रस्ता ही नेहमीची त्रिमूर्ती- याची खबरदारी घेणे ज्यास्त फायद्याचे आहे, हे नागरिकांनी ध्यानी घ्या.

सर्वसाधारण नागरी समित्यांना तर उल्लेख केलेली व तशीच इतर काही कामे स्थानिक पातळीवर सहज करता येतील. आज तसे काही नागरी गट क्रियाशील आहेतही- त्या सर्वांना एकत्र आणावे लागेल. सध्या लोकनियुक्त राजकारणी आणि त्या त्या क्षेत्रातले तज्ज्ञ परस्परांपासून पूर्णपणे फटकून वागताना दिसतात; तो फरक त्यांची पोशाखाची पद्धत, भाषा, देहबोली या सर्वातच दिसतो- ही भेग बुजवण्यासाठी दोन्ही बाजूंनी सकारात्मक पावले उचलली तर परस्पर विश्वास निर्माण होऊन स्वच्छ कारभाराची पायाभरणी करात येईल.

राज्य आणि केंद्र पातळीवर सुजाण नागरी मंचाने करायची कामे थोडी वेगळी असतील. सर्व करविषयक तरतुदी आणि करवसुलीच्या व दंड करण्याच्या पद्धतींचे पुनरावलोकन करून एक नवी श्वेत-पत्रिका तयार करणे गरजेचे आहे.

त्यालाच धरून भ्रष्टाचार विषयक सर्व कायदेशीर तरतुदींचे पुनरावलोकन करून सध्याचे कायदे (दावा केला जातो त्याप्रमाणे) खरेच पुरेसे सक्षम व धारदार आहेत का, नवीन कायद्यांची गरज खरोखरच नाही ना, याची शहानिशा कायद्याच्या क्षेत्रातील जाणकारांकडून व्हायला हवी.

सर्व निवडणुकांचा सर्व पक्षांचा सर्व खर्च सरकारने करावा या मागणीसाठी जनमत संघटित केले पाहिजे.

खाजगी नागरिकांबरोबरच राजकारणी आणि सरकारी अधिकारी यांची परदेशी बँकामधली संपत्ती शोधून (खरे तर सर्वांना माहित आहे) जनतेसमोर त्यांची नावे जाहिर केली पाहिजेत.

स्थावर मिळकत, विकास कामे, संरचना ही मुख्य भ्रष्ट क्षेत्रे असली तरी कायदा-सुव्यवस्था हे क्षेत्रही त्यांच्या फार मागे (निदान या बाबतीत तरी) पडलेले नाही. मात्र या क्षेत्रातल्या भ्रष्टतेचा सर्वाधिक फायदा दहशतवादी गट घेताना आढळतात; याही क्षेत्रावर-प्रसंगी धोका पत्करून-कडी निगरणी ठेवायला हवी.

कोणत्याही निवडणुकीत न पडता (दोन्ही अर्थांनी, सध्याच्या कायद्यांच्या मर्यादेत ही सर्व कामे नागरिक करू शकतील. अजून तरी न्यायसंस्था बऱ्यापैकी विश्वासपात्र आहे- तिच्या आधाराने अफझल खानाला जावळीच्या खोऱ्यात आणता येईल! प्रश्न आहे इच्छा शक्तीचा. भ्रष्ट व्यवस्थेकडे ती दुर्दम्य इच्छाशक्ती किती आहे?

### अकरा

शेवटी काही प्रश्न-ज्यांची उत्तरे वाचकांनी स्वतःलाच द्यायची आहेत.

भ्रष्टाचार निर्मूलन/नियंत्रण या कामाकडे आपण काही वर्षातून एकदा अडगळीची खोली एखाद्या नेत्याकडून स्वच्छ करून घेणे म्हणून पाहणार की रोज साफ करण्याची घरातली/बाहेरची स्वच्छतागृहे म्हणून पाहणार?

स्वच्छ समृद्ध जीवन हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, हे सर्वांनाच पटेल; पण 'आणि मी तो मिळवीनच' हा उत्तरार्ध आपल्याला मान्य आहे का?

सभ्यता आणि सुसंस्कृतता यांच्या आधारावर समृद्धी आणता येते यावर आपला अविचल-पण अभ्यासातून आलेला-विश्वास आहे ना? अशी संस्कृती निर्माण करण्यासाठी 'मी केवळ माझ्या वाट्याचे काम चोखपणाने करीन' ही भूमिका योग्य पण अपुरी आहे हेही आपल्याला पटते ना?

या कामांतून मिळणारा आनंद हेच आपले श्रेय असेल-भ्रष्ट व्यवस्थेच्या निकषांवर तो आनंद मोजता येणार नाही! हाच आनंद आपल्याला हवा आहे ना?

आम्ही काही मित्रांनी हे प्रश्न स्वतःला विचारले. आमची सर्वांची उत्तरे सारखीच होती. आता आम्ही 'स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत (3S Bharat) हे नागरी अभियान/ आंदोलन सध्या पुणे शहरातून सुरू करीत आहोत- नोव्हेंबर महिन्यात आपणही आमच्याबरोबर या. सुस्वागतम्.

**विनय हर्डीकर**
vinay.freedom@gmail.com

■■

---

**पान क्र. १२ वरून**

होते. २००९ सालच्या निवडणुकीत भाजप चा पाठींबा चौटालांच्या लोकदल पक्षास असताना भजन लाल ८००० मतांच्या फरकाने निवडणूक जिंकले होते. यावेळी भाजप भजनलाल यांच्या बाजूने असतानादेखील भजनलाल पुत्र फक्त ६००० मतांनी विजयी झाले ही सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपची स्थिती आहे! 'राईट टू रिजेक्ट' यशस्वी करण्याच्या संधीचे सोने केले असते, तर अण्णा आंदोलनावर गाढवही गेले नि ब्रम्हचर्यही गेले असे दूषण लागण्याची वेळच आली नसती. एकूणच हिसार निवडणुकीने काँग्रेसची घसरण, भाजपचा न वाढलेला प्रभाव आणि अण्णा आंदोलनाच्या भूमिकेने भ्रष्टाचारी व जातीयवादी उमेदवारांना मिळालेल्या बळाने अण्णा आंदोलनाची वैचारिक दिवाळखोरीही वेशीवर टांगली गेली आहे. हिसारमध्ये आपल्यामुळे काँग्रेसची घसरण झाल्याची टिमकी अण्णा टीमला नक्कीच वाजविता येईल; पण आपणच आपल्या ध्येयाचा पराभव केल्याचे पडघमही अण्णा टीमला ऐकावे लागतील. अण्णा आणि केजरीवाल या दोघांच्या टीमने छोट्या विजयप्राप्तीच्या मोहाखातर मोठी हार पदरात पाडून घेतली आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# सणांचे अनर्थशास्त्र

**सणांच्या निर्मितीमागचे ऐतिहासिक महत्त्व विशद करणारे पुराणशास्त्री काहीही म्हणोत, परंतु शेतीमधल्या मिळकतीचा संचय शेतकऱ्याच्या घरात होताच कामा नये, शेतकरी कायमच कर्जबाजारी राहावा हा उद्देश स्पष्टपणे डोळ्यासमोर ठेवूनच सणांची निर्मिती आणि रीतीरिवाज अगदी प्राचीन काळापासून नियोजनबद्धरीतीने आखल्या गेले आहे, हे उघड आहे. ज्या हंगामात शेतीमध्ये शेतकऱ्याने स्वतःला झोकून देऊन कामे करायची असतात त्याच काळात इतक्या सणांचा बडेजाव शेतीव्यवसायाला उपयोगाचा नाही. उत्पादनासंबंधी आवश्यक तो खर्च करावयाच्या काळात सणासारख्या अनुत्पादक बाबींवर अनाठायी खर्च करणे, शेतीव्यवसायाला कधीच फायदेशीर ठरू शकणार नाही.**

त्या दिवशी भल्या पहाटेच चक्रधर माझ्याकडे आला होता. त्याला माझ्याकडून प्रवासी बॅग हवी होती पंढरपूरला जायला. असा अचानक चक्रधर पंढरपूरला जायची तयारी करतोय हे ऐकून मी उडालोच. आदल्या दिवशीच माझे त्याच्याशी बोलणे झाले होते. एका खासगी कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला चलतोस का म्हणून विचारले तर म्हणत होता की, त्याला निदान एक पंधरवडा तरी अजिबात फुरसत नाहीच. शेतीची आंतरमशागत करायचीय, फवारणी करायचीय, निंदन-खूरपण करायचेय. अर्थात तो खोटेही बोलत नव्हता. त्याचे शेत माझ्या शेतापासून थोड्याशाच अंतरावर असल्याने मला त्याच्या शेतीची आणि शेतीतील पिकांची इत्थंभूत माहिती होती.

चक्रधर शेती करायला लागल्यापासून पहिल्यांदाच त्याच्या शेतीत इतकी चांगली पीक परिस्थिती होती. यंदा त्याने छातीला माती लावून साऱ्या गावाच्या आधीच कपाशीची धूळपेरणी उरकून टाकली होती. पावसानेही आपला नेहमीचा बेभरंवशाचा खाक्या सोडून चक्रधरला साथ दिली आणि त्याची कपाशीची लागवड एकदम जमून गेली. नशीब नेहमी धाडसी लोकांनाच दाद देत असते याची प्रचिती यावी असाच हा प्रसंग होता. त्यामुळे हुरूप आलेला चक्रधर दमछाक होईपर्यंत शेतीत राबायला लागला होता. त्याला विश्वास होता की, यंदा आपली इडा पिडा टळणार आणि सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळणार. भरघोस उत्पन्न आले आणि कर्मधर्म संयोगाने जर भावही चांगले मिळालेत तर ते अशक्यही नव्हते. त्यामुळे कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला येत नाही म्हटल्यावर मलाही फारसे नवल वाटले नाही.

पण चक्रधर आता असा अकस्मात पंढरपूरला जायची तयारी करतोय हे मला अनपेक्षित होते. नेमके काय गौडबंगाल आहे हे जाणून घ्यायची माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली. मी प्रथम त्याच्या हातात प्रवासी बॅग दिली, प्रवासाला शुभेच्छा दिल्या, येताना माझ्यासाठी पांडुरंगांचा प्रसाद घेऊन यावा, अशी विनंती केली आणि मग हळूच विचारले होते,



गंगाधर मुटे

'काय चक्रधर, असा अचानक कसा काय बेत आखला बुवा पंढरपूरचा?'

'आरं, मी कसला काय बेत आखतो पंढरीचा? तो पांडुरंगच मला बोलवायला आलाय ना स्वतःहून!' इति चक्रधर.

'स्वतःहून थेट पांडुरंगच आला तुला निमंत्रण द्यायला?' आश्चर्याने डोळे विस्फारून मी विचारले.

'हं मग? इच्छा त्या पांडुरंगाची. दुसरं काय?' चक्रधर निर्विकारपणे सांगत होता.

'अरे, पण मी तर ऐकलंय की पांडुरंग निर्गुण-निराकार असतो. शिवाय तो बोलत पण नसतो,' या विषयातील आपले तुटपुंजे ज्ञान उगाळत मी बोललो.

'तसं नाही रे, पंढरीचा विठोबा स्वप्नात आलाय तो त्या रावसाहेबांच्या' माझ्या प्रश्नाचा उबग आल्यागत चक्रधर बोलत होता; पण आता मला संवाद थांबवणे शक्य नव्हते. माझी उत्कंठा शिगेला पोचली होती.

'रावसाहेबांच्या स्वप्नात? रावसाहेब आणि तुला, दोघांनाही बोलावलं होय?' मी प्रश्न फेकलाच.

'आरं बाबा, तसं नाही रे. आत्ता पहाटे पहाटे विठोबा-रुक्मिणी दोघंबी रावसाहेबांच्या स्वप्नात आलेत आणि रावसाहेबांना आदेशच दिला की चक्रधरला तातडीने पंढरीला पाठवून दे. बिचारे रावसाहेब धावतपळत माझ्याकडे आलेत आणि म्हणालेत की, तू आताच्या आत्ता सकाळच्या गाडीने तातडीने पंढरपूरसाठी नीघ. मी पैशाची अडचण सांगायच्या आधीच रावसाहेबांनी माझ्या हातावर जाण्यायेण्याला पुरून उरतील एवढे पैसेपण ठेवलेत. लई मायाळू माणूस आहे बघा आपले रावसाहेब.' माझ्या प्रश्नाच्या सरबत्तीला वैतागलेल्या चक्रधरने एका दमात सगळे सांगून टाकले आणि झपाझप पावले टाकत निघून गेला.

पंढरीची वारी करून चक्रधर जेव्हा परतला तेव्हा सारेच काही बदललेले होते. फवारणी अभावी कपाशीची वाढ खुंटून झाड खुरटले होते. मशागत व खुरपणी अभावी

तणांची बेसुमार वाढ झाली होती. आल्याआल्या मशागत सुरू करावी तर पाऊस सुरू झाला होता. पाऊस नुसताच सुरू झाला नव्हता तर ठाण मांडून बसला होता. आकाशातील ढग पांगायचे नावच घेईना. म्हणजे झाले असे की, जेव्हा उघाड होती आणि मशागत करण्यायोग्य स्थिती होती तेव्हा चक्रधर पंढरपुरात होता आणि आता चक्रधर शेतात होता तर पावसामुळे मशागतीचे काम करणे अशक्य झाले होते. शेवटी तणाची वाढ एवढी झाली की शेतात जिकडेतिकडे गवतच गवत दिसत होते. कपाशी गवताखाली पूर्णपणे दबून गेली होती. त्यामुळे जे व्हायचे तेच झाले. एकावर्षात सावकाराच्या म्हणजे रावसाहेबाच्या कर्जाच्या पाशातून मुक्त व्हायची गोष्ट दूर, उलट कर्जबाजारीपणाचा डोंगरच वाढत जाणार होता.

रावसाहेब सावकार मात्र आनंदी होते. त्यांनी स्वप्न पडल्याची मारलेली थाप त्यांना मस्तपैकी कामी आली होती. ऋणको जर स्वयंपूर्ण झाला तर धनकोची दुकानदारी कशी चालेल? त्यासाठी ऋणको नेहमीच कर्जात बुडूनच राहावा, हीच धनकोची इच्छा असते. त्यासाठीच नाना तऱ्हेच्या क्लृप्त्या लढविण्याचे कार्य धनकोद्वारा अव्याहतपणे चाललेले असते.

मी जेव्हा ही गोष्ट अनेकांना सांगतो तेव्हा त्यांना सावकाराचाच राग येतो. कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याचीही भाषा केली जाते मात्र शेतीच्या ऐन हंगामातच पंढरपूरची यात्रा का भरते? याचे उत्तर कोणीच देत नाही. पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तवर्गामध्ये शेतकरी समाजच जास्त आहे. ज्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतच पूर्णवेळ लक्ष द्यायची गरज असते, नेमकी तेव्हाच आषाढी किंवा कार्तिकीची महिमा का सुरू होते? याचा धार्मिक किंवा पुराणशास्त्रीय विचार करण्यापेक्षा तार्किक पातळीवर विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

संपूर्ण भारतवर्षात शेतीचा हंगाम सर्वसाधारणपणे जून महिन्यामध्ये सुरू होतो आणि डिसेंबरमध्ये मुख्य हंगाम म्हणजे खरीप हंगाम संपतो. विचित्र गोष्ट अशी की, भारतातील सर्व मुख्य सण याच काळात येतात. जूनमध्ये हंगाम सुरू झाला की, शेतीच्या मुख्य खर्चाला सुरुवात होते. आधीच कर्ज काढून शेती करणाऱ्याला हे सण आणखीच कर्जात ढकलायला लागतात. या सणांच्या खर्चातून शेतकऱ्याला बाहेर पडताच येणार नाही, अशी पुरेपूर व्यवस्था झालेली आहे, हेही ठळकपणे जाणवते. या काळात येणाऱ्या सर्व सणांचे त्या-त्या सणानुरूप करावयाच्या पक्वान्नाचे मेनू ठरलेले आहेत. नागपंचमीला करंजी, लाडू, चकल्या कराव्या लागतात. रक्षाबंधनाला राखी बांधायला भावाने बहिणीकडे किंवा बहिणीने भावाकडे जायचेच असते. मग एकाचा खर्च प्रवासात होतो तर दुसऱ्याचा पाहुणचार करण्यात. पोळा आला की बैलाला सजवावेच लागते. घरात गोडधोड रांधावेच लागते. त्यातही एखाद्या चाणाक्ष काटकसरी शेतकऱ्याने पोळ्यानिमित्त घरात पंचपक्वान्न करून खाण्यापेक्षा तेवढ्याच पैशात शेतामध्ये दोन रासायनिक खताची पोती घालायचे ठरवले तरी ते शक्य होत नाही कारण या दिवशी शेतकऱ्याने आपल्या घरी गडीमाणूस जेवायला सांगणे, हा रीतीरिवाज लावून दिल्या गेला आहे. परका माणूस घरात जेवायला येणार असल्याने पंचपक्वान्न करणे टाळताच येत नाही. अशा तऱ्हेने शेतकऱ्याला खर्चापासून परावृत्त होण्याचा मार्गच बंद करून टाकल्या गेला आहे. शिवाय पोळा हा तीन दिवसाचा असतो. वाढबैल, बैल आणि नंदीपोळा. हे तीन दिवस बैलाच्या खांद्यावर जू देता येत नाही. मग होते असे की जेव्हा उघाड असते आणि शेतात औतकाम करणे शक्य असते, त्यावेळेस पोळा असल्यामुळे काम करता येत नाही. पोळा संपला आणि जरका लगेच पाऊस सुरू झाला तर मग पावसामुळे काम करता येत नाही. कधी कधी या तऱ्हेने आठवडा किंवा चक्क पंधरवडा वाया जातो. मग त्याचे गंभीर परिणाम पिकांना भोगावे लागतात.

हरितालिका, ऋषिपंचमी, मंगळागौर, कान्होबा, महालक्ष्मी-गौरीपूजन, श्रावणमास याच काळात येतात. आखाडी व अखरपख (सर्व पितृदर्श अमावस्या) या सणांचा मारही खरीप हंगामालाच सोसावा लागतो. गणपती बाप्पा आले की ठाण मांडून बसतात. शारदादेवी, दुर्गादेवी यांचे नवरात्र पाळायचे नाही म्हटले तर त्यांचा प्रकोप होण्याची भीती मनात घर करून बसली असते शिवाय यांना यायला आणि जायला गाजावाजा व मिरवणूक लागते. बाप्पांना दहा-पंधरा दिवस मोदक पुरवावेच लागतात. बदाम, नारळ खारका द्याव्याच लागतात. दुर्गादेवीची ओटी भरावीच लागते. ते संपत नाही तोच दसरा येतो, दसऱ्याची नवलाई संपायच्या आधीच भुलोजी राणाच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या भुलाबाई येतात. भोंडला, हादग्याला जुळूनच कोजागरी येते.

शेतीचा हंगाम अगदी भरात असतो. ज्वारी हुरड्यावर, कपाशी बोंडावर आणि तुरी फुलोर्यावर येण्याला सुरुवात झालेली असते. अजून पीक पक्व व्हायला, बाजारात जायला आणि शेतकऱ्याच्या घरात पैसा यायला अजून बराच अवकाश असतो आणि तरीही आतापर्यंत डबघाईस आलेल्या शेतकऱ्याचे कंबरडे मोडण्यासाठी मग आगमन होते एका नव्या प्रकाशपर्वाचे. दिव्यांची आरास आणि फटाक्याच्या आतषबाजीचे. एकीकडे कर्ज काढून सण साजरे करू नये म्हणून शेतकऱ्याला वारंवार आवाहन करणाऱ्या शहाण्यांचे पीक येते मात्र दुसरीकडे हे सर्व सण शेतकऱ्यांच्या दारासमोर दत्त म्हणून उभे ठाकत असते. दिवाळी जसा प्रकाश आणि आतषबाजीचा सण आहे तसाच पंचपक्वान्न व वेगवेगळे चवदार पदार्थ करून खाण्याचा सण आहे. शेतकऱ्याने जरी सण साजरा करायचे नाही असे ठरवले तर शेजाऱ्याच्या घरातून खमंग वासाचे तरंग उठत असताना शेतकऱ्याच्या मुलांनी काय जिभल्या चाटत बसायचे? दिवाळीला नवे कापड परिधान करायचे असते. नवीन कापड खरेदीसाठी पुन्हा कर्ज काढायचे किंवा कापड दुकानातून उधारीवर खरेदी करायची. लक्ष्मीपूजनासाठी स्पेशल दिवस नेमला गेला आहे. शेतीत पिकविलेला कोणताच शेतमाल जर विक्रीस गेला नसेल तर शेतकऱ्याच्या घरात लक्ष्मी तरी कुठून येणार? मग लक्ष्मीपूजन तरी कोणत्या लक्ष्मीचे करायचे? शेतकरी ज्या लक्ष्मीचे पूजन करतो, ती लक्ष्मी उसणवारीची असून तिचे मालकीहक्क सावकार किंवा बँकेकडे असतात. त्याच्या घरावर झगमगणाऱ्या आकाशदिव्यांचे कॉपीराईटस जनरल स्टोअरवाल्याच्या स्वाधीन आणि घरात तेवणाऱ्या दिवावातीतील तेलाचे सर्वाधिकार किराणा दुकानदाराच्या ताब्यात असतात. शेतीचे खर्च आणि या सर्व सणांचे खर्च भागवण्यासाठी शेतातील उभे पीक शेतकऱ्याच्या घरात पोचायच्या आधीच गहाण झालेले असते. या सर्व सणांनी शेतकऱ्याला पुरेपूर कर्जबाजारी करून त्याच्या कमरेला धडूतही शिल्लक ठेवायचे नाही, असा निर्धारच केलेला दिसतो.

आणि सर्वांत महत्त्वाची आणि उफराटी बाब अशी की डिसेंबरमध्ये माल बाजारात जायला लागला आणि शेतकऱ्याच्या घरात पैसा यायला लागला की अचानक सणांची मालिका खंडीत होते. गाढवाच्या सिंगाप्रमाणे सण नावाचा प्रकारच गायब होतो. डिसेंबरनंतर जे सण

येतात ते निव्वळच बिनखर्चिक असतात. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला असे म्हणत तिळगुळाच्या भुरक्यावरच तिळसंक्रांत पार पडते. बारा आण्याच्या रंगामध्ये होळीची बोळवण केली जाते. तांदळाची खीर केली की अक्षय तृतीया आटोपून जाते. खरीप हंगामात येणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी घराघरात साजरी केली जाते. मात्र उन्हाळ्यात येणारी रामनवमी व हनुमान जयंती केवळ मंदिरातच साजरी केली जाते आणि शेतकऱ्यांना पदरचा खडकूही न खर्च करता फुकटातच प्रसाद खायला मिळतो. म्हणजे असे की शेतकऱ्याच्या घरात जेव्हा त्याच्या कमाईचा पैसा येतो, तेव्हा त्याने त्या पैशाने सण वगैरे साजरे करण्याची अजिबात सोय नाही. स्वतः मिळविलेल्या मिळकतीतून नवीन कपडे खरेदी करायचे नाहीत. स्वतःच्या मिळकतीच्या पैशाने गोडधोड-पंचपक्वान्ने करून मुलाबाळांना खाऊ घालायची नाहीत. बहिणीने भावाच्या घरी किंवा बापाने पोरीच्या घरी जायचे नाही. केवळ आणि केवळ माल विकून पैसा आला की त्याने किराणा, कापड दुकानाची उधारी फेडायची. बँका किंवा सावकाराची कर्जफेड किंवा व्याज फेड करायची आणि पुढील हंगामातील शेतीसाठी नव्याने कर्ज घ्यायला तयार व्हायचे. अजबच तऱ्हा आहे या कृषीप्रधान म्हणवणाऱ्या देशातील सणांच्या संस्कृतीची.

सणांच्या निर्मितीमागचे ऐतिहासिक महत्त्व विशद करणारे पुराणशास्त्री काहीही म्हणोत, परंतु शेतीमधल्या मिळकतीचा संचय शेतकऱ्याच्या घरात होताच कामा नये, शेतकरी कायमच कर्जबाजारी राहावा हा उद्देश स्पष्टपणे डोळ्यासमोर ठेवूनच सणांची निर्मिती आणि रीतीरिवाज अगदी प्राचीन काळापासून नियोजनबद्धरीतीने आखल्या गेले आहे, हे उघड आहे. ज्या हंगामात शेतीमध्ये शेतकऱ्याने स्वतःला झोकून देऊन कामे करायची असतात त्याच काळात इतक्या सणांचा बडेजाव शेतीव्यवसायाला उपयोगाचा नाही. उत्पादनासंबंधी आवश्यक तो खर्च करावयाच्या काळात सणासारख्या अनुत्पादक बाबींवर अनाठायी खर्च करणे, शेतीव्यवसायाला कधीच फायदेशीर ठरू शकणार नाही. सणांचे अनर्थशास्त्र शेतीच्या अर्थशास्त्राला अत्यंत मारक ठरले आहे, ही खूणगाठ मनाशी बांधूनच पुढील वाटचाल होणे अत्यंत गरजेचे आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

शेतकरी
महिला आघाडी

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

शेतकरी संघटना

**प्रिय मित्र,**
**स. न. वि. वि.**

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांची संयुक्त कार्यकारिणी **मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर** पुणे शासकीय विश्रामगृह (इन्स्पेक्शन बंगला) पिंच गार्डन, पुणे रेल्वे स्टेशनजवळ, या ठिकाणी दुपारी १ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

*** शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीतील विषय :**

१. कर्जमुक्ती फॉर्म आणि स्वतंत्र भारत पक्ष नोंदणी आढावा घेणे.

२. तंत्रज्ञानातील स्वातंत्र्य मिळावे म्हणून कापसाच्या राऊंडअप बीटी या वाणासाठी रणनीती आखणे व त्याची परवानगी मिळवणे.

३. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये मॉडेल ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी आंदोलन ठरवणे.

कळावे
आपले,

**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**वामनराव चटप,**
अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र)

**सौ. जयश्री पाटील,**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**अनिल घनवट,**
अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी

**सौ. शैलजा देशपांडे,**
अध्यक्षा, स्वभाप महिला आघाडी

**संपर्क:** अनिल चव्हाणे मो. ०९४०५८४७४९३, आबासाहेब ताकवणे मो. ०९६८९७९००४८

# लागले मिठू मिठू बोलायला

**[ आता साखर कारखान्यांवर लेव्हीची सक्ती, मळीची सक्ती आली, त्यामुळे आमचेच साखर कारखाने बुडायला लागले तेव्हा आम्हाला कळलं की नाही- निर्यातबंदी उठवली पाहिजे म्हणून- अहो या कारखान्यावर तुमचेच नाही तर आमचीही पोटंच आहेत की! लक्षात घ्या, ग्रा.पं.,पं.स, जि.प., सहकारी बँका, सह. साखर कारखाने ही तर आमच्या सत्तेची उतरंड आहे. तेव्हा तिची काळजी आम्ही नाही का घेणार? तेव्हा ही उतरंड अधिक मजबूत झाली तरच आम्ही टिकणार आणि आम्ही टिकलो तरच तुम्ही टिकणार. ते म्हणतात ना लाख मरो; पण लाखांचा पोशिंदा जगो? ]**

आम्ही काय सांगत होतो? गेल्या कित्येक वर्षांपासून... नाही, म्हणजे गेल्या काही महिन्यांपासून किंवा गेल्या काही दिवसांपासून म्हणा वाटलं तर! केव्हा म्हणायला तसं काही महत्त्व नाही हो, महत्त्व आहे काय म्हणलं आणि कुणी म्हणलं तुमच्या त्या लाल बिल्लेवाल्याच्या त्या कुणा 'कोटी कोटी'न भलेही ते तिसावर वर्षांआधी म्हणलेलं असेल, त्यासाठी भले तुम्हीही लाठ्या काठ्या खाल्ल्या असतील, जेलात गेला असाल, रक्तही सांडलं असेल; पण उपयोग काय? पण आम्ही म्हणल्याबरोबर बघा बर कशी खळबळ उडाली ती? तुम्ही ओरडून सांगितलं, तेव्हा कुणा एका पेपरात कुठल्या तरी कानाकोपऱ्यात इवलिशी बातमी आली. तुमच्या लाखालाखांच्या सभेच्या फोटोला जागाही नाही मिळाली; पण कुठे तरी झालेल्या धरून आणलेल्या माणसांच्या सभांच्या फक्त स्टेजवरील गर्दीच्या फोटोंनी इस्टमन कलरमध्ये जागा व्यापल्या आणि त्या सभेला शुभेच्छा देणाऱ्या वाईड स्क्रीन जाहिरातींनी पानेच्या पाने व्यापली. शेवटी हा व्यक्तिमहिमा आहे हे लक्षात घ्या. म्हणून आम्ही म्हणतो केव्हा म्हणलं, याला महत्त्व नसून कुणी म्हणलं याला महत्त्व आहे.

त्या कर्जमुक्तीचंच आठवा ना... तुम्ही भलेही बेंबीच्या देठापासून ओरडून सरकारच्या कानीकपाळी तुमचं गाऱ्हाणं घातलं. आम्ही बधलो का? तुमच्या लोकांनी भलेही लाखालाखांच्या संख्येनं आत्महत्या केल्या होत्या. आमचा बाल तरी बाका झाला का? शेवटी कर्जमुक्तीचं पॅकेज आणलं ते आम्हीच ना? गावोगाव आम्ही आमच्या 'घड्याळाचा' गजर करून सांगितलं, 'बघा बघा आम्हाला शेतकऱ्यांची काळजी आहे ते.'

आमच्या शत्रू-मित्र 'हातानं' वीजमाफीचं आश्वासन दिलं, मतं मिळविली आणि आमच्या इमानाला जागून तुम्हाला 'हातंच' दाखवला; पण लक्षात घ्या काही काळ तरी तुम्हाला आशेवर जगवलं ते आम्हीच ना? आमचे हितशत्रू म्हणतील की हे नाटक संधी साधूपणाचं आहे, ते असं म्हणणार हे न कळण्याइतपत आम्ही अ'जाणते' नक्कीच नाहीत. देरसे आये दुरुस्त आये म्हणतात तसं उशिरा का होईना आम्हाला शहाणपण सुचलं आणि आम्ही प्रकट चिंतनाद्वारे सत्य बाहेर सांगायचा प्रयत्न केला.

आमची शारीरिक, आर्थिक, राजकीय प्रगती न पाहवणारे अनेक जण आहेत... ते तर म्हणतीलच की, आतापर्यंत सत्तेची उब घेतलीत आणि तुमच्या 'प्रकट चिंतनातील' अनेक बाबींत तुम्ही हात ओले करून घेतलेत, तेव्हा कुठे गेला होता जाणत्या तुझा जाणतेपणा?' म्हणू देत बापडे. ते असंही म्हणतील की, 'हाता'च्या साथीत तुम्ही तुमचं 'विमान' आकाशात उडू देऊन जमिनीवर बक्कळ माया केलीत म्हणू देत बापडे. कुणा एका पेपरानं तर आमची संपत्ती 'इलेक्शन दुणी इलेक्शन चौगुनी' कशी वाढत गेली याचे आकडेच दिले आहेत. तो सारा अपप्रचार आहे आणि अशा अपप्रचारानं आम्ही तर टस से मसही होत नाहीत. तुकोबारायांनी म्हणलंय ना 'निंदकाचे घर असावे शेजारी' तसं आम्ही मानतो.

सांगायचा मुद्दा हा की, तुम्हाला उत्पादन खर्चावर भाव मिळत नाही म्हणून तुम्ही सुखाची रोटी खाऊ शकत नाही. तुमच्या मालाला निर्यातबंदी, निर्यात कर लावल्यामुळे तुम्हाला भाव मिळत नाही, हे का आम्हाला कळत नव्हतं... शेवटी आम्ही शेतकरी कुळातलेच ना? तुमच्या सुखदुःखाशी एकरूप झाल्यामुळेच तर आम्ही या पदापर्यंत पोहोचलोत ना! इतके दिवस आम्ही आमच्याकडून तुम्हाला न्याय मिळवून द्यावा म्हणून एडीचोटीचा जोर लावला होता; पण आमचं कुणी ऐकतंच नव्हतं बघा!

शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही किती जीव लावला? प्रत्यक्ष आमचं सत्तापद आम्ही इरेला लावलं. कापूस साखरेवरची निर्यातबंदी कशी उठवत नाहीत ते पाहतोच आम्ही; पण तुम्हीसुद्धा एक लक्षात घेतलं पाहिजे की, प्रत्येक गोष्टीसाठी नियतीनं एक वेळ ठरवलेली असते. त्या वेळेआधीच काहीच होऊ शकत नाही. 'हर चीज का इक वक्त मुईयन है!' तेव्हा त्या वेळेपावेतो तुम्ही दम धरायला पाहिजे. सध्याचीवेळ फार नाजूक आहे. तुम्हीसुद्धा आमच्या अडचणी लक्षात घ्यायला पाहिजेत. त्या अण्णानं तिकडे आमच्या विजारीचा नाडा धरलाय. त्या जयरामनं आमच्या गिरी प्रकल्पाची पोल उघडी केलीय. ते रथयात्रा स्पेशालिस्ट तिकडे म्हणत आहेत की, हे सरकार कोसळणार आहे, ते अगडबंब कमळ तिकडे म्हणून राहिलंय की, मंत्रिमंडळाची पुढची बैठक तिहाड जेलमध्ये होणार. चोहीकडून असा मारा होत असल्यामुळे आम्ही सध्या गांगारून गेलो आहोत. तेव्हा एवढा काळ जाऊ द्या. मग तुमचे प्रश्न सुटलेच समजा. तेवढं जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांकडे...

हे असं होतं पाहा! आम्ही प्रामाणिकपणानं- हा प्रामाणिकपणा शब्द सापेक्ष आहे. म्हणजे तुमचा जो काय खराखुरा हेतू असतो त्याच्याशी प्रामाणिक राहणे- तुमचे प्रश्न सोडवण्याच्या बाता करतो आहोत तर

तुम्हीच म्हणता, कांद्याच्या प्रश्नावर एवढा राडा झाला तेव्हा आम्ही काय झोपा काढत होतो का? कापसाचे भाव कोसळले तेव्हा 'घड्याळ' आचके देत होतं का? अहो असं बोलू नये... आमच्यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक, पक्ष एकजुट ठेवणेविषयक आदी अति महत्त्वाचे प्रश्न असल्यामुळे आम्ही त्यात बिझी होतो... म्हणून इकडे थोडं दुर्लक्ष झालं एवढंच! हां, मात्र शेतकऱ्यांच्या प्रत्येक आत्महत्याप्रसंगी दुःख व्यक्त केलं, नातलगांचा शांतीसंदेश दिला आणि आता तीन लाखांचा आकडा ओलांडल्यावर आत्महत्यांचं प्रमाण कमी होत आलं की नाही- हा आमचा विजय नाही का?

आता साखर कारखान्यांवर लेव्हीची सक्ती, मळीची सक्ती आली, त्यामुळे आमचेच साखर कारखाने बुडायला लागले तेव्हा आम्हाला कळलं की नाही- निर्यातबंदी उठवली पाहिजे म्हणून- अहो या कारखान्यावर तुमचेच नाही तर आमचीही पोटंच आहेत की! लक्षात घ्या, ग्रा.पं.,पं.स, जि.प., सहकारी बँका, सह. साखर कारखाने ही तर आमच्या सत्तेची उतरंड आहे. तेव्हा तिची काळजी आम्ही नाही का घेणार? तेव्हा ही उतरंड अधिक मजबूत झाली तरच आम्ही टिकणार आणि आम्ही टिकलो तरच तुम्ही टिकणार. ते म्हणतात ना लाख मरो; पण लाखांचा पोशिंदा जगो?

आमच्यावर टीका करणारे भरपूर आहेत. त्यांच्याकडे तुम्ही लक्ष देऊ नका. आम्ही तर कधीच देत नाहीत. टीकाकार म्हणजे काय हो, 'लोक म्हणजे ओक, धरिता धरवेना पतित पावना देवराया' तेव्हा त्यांच्याकडे आम्ही कसं काय लक्ष देणार? आम्ही परवा परवा प्रकट चिंतन केलं. आमच्या सरकारच्या दोषावर नेमकं बोट ठेवलं. लोक म्हणायला लागले हीच वेळ का निवडली? आता त्या पेपरवाल्यांनी नेमकं याचवेळेस बोलावलं त्याला आम्ही काय करणार? त्यांनी प्रश्न विचारले आम्ही उत्तरं दिली एवढंच. नेमकं याच सुमारास अनेक निवडणुकांचे निकाल आमच्याविरुद्ध गेले, कांद्याच्या माहेरघर रुसून बसलं. जि.पं., पं.स.च्या निवडणुका जवळ आल्या आणि अण्णांचा राक्षस अंगावर आला. हा केवळ योगायोग. आमच्या युपीए दोनची नाव डगमगायला लागली तीही नेमकी याच वेळेस. असा सारा योग जुळून आला, हाही एक योगायोगच. बाकी आमची मतं जी पूर्वीपासून होती तीच आजही आहेत. आम्ही ती आठ-दहा वर्षांनंतर व्यक्त केली एवढंच.

आम्हाला तेही ठाऊक आहे की, आम्ही याच वेळेस ही मतं का व्यक्त केली, याबद्दल आमचे टीकाकार काय म्हणतात ते! ते आम्हाला आठवण देणार इंग्रजीतल्या एका म्हणीची, 'जहाज बुडू लागलं की, उंदरं आधी बाहेर पडतात.' आमच्यावर हा खोटा आरोप आहे. एकतर युपीएचं जहाज बुडत नाहीये. आता कुठे त्यात भोक पडली आहेत. आता कुठे त्यात पाणी भरायला सुरुवात झाली आहे. निवडणुका जवळ आल्या की, कळेलच, जहाज बुडतंय की भोक बुजतात ते. त्याप्रमाणे आम्ही निर्णय घेऊ की! पण त्याला आणखी बराच अवधी आहे. त्या आधी आम्हाला भरपूर कामं करायची आहेत. मुख्य म्हणजे आम्ही आतापावेतो जी काय 'कामं' करून ठेवलेली आहेत. त्या भोवती आम्हाला भक्कम तटबंदी उभी करायची आहे. त्या आधी आम्ही कसं काय बरं आमचा निर्णय जाहीर करणार!

आणि आमच्यावर टीका व्हायची ही काही पाहिलीच वेळ नव्हती. याहीपूर्वी आमच्यावर अनेक आघात झाले आणि आम्ही ते पचवलेही. नव्वदीत आम्ही अत्यंत कार्यक्षम असे चरित्रवान(?) कार्यकर्ते हितेंद्र ठाकूर आणि पप्पू कालानी यांना निवडून आणलं. त्यांच्यावर नाही नाही ते आरोप करण्यात आले. त्यांना नामचिन गुंड म्हणून संबोधण्यात आलं; पण आम्ही त्यांच्या पाठीशी ठाम उभे ठाकलो. जे जे हॉस्पीटलमधील पोलिसांची हत्या झाली ते प्रकरणही तुम्हाला आठवत असेलच. त्या प्रकरणी केवढा गाजावाजा करण्यात आला. त्या प्रकरणातील गुंडांनी पळून जाण्यासाठी जयवंत सूर्याराव नावाच्या एक कार्यकर्त्याची गाडी वापरली होती. तो आमच्या पक्षाचा एक कार्यकर्ता होता आणि आम्ही त्या वेळी सत्तेत होतो हा आमचा दोष झाला का? अहो आमचे लाखोंनी कार्यकर्ते आहेत. त्या पैकी कुणा कुणाची ओळख ठेवणार? आणि ज्या कुणाची ओळख असते त्यांच्यावर चोवीस तास आम्ही पाळत कशी ठेवणार? पण नाही. लोकांनी त्याचं भांडवल केलं. लोक तर अशा संधीची वाटच पाहत असतात. महाराष्ट्रात दोनशे अठ्ठ्याऐंशी आमदार आहेत. त्यापैकी कुणाकुणाची आमची ओळख असणार. त्या सूर्यारावची बायकोच आमच्या पक्षाकडून निवडणुकीला उभी राहिली, हे आमच्या कसं बरं लक्षात राहील आणि कुणा एका सूर्यारावची गाडी कुणा गुंडांनी वापरली आणि त्याचीच पत्नी आता तिकीट मागते आहे हे सारं लक्षात ठेवायला कुणाला वेळ आहे. आमच्यापुढे देशाचे, राज्याचे प्रश्न आहेत, त्याकडे लक्ष द्यायचं का कार्यकर्त्यांच्या खासगी भानगडींकडे पाहायचं!

आम्ही संरक्षण मंत्री होतो तेव्हाचं एक प्रकरण- आम्ही विमानात प्रवास करत होतो संरक्षण दलाच्या. एवढं मोठं विमान, साऱ्या विमानात एकटे आम्ही आणि काही अधिकारी. कुणी अनिल शर्मा आणिक एक जण आले- त्यांनी कुणाला तरी विचारून त्यांच्या तातडीच्या कामासाठी आमच्या विमानात प्रवेश मिळवला. आम्हाला वाटलं, एवढं मोठं विमान रिकामं कसं जाऊ द्यायचं? येऊ द्या बिचाऱ्याला. नेमकी ती दोघे देशद्रोही आहेत हे आम्हाला कसं बरं कळणार? कळलं असतं तर आम्ही त्याला घेतलं असतं का सोबत?

टीकाकारांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी. आमचा पक्ष म्हणजे अर्थ गंगेचा प्रवाह आहे. या गंगेत लोक आपली गटारही टाकतात. त्यामुळे गंगा क्षणकाल मैली होत असेलही; पण तिचा प्रवाह त्यांनाही सोबत घेतो, पावन करतो आणि त्यांना हवा तो 'मोक्ष' प्राप्त करून देतो. त्या बिचाऱ्या गंगेला काय माहीत, आपल्या प्रवाहात कोण कोण 'हात' धुवून घेत आहे ते?

शेवटी आम्हाला एकच सांगायचं आहे. आमच्या साऱ्या कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न समजले आहेत हे उशिरा का होईना; पण तुम्हाला समजलं आहे. आम्हाला फार आधी समजलं होतं; पण आम्हाला फार आधी जे समजलं ते फार उशिरा का होईना आम्ही, आमचे कार्यकर्ते, आमच्या सोबतचे 'हात' एकाच वेळेस बोलून दाखवत आहोत. कांद्याच्या प्रश्नावर आमच्या कार्यकर्त्यांनी नाशिकच्या बाजारपेठा बंद करून दाखवल्या. साखरेच्या प्रश्नावर तर आता बोलायला सुरुवात झाली आहे. आमच्या एका माजी मुख्यमंत्र्यानं तर सत्तेत राहूनही साखर निर्यातबंदी, कापूस निर्यातबंदी उठवावी अशी मागणी केलेली आहे. तेव्हा आमचे सारे कार्यकर्ते आता 'लागले मिठू मिठू बोलायला' म्हणून त्यांना हिणवू नका. त्यांच्या याच वेळी बोलण्याचा आणि येत्या जि.प., पं.स. निवडणुकांशी काहीही संबंध नाही. आमचा संबंध आहे तो केवळ किसान हिताशी!

**- बाबू सोंगाड्या**
babu.songadya@gmail.com

■■



## मुन्शी प्रेमचंद

**अनुवादक - अनंत उमरीकर**

भाग सतरा

# गोदान

गोबर रहायचा मिर्झाच्या जागेत; पण मिर्झानं त्याला कधी किराया मागितला नाही. कदाचित या जागेचा काही किरायाही येऊ शकेल याची मिर्झाला कधी कल्पनाही आली नसेल. गोबर बटाटे सोलत असताना एक टांगेवाला त्याला पैसे मागायला आला. अल्लाद्दीन नाव होतं त्याचं. डोकं सफाचट, दाढी पिंजारलेली, डोळ्यात चकणा त्याची मुलगी सासरी चालली होती आणि त्याला पाच रुपये पाहिजे होते. गोबरनं त्याला व्याजानं पैसे दिले. त्याचे आभार मानत अल्लाद्दीन म्हणाला, ''भाऊ आता बेगमला बोलावून घ्या. किती दिवस हातानं स्वयंपाक करणार?''

रडगाण गात गोबर म्हणाला, ''एवढ्याशा उत्पन्नात घर कसं चालणार?''

बीडी पेटवत अल्लाद्दीन म्हणाला, ''खर्च तर देव देतो भैय्या; पण कष्ट किती कमी होतील याचा तर विचार करा! मी तर म्हणतो जेवऐ पैसे तुम्ही एकट्यावर खर्च करता तेवढ्या तर तुमचं घर चालेल. बाईच्या हाताला बरकत असते भैय्या! मी सांगतो, मी जेव्हा एकटा होतो तेव्हा कितीही कमाई केली तरी बरोबरीच व्हायची. बीडी, तंबाखूसाठी सुद्धा काही उरत नव्हतं. शिवाय कामावरून थकून भागून यावं, घोड्याला चारा-पाणी करावं आणि मग पळावं नानबाईच्या दुकानाकडे, सामान आणायचं. कंटाळून गेलो होतो; पण जेव्हापासून घरवाली आली त्याच कमाईत दोघांचं ठीक चाललंय. शिवाय आरामही मिळतो आहे. नाही तरी माणूस कमाई करतो आहे ती तरी कशासाठी? शेवटी कष्ट करूनही विश्रांती मिळत नसेल तर असलं जीवन काय कामाचं? मी तर म्हणतो तुमचा जेवढा वेळ बटाटे उकडण्यात जातो तेवढ्या वेळात चार दोन कप जास्तीचा चहा विकला जाईल. आजकाल तर चहा बारा महिने विकल्या चालाय. रात्री झोपण्याआधी बायको पाय चुरून देईल, आराम होईल.''

गोबरच्या मनात हे बोलणं बरोबर ठसलं. त्यानं ठरवलं आता झुनियाला आणायचंच. आलू चूलीवर उकडत असताना त्यानं घरी जायची तयारी केली आणि मग लक्षात आलं, की होळी आली आहे तेव्हा होळीचं सामान आणावं लागेल. चिकट लोकात किमान सणावारात तरी खर्च करण्याची तयारी असते, तशी ती गोबरमध्येही होती आणि तसं पाहिलं तर त्यानं त्या दिवसासाठीचं तर पैसा जमा केला होता. त्यात आई, बहिणी आणि झुनियासाठी एक एक जोडी साडी घेतली. होरीसाठी धोतर आणि चादर, सोनासाठी तेलाची शिशी आणि चप्पल, रूपासाठी जपानी बांगड्या, झुनियासाठी एक शृंगार पेटी, ज्यात तेल कुंकु आणि आरसा. पोरासाठी टोपर आणि झगा. पैसे घेऊन तो बाजारात गेला. दुपारपर्यंत सारं सामान आणलं. अंथरूण गुंडाळून तयार झाला. गल्लीतल्या सर्वांना कळलं, की गोबर गावी चालला आहे. त्याला निरोप द्यायला अनेक स्त्री पुरुष आले. त्यांच्या हवाली आपलं घर करून तो म्हणाला, ''घराकडे लक्ष द्या. जमलं तर होळीच्या दुसऱ्या दिवशी येतो.''

एक तरुणी म्हणाली, ''बायकोला घेऊन या. नसता घरात येऊ देणार नाही.''

एक प्रौढा म्हणाली, ''फार दिवस चूल फुंकलीत, आता बाईला आणा.''

गोबरनं सर्वांना रामराम केला. त्यात हिंदू होते अन् मुसलमानही. त्यानं सर्वांशिच मित्रभाव ठेवला होता. सुख दुःखात ते सारे सामील व्हायचे. रोजा ठेवणारे रोजा ठेवायचे आणि एकादशी करणारे एकादशी करायचे. मात्र यावरून कधी कधी एकमेकांची थट्टाही करायचे. गोबर अलाद्दीनच्या नमाजला उठबशा म्हणायचा आणि अलाद्दीन पिंपळाखाली ठेवलेल्या अनेक शिवलिंगांना वजनं म्हणायचा. पावशेर, अर्धाशेर; पण त्या थट्टेत सांप्रदायिक भावनेचा अंशही नसायचा आणि आता गोबर घरी जायला निघाला तर त्याला निरोप द्यायला अनेकजण आले होते.

एवढ्यात दिवसभर चकरा मारून भुरेलाल त्याचा एक्का घेऊन आला होता. त्याला कळलं, की गोबर निघाला, की तो ताबडतोब त्याचा टांगा घेऊन तिथे पोहोंचला, घोडा थकलेला होता तेव्हा त्याला फटकारे मारतंच तो तिथे आला. गोबरनं एक्क्यातच सामान टाकलं आणि गल्लीच्या तोंडापर्यंत चालत आला. तिथे सर्वांना रामराम करूनंच तो टांग्यात बसला.

सडकेवरून तांगा निघाला. घरी जायच्या आनंदात गोबर मग्न होता. घोडा पळत होता आणि बोल बोल म्हणता स्टेशन आलं. गोबरनं कंबरेला खोवलेला रुपया काढून त्याला दिला आणि म्हणाला, ''घरच्यांना मिठाई घेऊन जा.'' भुरेलालनं त्याच्याकडे एकाचवेळी कृतज्ञता आणि रागानं पाहिलं आणि म्हणाला, ''तुम्ही मला परकं समजता का भैय्या? एक दिवस तांग्यात बसलात म्हणून का मी बक्षिस

घेईन? तुम्ही जिथे घाम गाळता तिथे मी जीव द्यायला तयार आहे. माझं मन एवढं लहान नाही भैय्या आणि घेतली बक्षिसी तर घरवाली राहू देईल का?'' काहीही न बोलता लाजेनं मान खाली घालत गोबरनं टांग्यातलं सामान काढलं आणि तिकीट काढायला स्टेशनात शिरला.

नवतीच्या खुणा घेऊन फाल्गुन आला होता. आंब्याच्या झाडाला मोहोराचा सुगंध सुटला होता. आंब्याच्या फांद्यात लपून कोकीळा गाणं गात होती. गावात ऊसाची लावणी चालली होती. आणखी दिवस पुरता निघालाही नव्हता, की होरी शेताकडे निघाला होता. धनिया, सोना आणि रूपा पाण्यात भिजत ठेवलेलं ऊसाचं बेणं काढून देत होत्या आणि होरी ऊसाचे तुकडे करत होता. आता तो दातादीनची मजूरी करत होता. आता त्या दोघांतलं नातं पुरोहित यजमान असं नव्हतं तर मालक आणि मजूर असं होतं.

दातादीननं येऊन होरीला दटावलं, ''जरा जोरात हात चालवा. असंच जर काम करत राहिलास तर दिवसभरातही तुझं काम संपणार नाही.''

नाराज होत होरी म्हणाला, ''काम तर करतो आहे महाराज, बसलो तर नाही.''

दातादीन दाबून काम करून घ्यायचे म्हणून त्याच्याकडे कुणी मजूर टिकत नव्हता. होरीला त्याचा स्वभाव माहित होता; पण इलाज नव्हता. समोर उभं राहून दातादीन म्हणाले, ''हात चालवण्या चालवण्यातही फरक असतो. एकाचा हात असा चालतो, की चुटकीसरशी काम होतात आणि एकाचा असा चालतो, की दिवसभरही काम उरकत नाही.''

तो अपमान गिळून होरीनं जोराजोरात हात चालवायला सुरुवात केली. गेल्या महिन्याभरात त्याला पोटभर खायलाही मिळालं नव्हतं. बहुधा एक वेळंच जेवण म्हणजे चणे फुटाणे खाऊनंच. दुसऱ्यावेळी कधी अर्धपोटी तर कधी उपाशी किती जरी इच्छा असली तरी अंगात शक्ती नसल्यामुळे हात जोरात चालू शकतंच नव्हता आणि त्यावर कडी म्हणजे समोर दातादीन टाकलेला. क्षणभर विश्रांती घेता आली असती तर ताजा तवाना तरी होता आलं असतं; पण तेही शक्य नव्हतं.

धनिया आणि तीनही मुली चिखलात बरबटलेल्या अवस्थेत आणि ओल्या कच्च झालेल्या साड्यांनी भारे आणून टाकून दम काढतात तो दातादीननं त्यांना दटावलं, ''इथे काय तमाशा पहात बसलीस धनिया? जाऊन आपलं काम कर. पैसे काही फुकट मिळत नाहीत. प्रहरभरात फक्त एक खेप केलीस. अशा तऱ्हेने तर दिवसभरात ऊस येणारंच नाही.''

धनिया म्हणाली, ''थोडा दम घेऊ देणार आहे का नाही महाराज? आम्हीही शेवी माणसंच आहोत. तुमची मजूरी करतो म्हणजे काही जनावर नाही झालो. जरा एक भारा आणून तर बघा म्हणजे समजेल.''

रागारागानं दातादीन म्हणाले, ''आम्ही पैसे देतो ते कामासाठी, आरामासाठी नाही. आराम करायचा तर घरी जा आणि आराम करा.''

ती काही बोलायच्या आत होरी म्हणाला, ''का हुज्जत घातले आहेस धनिया? जा मुकाट्यानं.''

''चालले तर आहे; पण चारणाऱ्या बैलांना उगाच नाही टोचायचं!''

लाल डोळे करत दातादीन म्हणाला, ''आणखी जिरली नाही वाटतं, तरी बरं दाण्यादाण्यास महाग झाली आहेस.''

धनिया कशाला गप्प बसते, ''तुमच्या दारी तर येत नाही भीक मागायला.''

तिरप्या भाषेत दातादीन म्हणाला, ''अशीच वागलीस तर तीच वेळ येईल.''

धनिया उत्तर देणार होती; पण सोनिया तिला ओढून तळ्याकडे धेऊन गेली. नसता शब्दानं शब्द वाढला असता; पण थोडं दूर गेल्यावर तीनं मनातली भडास काढलीच, ''भीक मागाल तुम्ही. तुमची जातंच भीक मागणाऱ्याची आहे. आम्ही तर जाणून बुजून मजूर जिथे काम करू तिथे पैसे मिळवू.''

सोना म्हणाली, ''जाऊ दे ना आई, तू तरी उगाच सारखं सारखं भांडायला उठतेस.''

तिकडे होरी उन्मादावस्थेत असल्यासारखा ऊसाचे तुकडे करायला लागला. त्याच्यात जणू एका अलौकिक शक्तीनं प्रवेश केला होता. त्याच्यात पिढ्यान् पिढ्यानी साचलेल्या पाण्याची जणू वाफ होऊन या यंत्राला जणू चालना देत असावी. त्याच्या डोळ्यापुढे आता अंधार पसरायला लागला. अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. तोंडात फेस येत होता. डोक्यात घणाचे घाव घातल्यासारखे आवाज यायला लागले. त्याच्या डोक्यावर जणू भूतंच सवार झालं होतं! आणि अचानक त्याला अंधारी आली. त्याला वाटलं आपण जमिनीत गाडल्या चाललो आहोत. कशाचा तरी आधार घेता यावा म्हणून त्यानं हवेतंच हात फिरवला आणि अचानक तो बेशुद्ध झाला. त्याच्या हातातून कोयता पडला आणि तो धाडकन जमिनीवर कोसळला. त्याचवेळी ऊसाचा भारा घेऊन धनिया तिथे आली. तिनं पाहिलं अनेक माणसं होरीला घेरून उभी होती. शेतातला नांगर धरणारा दातादीनला म्हणाला, ''मालक तुम्ही त्याला असं म्हणायला नको होतं.''

ऊसाचा भारा टाकून धनिया वेड्यासारखं धावत आली. त्याचं डोकं आपल्या मांडीवर घेत म्हणाली, ''मला सोडून तुम्ही कसे चाललात हो? सोना, पळत जाऊन पाणी आणि शोभाला म्हणावं दादा बेहोष पडलेत. हाय रे दैवा! आता मी काय करू कुठे जाऊ? आता कोण मला धनिया म्हणून हाक मारील?''

इतक्यात लाला पटेश्वरी धावत धावत आले आणि प्रेमळ रागानं म्हणाले, ''काय करती आहेस धनिया? शुद्धिवर तरी आहेस का? त्याला काही झालं नाही. उष्णतेमुळे तो बेशुद्ध झाला आहे. आत्ता शुद्धिवर येईल. मन इतकं हलकं करून कसं चालेल?''

धनियानं पटेश्वरीचे पाय पकडले आणि रडत रडत ती म्हणाली, ''काय करू लालाजी मन धजत नाही. देवानं सगळं काही हिरावून घेतलंय. आतापर्यंत धीर धरला होता आता मात्र धीर धरवत नाही. हाय रे दैवा!'' सोना पाणी घेऊन आली. लालानं होरीच्या तोंडावर पाणी शिंपडलं. अनेक माणसं त्यांच्या गमछानी त्याला वारा घालायला लागले. होरीचं अंग थंड पडलं होतं. लालालाही चिंता वाटायला लागली तरी तो धनियाला धीर द्यायला लागला.

धनियाला मात्र धीर धरवत नव्हता. ती म्हणाली, ''असं कधी झालं नाही लाला. असं कधीच झालं नाही.''

पटेश्वरीनं विचारलं, ''रात्री काही खाल्लं होतं का?''

''भाकरी केल्या होत्या; पण आजकाल आमची काय अवस्था आहे. तुम्हाला तर ठाऊकंच आहे. गेल्या कित्येक महिन्यापासून पोटभर खायला मिळालेलं नाही. कितीतरीवेळा म्हणाले, एवढं मेहनतीचं काम करू नका; पण आमच्या नशिबात आराम लिहिलेला नाही.''

अचानक होरीनं डोळे उघडले आणि तो इकडे तिकडे पहायला

लागला. धनियाला तर जणू प्राणदान मिळालं. होरीच्या गळ्याला मिठी मारत तिनं विचारलं, ''आता कसं वाटतंय? माझा तर जीवंच गेला होता.''

होरी थरथरल्या आवाजात म्हणाला, ''बरं वाटतंय. माहित नाही, काय झालं होतं ते.''

धनिया प्रेमळ रागानं म्हणाली, ''अंगात दम नाही आणि जोर लावून काम करणार. पोरांचं नशीब नाही तर आनंदच होता.''

पटेश्वरी लाला हसत हसत म्हणाले, ''धनिया तर छाती बडवून रडू लागली.''

होरीनं उत्सूकतेनं विचारलं, ''खरंच तू रडत होतीस?''

पटेश्वरीला कौतुकानं मागे ढकलत ती म्हणाली, ''यांना काही बोलू द्या. विचारा त्यांना घरचं काम सोडून का आले म्हणावं?''

पटेश्वरी लाला तिला चिडवत म्हणाले, ''तू तर होरी होरी म्हणून रडत होतीस. आता मोठी नाही नाही म्हणतीयस लाजून. छाती तर बडवून घेऊ लागलीस.''

होरीनं भरल्या डोळ्यांनी धनियाला पाहिलं आणि म्हणाला, ''वेडी आहे झालं. असं कोणतं सुख दाखवायला माझं एवढं कौतुक चाललं होतं कोण जाणे?'' दोघाजणांनी होरीला उचलून घरी आणलं आणि बाजेवर निजवलं. दातादीन बोट मोडत होता, की लावणीला उशीर होतो आहे म्हणून; पण मातादीन एवढा निर्दयी नव्हता. धावत जाऊन त्यानं गरम गरम दूध आणि गुलाब पाणी आणलं. दूध पिऊन होरीच्या जीवात जीव आला. नेमकं त्याचवेळेस एका मजूराच्या डोक्यावर सामान ठेवून येत असलेला गोबर त्याला दिसला. गावातले कुत्रे तर आधी त्याला पाहून भुंकू लागले आणि नंतर शेपूट हलवित त्याचं स्वागत करू लागले. रूपा ओरडली, ''भैय्या आला, आला.'' टाळ्या वाजवत ती पळाली. सोना पण दोन तीन पावलं पुढे आली; पण आपला उत्साह तिला तसाच दाबून ठेवावा लागला. एका वर्षातंच ती अधिक तरुण झाली होती; पण बालपणीचा उत्साह यौवनाच्या संकोचाखाली दबल्या गेला. झुनिया सुद्धा पदर दाबून दारात उभी राहिली.

गोबर आई-वडिलांच्या पाया पडला. रूपाला कडेवर घेऊन कुरवाळलं. धनियानं त्याला आशीर्वाद दिला आणि छातीशी कवटाळलं. तिचं हृदय भरून आलं. आज तर तिच्या गर्वाला सीमा नव्हती. कुणी तिची चाल, डोळे, हृदय, तोंड पहावं ते पाहून तर महाराणीलाही तिचा हेवा वाटला असता. गोबर केवढा मोठा झाला होता! अंगावरच्या कपड्यांनी तर एकदम मोठा माणूस वाटत होता. धनियाच्या मनात कधी वाईट विचार आलाच नव्हता. तिचं मन सांगत होतं, तो सुखरूपही आहे आणि खुशही! त्याला प्रत्यक्ष असं समोर पाहून तर तिला वाटलं आपलं हरवलेलं धन परत मिळालं; पण होरीनं मात्र तोंड फिरवलं होतं. ते पाहून गोबरनं विचारलं, ''दादाना काय झालंय ग आई?'' घरची अवस्था सांगून त्याला आल्या आल्या दुःखी कशाला करा असा विचार करून ती म्हणाली, ''काही नाही रे. डोकं दुखतंय एवढंच. चल कपडे बदल, हातपाय धुवून ये आणि काय रे कुठे होतास इतके दिवस? असं कुणी घर सोडून पळून जात असतं का रे? आणि एखादं पत्रही नाही पाठवलंस. आज पुऱ्या वर्षानंतर आठवण आली का रे? वाट पाहून पाहून डोळे फुटले रे. कधी तू येशील आणि तुला मी पाहिन एवढीच आशा मी धरून होते. इकडे पळून गेला, तिकडे पळून गेला असं काहीही सांगायचे लोक. ऐकून जीव वर खाली व्हायचा. कुठे होतास रे इतके दिवस?''

काहीसा लाजत तो म्हणाला, ''काही दूर नव्हता. इथेच लखनौत होतो.''

''एवढ्या जवळ असून एक चिठ्ठीही नाही लिहावीशी वाटली?'' त्याचवेळी तिकडे सोना आणि रूपा त्याचं सामान उचकून पाहत होत्या. झुनिया मात्र दूरच उभी होती. तिच्या चेहऱ्यावर आज रुसवा दिसून येत होता. गोबरनं तिच्याशी जो व्यवहार केला होता त्याचा बदला ती आज घेणार होती. आसामीला समोर पाहून बुडित पैसेही सावकार वसूल करायला पाहतो तसं. तिला वाटत होतं आज. तिचं बाळ खाली झेपावून समोर दिसणाऱ्या साऱ्या वस्तू तोंडात घालू पाहत होतं; पण ती त्याला कडेवरून खाली उतरू देत नव्हती.

सोना झुनियाला म्हणाली, ''वहिनी, भैय्यानं तुमच्यासाठी सिंगारपेटी आणली आहे.''

''काही नको मला.'' झुनिया म्हणाली, ''त्यांना म्हणावं तुमच्याजवळंच ठेवून घ्या.''

रूपानं बाळाचं टोपरं काढलं आणि म्हणाली, ''वा, वा! ही तर चुननूची टोपी आहे'' आणि तिनं ती टोपी बाळाच्या डोक्यावर ठेवली. झुनियानं ती काढून फेकून दिली आणि गोबरला आत येताना पाहून ती आतल्या खोलीत गेली. त्यानं पाहिलं तर त्याचं सारं सामान उचकटलेलं होतं. आधी झुनियाची माफी मागावी असं त्याला वाटलं होतं; पण आता आत जायची त्याची हिंमत होत नव्हती. तो तिथेच बसला आणि ज्याला त्याला ज्याची त्याची वस्तू देऊ लागला. रूपा मात्र तिच्यासाठी चप्पल नाही आणली म्हणून रुसली. सोना मात्र तिला चिडवायला लागली, ''तू काय करणार चप्पल घेऊन? तू आपली बाहुलीशी खेळत बस! तुझी बाहुली पाहून मी रुसले का? मग तू माझी चप्पल पाहून का रुसतेस?'' मिठाई वाटायची जबाबदारी धनियानं आपल्या शिरावर घेतली. इतक्या दिवसानंतर मुलगा सुखरूप आला म्हणून तिला गावभर मिठाई वाटायची होती. रूपासाठी एक गुलाब जामून म्हणजे उंटाच्या तोंडात जिरा! तिला वाटत होतं सारी मिठाई तिच्याच पुढे ठेवावी.

आता त्यानं पेटी उघडली आणि एकेक साडी त्यातून काढायला सुरुवात केली. सगळ्या साड्यांना काढ होते, पटेश्वरी लालाच्या घरच्या बायकांच्या साड्यासारखे; पण या साड्या मात्र वजनात हलक्या होत्या. अशा भारी पातळ साड्या किती दिवस टिकतील? मोठ्या घरच्या स्त्रीयांनी कितीही भारीच्या साड्या वापराव्यात. त्यांना उठण्याबसण्याशिवाय दुसरं काम असतंच काय? होरीसाठी धोतर आणि चादरही आणलेली होती. ते पाहून धनियाला बरं वाटलं. ''हे तू बरं केलंस. चादर फारंच विरविरीत झाली होती.'' तेवढ्या वेळात त्याला घरच्या एकूणच परिस्थितीचा अंदाज आलेला होताच. धनियाच्या साडीला कितीतरी ठिगळ लागलेली होती. सोनाची साडी डोईवर फाटलेली होती आणि तितून तिचे केस दिसत होते. रूपाच्या कपड्याची तिच अवस्था होती. सर्वांचे चेहरे सुकलेले. कुणाच्याही देहावर तरतरीतपणा दिसत नव्हता. जिकडे पाहवं तिकडे विपन्नावस्था!

महिला वर्ग साड्या पाहण्यात मग्न होता. धनियाला काळजी लागली ती गोबरला खाऊ घालण्याची. घरात थोडसं पीठ होतं; पण ते होतं संध्याकाळसाठी राखून ठेवलेलं. त्या लोकांचं तर चणे-फुटाणे खाऊन भागत होतं; पण गोबरचं काय? तो आता पूर्वीचा गोबर थोडी होता? तो जवारीची रोटी खाऊ शकेल का? तिकडे तो काय काय खात असेल? जाऊन तिनं दुलारीच्या दुकानातून गव्हाचं पीठ, तांदूळ

उधारीवर आणलं. एका महिन्यापासून तिनं उधार देणं बंद केलं होतं; पण आज मात्र काहीही न बोलता मुकाट्यानं दिलं.

तिनं विचारलं, ''गोबर तर खूप कमाई करून आला असेल?''

''आणखी तर काही नाही कळलं.'' धनिया म्हणाली. ''मलासुद्धा आल्या आल्या असं विचारणं यावेही बरं नाही वाटलं. सर्वांसाठी काठा पदराच्या साड्या मात्र आणल्या आहेत. तुमच्या आशीर्वादानं तो खुशालीत परतला, माझ्यासाठी तर हेच खूप आहे.''

आशीर्वाद देत दुलारी म्हणाली, ''जिथे रहायचं तिथे खुशाल राहो. आई-वडिलांना तरी आणखी काय पाहिजे असतं? मुलगा शहाणा आहे. इतर पोरासारखा भांडखोर नाही. माझे पैसे आता नाही देता आले तर व्याज तरी दे. दिवसेंदिवस व्याज वाढतंच चाललंय.''

इकडे घरात सोना चुन्नू बाळाला फ्रौक, टोपरं घालून नटवत होती. हे कपडे अंगात घालण्याऐवजी हातात घेऊन लोळवणंच त्याला जास्त आवडत होतं. आतल्या खोलीत गोबर-झुनियाच्या मनोमिलनाचं नाटक चाललं होतं. गोबरकड रागारागानं पाहत झुनिया म्हणाली, ''मला आणून ठेवलंत आणि तुम्ही मात्र दूर गेलात, पळून. बरं नंतर तरी काही ठावठिकाना लावायचा प्रयत्न केला नाही. पुरतं वर्ष गेल्यावर मग कुठे तुम्हाला जाग आली. किती कपटी आहात हो तुम्ही? मला वाटलं होतं, माझ्या मागे मागे तुम्ही येत आहात; पण तुम्ही जे गायब झालात ते आज वर्षांनंतर उगवलात! तुम्हा पुरुषांचा काय विश्वास करावा? आणखी कुणाशी सूत जमवलं असेल. विचार केला असेल, एक घरच्यासाठी, एक बाहेरच्यासाठी.''

गोबर म्हणाला, ''झुनिया मी शपथ घेऊन सांगतो इतर कुणाचा विचारही मनात आला नाही. भीती आणि लाजे पायी घरातून पळालो हे मात्र खरं; पण तुझी आठवण मात्र क्षणोक्षणी येत होती. आता मी ठरवलंय, की सोबत तुलाही घेऊन जायचं. म्हणून तर आलो आहे. तुझ्या माहेरची माणसं फार रागावली असतील.''

''दादा तर माझा जीवंच घेऊ लागले.''

''खरं म्हणतेस?''

''तिघेही जण इथे आले होते. आईनं असं दरडावलं, की तिघेहीजण तोंड लपवून पळून गेले मात्र आपले दोनही बैल दावनीचे सोडून नेले.''

''एवढा जुलूम? आणि दादा गप्प राहिले?''

''एकटे दादा कुणा कुणाशी भांडणार होते? गाववाले तर बैलजोडी नेऊ देत नव्हते; पण दादानंच मन मोठं केलं. मग गाववाले तरी काय करणार?''

''मग आजकाल शेती कशी करताहेत?''

''शेती सगळी संपली. थोडी शेती पंडितजींच्या भागीत आहे. ऊसाची तर लावणीच केली नाही!''

गोबरजवळ यावेळी दोनशे रुपये होते. एक तर पैशाचीही गरमी आणि वर ही बातमी त्यामुळे तर तो अधिकंच संतापला आणि म्हणाला, ''मग मी आधी जाऊन त्या लोकांना भेटतो. माझ्या दारातले बैल न्यायची त्यांची हिंमत झालीच कशी? हा तर सरळ सरळ डाका घालणं आहे. तीन तीन वर्षांसाठी जेलात जातील. सरळ सरळ परत नाही केले तर कोर्टात जाईन. सगळा गर्व नष्ट करीन.''

तो जोशात जायला निघाला तोच झुनियानं त्याचा हात पकडला आणि म्हणाली, ''जाल हो, पण एवढी घाई काय आहे? थोडा आराम करा, खा, प्या आणि मगंच जा. सारा दिवस आहे हाताशी. तुमच्या माघारी इथे गाव पंचायत बसली होती. त्यांनी ऐंशी रुपये दंड लावला शिवाय तिन मण धान्य. त्यामुळेच तर सर्वनाश झाला.''

बाळा कपडे करून घेऊन सोना आली. सजल्यामुळे तो तर गोंडस दिसत होता. त्यानं बाळाला मांडीर घेतलं; पण त्याला त्यात आनंद वाटला नाही. त्याचं रक्त उसळत होतं. एकेकाला पाहून घेईन असा विचार केला त्यानं. त्यांना दंड ठोकायचा पंचायतला काय अधिकार होता? घरच्या प्रकरणात बोलण्याचा त्यांना काय अधिकार होता? त्यानं जर कुणी बाई ठेवली तर त्यांच्या बापाचं काय जातं? त्यानं समजा पंचावर फौजदारी केली तर पंचांना हातकड्या पडतील. सारं घर बरबाद झालं. काय समजतात हे लोक?

बाळ आधी त्याच्या मांडीवर हसलं आणि अचानक किंचाळलं झुनियानं त्याला गोबरच्या मांडीवरून घेतलं आणि ती म्हणाली, ''जाऊन आधी आंघोळ करा. विचार कशाला करता? इथे भांडत बसलात तर एक दिवसही निभावं लागणार नाही! इथे ज्याच्या हातात पैसा तोच मोठा माणूस, भला माणूस भिकाऱ्यावर तर सगळेचजण अधिकार गाजवतात.''

''घरून पळून जाणं हा माझा गाढवपणा होता. नसता बघत होतो कोण कसा दंड लावतं ते!''

''शहरची हवा खाऊन आलात म्हणून हे सुचायला लागलंय. नसता पळून कशाला गेला असता?''

''हातात काठी घेऊन पटेश्वरलाला, दातादीन, झिंगुरी सिंग यांना मार मार मारावं असं वाटतं त्यांच्याकडून पैसे वसूल करावेत असं वाटतं.''

''पैशाची फार गरमी चढली का? पाहू तर खरं किती कमाई केली वर्षभरात?'' असं म्हणून गोबरच्या कंबरेला तिनं हात घातला. तेव्हा तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, ''मी कमावलं काय. तू माझ्या बरोबर चल म्हणजे कमावून दाखवतो. अगं शहराची ओळख व्हायलाच वर्ष लागतं.''

''आईनं जाऊ दिलं पाहिजे ना!''

**क्रमशः**

**- अनंत उमरीकर**

नानल पेठ, परभणी -४३१४०१. मो. ९८९०३९६६५७

■■

# करमाळा येथे ऊस परिषदेत साखर नियंत्रणमुक्त करण्याचा निर्धार

## ऊसदरासाठी ‘करो या मरो’ याप्रमाणे लढा - मा. शरद जोशी




**करमाळा, ता.२४ :** उसाच्या भावासाठी जिंकू किंवा मरू अशी भूमिका घेऊन सर्व शेतकऱ्यांनी ऊसदराच्या आंदोलनात भाग घेतला पाहिजे. जे कारखाने उसाला पहिली उचल २१०० रुपये देत नाहीत, त्यांच्या कारखान्यात ऊस पोहोचणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. या आंदोलनापूर्वी येत्या दिवाळीत बलीप्रतिपदेला ज्याच्या घरात राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेसच्या नेत्याच्या प्रतिमा असतील त्या प्रतिमा दारात फेकून त्या फोडून त्याची होळी करा, असा आदेश शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनी दिला.

शेतकरी संघटनेच्यावतीने येथील जीन मैदानात आयोजित ऊस परिषदेत श्री. जोशी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवि देवांग, शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे अध्यक्ष संजय कोले, माजी अध्यक्ष अनिल घनवट, माजी आमदार वामनराव चटप, शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीच्या प्रमुख शैलजाताई देशपांडे, माजी आमदार सरोजताई काशीकर, मॅक्सीको परिषदेवरून आलेल्या जयश्री पाटील. शेतकरी महिला आघाडीच्या युवा आघाडीच्या प्रमुख रसिका उलेमाले,



माढ्याचे मोहन उबाळे, हरिदास थिटे, रामचंद्र पतंगे, आदिनाथचे संचालक सुभाषराव सावंत, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष गुणवंत पाटील हंगरगेकर, शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष व परिषदेचे संयोजक परमेश्वर तळेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. जोशी म्हणाले की, मी गेले एक वर्षभर शेतकरी संघटनेच्या कामातून रजा घेतली होती. शेतकऱ्यांच्या या समस्याचा अभ्यास करण्यासाठी अध्यक्षाकडून तशी सवलत घेऊन आज वर्षानंतर प्रथमच तुमच्या समोर येत आहे. या भागात येताना मला ३० वर्षांपूर्वीची आठवण आली. १९८० साली मोहन उबाळे यांच्या सुचनेवरून मी माढा तालुक्यात शेतकरी परिषद घेतली होती. त्यावेळी सायकलवरून प्रचार केला तर जाताना ट्रकच्या टपावरून गेलो होतो. शेतकऱ्यांसाठी प्रतिकुल स्थितीतून वाटचाल केलेली आहे. शेतकरी परिषदेला कमी असले तरी आंदोलनाला मोठ्या संख्येने येतात. उसाबाबत नेमक्या आंदोलनाची घोषणा ५ नोव्हेंबरच्या कापूस परिषदेत करणार आहे. तरीसुध्दा उसापासून कारखानदाराला ३४०० रुपये उत्पन्न मिळत असेल तर शेतकऱ्याला पहिली उचल २१०० रु. द्यायला काय अडचण आहे. असा प्रश्न करून ते म्हणाले, गांधीजींच्या आंदोलनाप्रमाणे भावासाठी करेंगे या मरेंगे याप्रमाणे लढले पाहिजे. यापुढे शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची धुरा युवा आघाडीचे नेते संजय कोले यांच्याकडे राहील, अशी घोषणा त्यांनी केली.

यावेळी युवा आघाडीचे नेते संजय कोले, संयोजक परमेश्वर तळेकर यांनी आंदोलनाची भूमिका मांडली. यावेळी अनिल घनवट, माजी आमदार वामनराव चटप, शैलजाताई देशपांडे, माजी आमदार सरोजताई काशीकर, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रवी देवांग यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन संघटनेचे सचिव गणेश पवार यांनी केले. यावेळी रामचंद्र पतंगे यांनी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते हरिदास थिटे यांना पूर्ण पोषाख व २५ हजार रुपयांची थैली अर्पण केली.

# श्रीमंत शेतकऱ्यांना अनुदान देऊ नये

**वॉशिंग्टन** - श्रीमंत शेतकऱ्यांना यापुढे अनुदान देऊ नये, गरज असेल तरच द्यावे, त्यांना करही लावावा, असा ठराव अमेरिकेच्या सिनेटने ८४ विरुद्ध १४ अशा मताधिक्याने शुक्रवारी (ता. २१) मंजूर केला. विशेष म्हणजे हा ठराव डेमोक्रॅट्स, तसेच रिपब्लिकन या दोन्ही पक्षांनी एकमताने मंजूर केला. यामुळे १२ लाख अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक वार्षिक उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यास यापुढे अनुदान मिळणार नाही.

गेली अनेक वर्षे आपण शेतकऱ्यांना अनुदान कपातीचा मुद्दा लावून धरला होता. पण कोणीच ही बाब गंभीरपणे घेत नव्हते. अखेर आर्थिक तंगी वाढू लागल्यामुळे हा ठराव मंजूर करणे भाग पडले आहे,'' अशी प्रतिक्रिया डेमोक्रॅट पक्षाचे नॉर्थ डाकोटाचे प्रतिनिधी बायरन डॉर्गन यांनी व्यक्त केली. आता थेट अनुदान न देता, नैसर्गिक संकट, बाजारात अचानक दर कोसळले तर विमा योजनेच्या माध्यमातून अमेरिकेतील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचा विचार तेथील सरकार करत आहे.

आजवर अमेरिकेत शेतीमालाची किंमत, उत्पादन यांचा काहीही विचार न करता सरसकट शेतकऱ्यांना अनुदान दिले जात होते. जागतिक व्यापार संस्थेमध्ये अमेरिकेसह युरोपीय देशांमध्ये शेतकऱ्यांना दिले जात असलेल्या अनुदानावर भारतासह अनेक विकसनशील देशांनी आक्षेप घेतला होता. गॅट कराराचे पालन करण्यात हाच कळीचा मुद्दा ठरत आला आहे. श्रीमंत देश आपल्या देशातील शेतकऱ्यांना भरमसाट अनुदान देतात आणि आमच्या देशात कवडीमोलाने शेतीमाल बाजार किंवा प्रक्रियायुक्त पदार्थ आणतात. यामुळे गरीब, विकसनशील देशातील शेतकऱ्याचा टिकावच लागणार नाही, असा मुद्दा भारताने आजवर लावून धरला आहे.

सध्या दरवर्षी पाच अब्ज अमेरिकी डॉलर इतके थेट अनुदान अमेरिकेतील शेतकऱ्यांना दिले जाते. आता आगामी दहा वर्षांमध्ये २३ अब्ज अमेरिकी डॉलरची कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच आता थेट अनुदान निम्म्याने कमी केले जाणार आहे. एका पाहणीनुसार, २००६ मध्ये अमेरिकेतील २७०५ शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न हे प्रत्येकी २५ लाख डॉलर (सुमारे साडेबारा कोटी रुपये)पेक्षा अधिक होते. १९९६ पासून अमेरिकेत थेट अनुदान योजना राबवली जात आहे. या योजनेमुळे अमेरिकेतील सरासरी कौटुंबिक उत्पन्न आणि सरासरी शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न यांची तुलना करता १९९६ नंतर अमेरिकेतील शेतकरी कुटुंबाचे सरासरी उत्पन्न हे सामान्य कुटुंबांपेक्षा अधिकच राहिल्याचे आढळून आले आहे. थेट अनुदान योजनेचाच हा परिणाम असल्याचा निष्कर्ष यातून समोर येतो. आता आर्थिक तंगीतून धडा घेत श्रीमंतांपेक्षा छोट्या, गरीब शेतकऱ्यांनाच थेट अनुदानाचा लाभ मिळावा अशा पद्धतीने हे धोरण आता अमेरिकन सरकार राबवू पाहत आहे.

युरोपातील अनुदान निकषांत सुधारणा होणार

युरोपीय महासंघातील सदस्य देशांमध्ये समान कृषी धोरण (कॉमन ॲग्रिकल्चरल पॉलिसी (कॅप)) राबवले जाते. या धोरणानुसार दरवर्षी महासंघाकडून शेतकऱ्यांना ५६ अब्ज युरो (सुमारे चार हजार अब्ज रुपये) अनुदान दिले जाते. आता नुकतेच महासंघाने कॅपमध्ये सुधारणा करण्याची घोषणा केली आहे. महासंघाचे कृषी आयुक्त डेसियन सिओलोज यांनी नुकताच याबाबत अहवाल सादर केला. आता प्रत्येक सदस्य देशातील पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकासासाठीचे प्रयत्न आणि जागतिक बाजारातील स्थिती यांचा अभ्यास करून सदस्य देशांच्या अनुदानाच्या टक्केवारीत बदल केला जाणार आहे. तसेच यापुढे प्रत्येक शेतकऱ्याला कमाल तीन लाख युरो (सुमारे २१ लाख रुपये) इतकेच वार्षिक अनुदान देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच पर्यावरण संवर्धनासही चालना देण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी एकूण अनुदानापैकी ३० टक्के अनुदान हे पर्यावरण संवर्धन प्रयत्नांना दिले जाणार आहे.

*(दै. ॲग्रोवन मधून साभार)*

# शेतकरी संघटनेने आ. राहुल बोंद्रे यांच्या कार्यालयाचा वीज पुरवठा तोडला

**चिखली :** राज्यामध्ये सध्या भारनियमन सुरू आहे. त्याचा जास्तीत जास्त चटका शेतकऱ्यांना बसत आहे. भारनियमना व्यतिरिक्तसुद्धा अतिरिक्त भारनियमन सुरू असून त्यामुळे शेतातील तुर, कापूस, मिरची ही पिके पाण्यावाचून वाळू लागली आहेत. विहिरीत नदीनाल्यांना भरपूर पाणी आहे; पण विजेअभावी पाणी पिकांना देता येत नाही. शेतकऱ्यांना रात्रीबेरात्री वीज दिली जाते तीही अतिशय कमी दाबाची, त्यामुळे पंप जळतात व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. शहरात व खेड्यात भारनियमनाचा भेदभाव केला जातो.

या वीज भारनियमनास सरकार जबाबदार असून लोकप्रतिनिधी ही शेतकऱ्याची व्यथा सरकार दरबारी मांडत नाही. यांचे शेतकरी प्रेम हे पुतणा मावशीचे आहे हे यावरून सिद्ध होते. या भारनियमनाचा निषेध म्हणून शेतकरी संघटनेने आ. श्री. राहुल बोंद्रे, चिखली यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा वीज पुरवठा दि. २० ऑक्टोबर रोजी तोडला. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते बाजार समितीमध्ये एकत्र येऊन आमदार रोहुल बोंद्रे यांच्या चिखली येथील कार्यालयावर गेले. रस्त्याने 'आम्ही अंधारात तर आमदार अंधारात', 'शेतीचे जीव घेणे भारनियमन बंद करा', 'शेतकरी संघटनेचा विजय असो' अशा घोषणा देत कार्यकर्ते आमदार राहुल बोंद्रे यांच्या कार्यालयावर जाऊन धडकले. कार्यालयासमोर शेतीचे प्रश्न सोडवा नाहीतर खुर्ची खाली करा, शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो, अशा घोषणा देऊन निदर्शने केली. संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हातात शेतकरी संघटनेचे झेंडे व जीवघेणे 'शेतीचे भारनियमन बंद करा', 'सरकार समस्या क्या सुलझाये, सरकार खुदही समस्या है' असे घोषवाक्य लिहिलेले फलक होते. निदर्शने करत असताना शेतकरी संघटनेचा एका कार्यकर्त्याने ठरल्याप्रमाणे विजेच्या खांबावर चढून आमदार राहुल बोंद्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा वीज पुरवठा तोडून टाकला. या अभिनव आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष देविदास कणखर, कार्यकारिणी सदस्य नामदेवराव जाधव, समाधान कणखर, मुरली महाराज येवले, सुखदेवराव नरोटे, पुंजाजी मुजमुले, रतिराम शेळके (ता. प्र. शेतकरी संघटना), राजु कणखर, राजू शेळके, शेषराव शेळके, रावसाहेब अंभोरे, प्रकाश येडुजी घुबे हे व इतर बहुसंख्य कार्यकर्ते हजर होते. जोपर्यंत शेतीचा वीज पुरवठा सुरळीत होणार नाही तोपर्यंत सत्ताधारी पक्षांच्या आमदार व खासदार यांचा वीज पुरवठा तोडो हे शेतकरी संघटनेचे अभियान असेच सुरू राहील. असा संकल्प शेतकरी संघटनेने केला असल्याचे व यापुढे हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचे जिल्हाध्यक्ष देविदास कणखर व नामदेवराव जाधव यांनी सांगितले.

# आधुनिक वामनांच्या प्रतिमा जाळून बळिराजांनी केली प्रतिपदा साजरी



**(कडुअप्पा पाटील यांजकडून) जळगाव :** शेतीमालास खुली व्यवस्था नाकारणारे हे सरकार आधुनिक वामनाचा अवतार आहे, तेव्हा त्याची प्रतिमा जाळून ही बलिप्रतिपदा आम्ही साजरी करत आहोत, असा घोष करीत शेकडो शेतकऱ्यांनी जळगावात अभिनव दिवाळी आंदोलन केले. कापूस व ऊस पिकांना योग्य भाव न देणाऱ्या व निर्यातबंदी लावून किंवा आयात करून भाव पाडण्याचे धोरण अवलंबणाऱ्या शासनाचा निषेध केला.

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील ऊस परिषदेतील आदेशानुसार सरकार उसाला २१०० रुपये भाव देत नसेल व मागील हंगामाचे २५० रुपये देत नसेल तर महात्मा गांधींच्या 'करा किंवा मरा' या उक्तीप्रमाणे वागण्याचे शेतकऱ्यांना आदेश दिले. साखर कारखाने चालू देऊ नका. यंदाची बलिप्रतिपदा बळिराजाच्या स्मरणार्थ पुनरुत्थान दिवस म्हणून साजरी करा, आधुनिक वामनांचे फोटो जाळून नष्ट करा, पंडित जवाहरलाल नेहरू, शेतीला खुली व्यवस्था नाकारणारे पंतप्रधान मनमोहन सिंग, केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार हे आधुनिक वामन आहेत. त्यांनी कापूस, ऊस, साखर, दूध भुकटी व कांदा यांवर निर्यातबंदी लावून भाव पाडण्याचे धोरण अवलंबले. प्रक्रिया बंद करून भाव वाढले. तसेच राज्यबंदी करून व लेव्ही लावून भाव पाडले. म्हणून शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या आधुनिक वामनांच्या प्रतिमा जाळून नष्ट केल्या. तसेच शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळण्याचा दिवस म्हणून बलिप्रतिपदा आगळ्यावेगळ्या पद्धतीने शेतकऱ्यांनी आपापल्या अंगणात साजरी केल्याची माहिती शेतकरी संघटनेच्या उत्तर महाराष्ट्र बळिराज्याचे अध्यक्ष गणेश दिनकरराव पाटील ऊर्फ कडूअप्पा यांनी दिली.

# आंदोलनाच्या भीतीने आदिनाथचा गाळप कार्यक्रम गुंडाळला

## परमेश्वर तळेकर यांचा आरोप

**करमाळा :** जिल्ह्यातील ऊस आंदोलन चिघळल्याच्या पार्श्वभूमीवर आदिनाथ साखर कारखान्यात ऊस मोळी टाकण्याचा कार्यक्रम अत्यंत छोट्या स्वरुपात उरकण्यात आला. मात्र आमच्या आंदोलनाच्या भीतीने संचालक मंडळाने कार्यक्रम गुंडाळला, असा आरोप शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष तळेकर यांनी केला आहे.

आज एकोणीसाव्या गळीत हंगामाचा शुभारंभ आ. श्यामल बागल, चेअरमन तात्या मस्कर, व्हॉ. चेअरमन गव्हाणे, संचालक डॉ. प्रदीप जाधव पाटील, शिवाजी पांढरे, केवारे, सभापती गायकवाड, रा. काँ.चे माजी तालुकाध्यक्ष शहाजीराव देशमुख, दूधसंघाचे संचालक राजेंद्रसिंह भोसले आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दहा ज्येष्ठ सभासदांच्या हस्ते गव्हाणीत ऊस मोळी टाकून शुभारंभ करण्यात आला. मंडप, स्टेज, सत्कार अशा सर्व गोष्टींना फाटा देऊन अत्यंत साध्या वातावरणात अवघ्या पंचवीस मिनीटांत हा कार्यक्रम उरकण्यात आला. हा कार्यक्रमाचा सोपस्कार सुरू असताना शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी गेटवर घोषणाबाजी करून आंदोलन केले. पोलिसांनी गेटवर आंदोलनकर्त्यांना अडवले. एकाही आंदोलनकर्त्याला गेटच्या आत जाऊ दिले नाही. यावेळी आंदोलनकर्त्यांसमोर बोलताना शेतकरी संघटनेचे गणेश पवार म्हणाले की, आज ऊस उत्पादक शेतकरी उन्हात बसले आहेत. संचालक मात्र एअरकंडीशनमध्ये बसले आहेत. मात्र शेतकऱ्यांचा अंत पाहू नका. यावेळी परमेश्वर तळेकर यांनी २००९-१० सालचे पंचवीस रुपये प्रतिटन व २०१०-११ साठी अजून शंभर रुपये उचल द्यावी, अशी मागणी केली. यावेळी कार्यकारी संचालक घाणेकर यांनी दोन मागण्या मान्य करून २००९-१० चे पंचवीस रुपये १०-११ साठी अजून १०० रुपये शेतकऱ्यांना देण्याचा प्रस्ताव संचालक मंडळापुढे ठेवू, असे लेखी आश्वासन दिले.

मोळी टाकण्याचा कार्यक्रम व शेतकऱ्यांचे आंदोलन एकाचवेळी कारखान्यावर सुरू होते. पोलिसांनी मोठा फौजफाटा कारखानास्थळी ठेवला होता. या कार्यक्रमानंतर आ. श्यामल बागल यांनी कारखानास्थळावर पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. यावेळी आ. बागल म्हणाल्या की, आजचा कार्यक्रम अत्यंत साध्या पद्धतीने सर्व संचालकांच्या सुचनेनुसार घेण्यात आला यामुळे कार्यक्रम गुंडाळला असे म्हणणे योग्य होणार नाही. आदिनाथने चालू पाच वर्षांत सर्व जुनी थकीत देणी देऊन आर्थिक सुबत्ता प्राप्त केली आहे. यावर्षी १९०० रुपये दर आतापर्यंत दिला आहे. आदिनाथचा कारभार अत्यंत चोखपणे सुरू आहे. यामुळे आम्ही निवडणुकीलासुद्धा घाबरत नाही. सध्या जिल्ह्यात सुरू असलेल्या शेतकरी संघटनेच्या आक्रमक आंदोलनाबाबत नाराजी व्यक्त करून या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचेच नुकसान होत असून चर्चेतून मार्ग काढावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना शेतकरी संघटनेचे परमेश्वर तळेकर म्हणाले की, आज शेतकऱ्यांना उत्तर देण्यासाठी ते पात्र नसल्यामुळे त्यांना कार्यक्रम घेता आला नाही. त्यांना प्रमुख पाहुणा मिळाला नाही. पत्रिकेत नाव असलेले दिग्विजय बागलसुद्धा कार्यक्रमाला आले नाहीत. हासुद्धा आमचा विजय आहे. आज ऊस उत्पादक शेतकऱ्याला दारात अडवले उद्या हाच शेतकरी मत मागायला आल्यावर जाब विचारेल.